लोकसाहित्य संशोधन

मार्गदर्शक

डॉ. भास्कर शेळके
श्री. शिव छत्रपती महाविद्यालय,
जुन्नर, पुणे.

46
E
072

Publisher
Shabdashri Prakashan, Junnar
Dist. Pune, Maharashtra, 410502

अगस्ति कॉलेज ग्रंथालय
*DN3072*

AGASTI ARTS, COMMERCE & DADASAHEB RUPWATE SCIENCE COLLEGE
LIBRARY
AKOLE
422601
DIST. AHMEDNAGAR
AKOLE

पुस्तक जपून वापरावे.

# लोकसाहित्य संशोधन

प्रा. डॉ. भास्कर शेळके
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे)

891.46
SHE
DN 3072

Agasti Arts, Commerce & Dadasaheb Rupwate
Science College, Akole, Dist. Ahmednagar
LIBRARY DONATION
Acc.No. DN 3072
Price 90/- Dt. 15/1/18

अगस्ति कॉलेज ग्रंथालय
*DN3072*

Loksahitya Sanshodhan
**लोकसाहित्य संशोधन**
प्रा. डॉ. भास्कर शेळके

© डॉ. अविनाश भास्कर शेळके
मोबा. ९७६६९२१३२१

**प्रकाशक** : डॉ. भास्कर त्रिंबक शेळके (स्वप्रकाशित)
१२१, श्रीदुर्गा, बारव, ता. जुन्नर,
जि. पुणे, ४१० ५०२
मोबा. ९८२२४४८१८१

**प्रथमावृत्ती** : १२.१२ .२०१२

**मुखपृष्ठ** : सुनीत सयराम शेळके

**अक्षरजुळणी** : श्री. भूषण विजय नांगरे
मे. विज्वास सायबरवर्ल्ड,
मंचर (पुणे)

**मुद्रक** : न्यू भारत प्रिंटर्स, पुणे

**मूल्य** : ₹ ९०/-

ISBN No.: 978-93-5067-917-3

DADASAHEB RUPWATE SCIENCE COLLEGE ARTS, COMMERCE &
LIBRARY
AKOLE
422601
DIST. AHMEDNAGAR
AGASTI • AKOLE •

# अर्पणपत्रिका

निरपेक्ष प्रेम आणि कौतुक करणारे तसेच लेखन संशोधनास सदैव प्रेरणा देणारे आदरणीय **मा.श्री. दगडू रामजी शेळके,** मा. पोलीस पाटील, आडगाव बु.।।, ता. राहाता, जि. नगर, **मा.श्री. सयराम शेळके** आणि **सौ. मिनाक्षी शेळके,** प्रवरानगर, **मा. श्री. भागवत शिंदे** आणि **सौ. सुशीला शिंदे,** वाघापूर, ता. संगमनेर यांना सविनय

# मनोगत

महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठांमधील अनेक एम.फिल., पीएच.डी. चे प्रबंध वाचनात आले. काहींचे मूल्यमापन करण्याची संधी मिळाली. काहींच्या मौखिक परीक्षा घेतल्या. पण काही अपवाद वगळता तोचतोचपणा जाणवला. काही मर्यादा जाणवल्या. त्यामुळे परिपूर्ण लोकसाहित्याचे संशोधन कसे असावे, या जाणिवेतून शोधनिबंध लिहिले. कारण विषय गाभा बाजूला ठेवून अनेकांनी लोकसाहित्य : स्वरूप, व्याख्या, वैशिष्ट्यांची पुनरावृत्ती केली. ती अनावश्यक वाटली. विषयाच्या गाभ्याला भिडणारे संशोधन मर्यादित दिसले. म्हणून आपले जीवनच लोकसाहित्य आहे, आपल्या भोवतीच लोकसाहित्य आहे, अन्यत्र विनाकारण का भटकायचे म्हणून शोधनिबंध लेखनाचा प्रपंच केला. त्यातून नवोदितांना दिशा मिळेल असे वाटते.

विविध महाविद्यालयांतून राष्ट्रीय चर्चासत्रांचे आयोजन केले जाते. विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत रिफ्रेशन कोर्स होतात. अशाच काही चर्चासत्रांच्या निमित्ताने विविध महाविद्यालयात शोधनिबंधाचे वाचन केले. त्यांच्या स्मरणिकांमधून काही लेख प्रसिद्ध झाले. काही मासिक, नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले. विशेषतः 'आमची श्रीवाणी' धुळे, 'आत्मप्रत्यय' नांदेड, 'सर्वधारा' अमरावती, 'अक्षरवैदर्भी' अमरावती, 'शोधांकन' अहमदनगर, 'कॉऊन्टर व्ह्यू' लातूर, तसेच 'लोकविद्यापत्रिका' परभणी किंवा डॉ. रमेश देवरे संपादित 'लोकसाहित्यदर्शन' या गौरवग्रंथातून प्रसिद्धी मिळाली. डॉ. बबनराव पवार, डॉ. दिलीप सावंत, डॉ. सुखदेव ढाणके, डॉ. सुभाष सावरकर, डॉ. जोशी, डॉ. मल्लिकार्जुन करजगी, डॉ. साहेबराव खराटे, डॉ. दत्तात्रय डुंबरे यांनी तसेच मराठी अभ्यास मंडळाच्या पहिल्या महिला अध्यक्ष डॉ. स्नेहल तावरे यांच्याबद्दल पूर्वप्रसिद्धीबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो. हे सर्व शोधनिबंध एकत्रितपणे वाचन करून माझे अभ्यासू विद्यार्थी मित्र डॉ. शशिकांत साळवे, सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे यांनी पुस्तकरूपाने लेख छपाईचा हट्ट धरला. पंढरपूरचे आमचे दैवत डॉ. द. ता. भोसले सरांनी आग्रह केला. एवढेच नाही तर विद्यार्थ्यांवरील प्रेमाखातर प्रस्तावना देखील लिहिली. या दोघांच्या प्रेमात राहणेच मी पसंत करतो.

'लोकसाहित्य संशोधन' या छोटेखानी ग्रंथाचे आपण वाचक स्वागत कराल याची खात्री आहेच. कारण महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमधून

लोकसाहित्याचे संशोधन होत आहे. नवोदित संशोधकांना दिशा मिळावी, प्रेरणा-प्रोत्साहन मिळावे म्हणून हा सर्व खटाटोप करत आहे.

LIBRARY AKOLE 422601

या ग्रंथ प्रकाशनाच्या निमित्ताने जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे मा. अध्यक्ष ॲड. संजय शिवाजीराव काळे, तसेच मा. विश्वस्त मंडळ पदाधिकारी, सदस्य, मा. प्राचार्य डॉ. कांतिलाल पुराणे, सहकारी प्राध्यापक, कार्यालय प्रमुख आणि त्यांचे सर्व सहकारी, चतुर्थश्रेणी कर्मचारी, विद्यार्थी ग्राहक भांडाराचे सर्व कर्मचारी तसेच आकर्षक मुखपृष्ठ तयार करणारे चि. सुनीत सयराम शेळके आणि अक्षर जुळणीचे काम करणारे श्री. भूषण नांगरे आणि श्री. प्रसाद नांगरे मोलाचे सहकार्य लाभले. सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो. माझे सर्व मित्र, आप्तेष्ठांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

**प्रा. डॉ. भास्कर शेळके**
**सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख**
**श्री शिवछत्रपती महाविद्यालय, बोडकेनगर**
**ता. जुन्नर, जि. पुणे, ४१० ५०२.**
**भ्रमणध्वनी क्र. ९८९०६८६५२१**

# लोकसाहित्यातील गंध आणि सुगंध
## (प्रस्तावना)

आजच्या उच्च शिक्षणक्षेत्रात महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी अतिशय उपयुक्त आणि मार्गदर्शक असा उपक्रम राबविला जात आहे. तो म्हणजे वेगवेगळ्या जिव्हाळ्याच्या विषयांवर आयोजित केली जाणारी चर्चासत्रे होत. चर्चासत्रासाठी विद्यापीठ अनुदान मंडळ, विद्यापीठे आणि महाविद्यालये चालविणारी शिक्षणसंस्था नेहमी उत्तेजन देत असल्याने आजकाल जवळजवळ प्रत्येक महाविद्यालय अशी चर्चासत्रे घेत असते. त्या त्या विषयावरील व्यासंगी मंडळी आपले संशोधन, आपला अभ्यास प्राध्यापकांसमोर निबंधरूपाने ठेवतात. महाराष्ट्राच्या गडचिरोलीच्या भागातला एखादा प्राध्यापक कर्नाटकाच्या सीमेवर असलेल्या गडहिंग्लजच्या चर्चासत्राला उपस्थित राहतो, आपले संशोधन सर्वांसमोर ठेवतो, चर्चेत सहभागी होतो. हे प्राध्यापकाच्या व्यासंगी आणि समृद्ध व्यक्तिमत्त्वासाठी जितके मोलाचे आहे; तितकेच कसदार अध्यापन आणि मराठी साहित्याच्या समृद्धीसाठी आवश्यक आहे. पन्नास साठ वर्षांपूर्वी अशी चर्चासत्रे फारशी होत नसत. विशेषतः ग्रामीण भागामध्ये तर अजिबात होत नव्हती. या चर्चासत्रात सादर केलेल्या आपल्या निबंधांना ग्रंथरूप देण्याचा केलेला हा स्तुत्य प्रयोग म्हणजे प्रस्तुतचा 'लोकसाहित्य संशोधन' हा छोटेखानी ग्रंथ होय. विद्यार्थी, प्राध्यापक आणि या विषयाचे अभ्यासक यांना उपयोगी पडणाऱ्या या प्रयोगाबद्दल प्रा. डॉ. भास्कर शेळके यांचे अभिनंदन करावयास हवे. आता इतर प्राध्यापकांनी देखील असा प्रयोग करायला हरकत नाही.

लोकसाहित्यावरील या ग्रंथाचा प्रथमदर्शनी जाणवणारा पहिला विशेष असा की, यामध्ये लोकसाहित्याचे साचेबंद पद्धतीने विवेचन केलेले नाही. कमी-अधिक प्रमाणात एका सर्वमान्य चौकटीमध्येच आपण लोकसाहित्याचा विचार करतो. त्यातही नव्याने या विषयाकडे वळणारे उत्साही तरुण असतात. ते लोकसाहित्याचा परिचयात्मक, वर्णनात्मक आणि संकलनस्वरूपी असाच अभ्यास ह्या सर्वमान्य चौकटीला समोर ठेवून सादर करतात. या मातीखालच्या मातीला किंबहुना मातीतल्या सोन्याला वर काढून ते उजाळा देतात; ही अभिनंदनीय गोष्ट आहे. पण लोकसाहित्याच्या अंतस्थ शक्तीचा आविष्कार तुलनेने कमी होतो. या साहित्याची इतर अंगे, उपांगे यावर कमी प्रकाश टाकला जातो. प्रा. डॉ. शेळके यांनी स्वीकारलेली भूमिका वेगळी वाटते. लोकसाहित्याचे विविध आयाम प्रकट करण्यावर त्यांनी भर दिलेला आहे. त्यामुळेच लोकसाहित्यातून प्रकट होणारे सामाजिक आणि सांस्कृतिक दर्शन, लोकसाहित्य आणि धर्म, लोकसाहित्यातील चमत्कार आणि आख्यायिका, लोकसाहित्य आणि ग्रामीण जीवन,

लोकसाहित्यामध्ये होऊ शकणारे नवे संशोधन, लोकसाहित्यातील संस्कारक्षमता यासारख्या नव्या विषयांवर त्यांनी आपले भाष्य केलेले आहे. लोकसाहित्याचा किती वेगळ्या वेगळ्या अंगांनी अभ्यास करता येतो. याचे यामधून दर्शन घडते. तमाशासारख्या लवचीक आणि उत्स्फूर्त लोककलांमधील त्यांनी जी सशक्त बलस्थाने नमूद केलेली आहेत; त्यामागेही हीच भूमिका आढळते. म्हणून लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे पाहण्याची एक नवी दिशा, नवी दृष्टी या लेखांमधून आपणाला प्राप्त होते, यात शंका नाही. जागतिकीकरणाच्या झंझावातामध्ये आपली लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य झपाट्याने लोप पावत चालले आहे. उपेक्षेची शिकार होत आहे. या पार्श्वभूमीवर लेखकाची ही भूमिका मला स्वागतार्ह वाटते. उपयुक्त वाटते आहे.

याबरोबरच प्रा. भास्कर शेळके यांनी लोकसाहित्याची प्रेरणा, लोकसाहित्याचे स्वरूप, लोकसाहित्याची उपयुक्तता आणि लोकसाहित्याची महता यावर केलेले विवेचनही उपयुक्त ठरणारे आहे. त्यांनी अप्रत्यक्षपणे सर्जन, संरक्षण, संगोपन मनोरंजन आणि ऐहिक समृद्धी यासाठी या साहित्याची निर्मिती झाली असे म्हटले आहे. सहभाग, सहजीवन, सहजभाव आणि सहजधर्म हे या साहित्याचे मूल स्त्रोत आहेत. त्याच्या जोडीला नंतर श्रमाची विभागणी आणि प्रार्थना या बाबी आल्या.

लोकसाहित्य माझ्या दृष्टीने तीन गोष्टींना एकत्र ठेवते. कुटुंबजीवन, कृषिजीवन आणि ग्रामीण जीवन या त्या तीन गोष्टी होत. लोकसाहित्य तीन गोष्टींना परस्परांच्या जवळ आणते. त्या तीन गोष्टी म्हणजे माणूस, निसर्ग आणि प्राणिसृष्टी-पक्षीसृष्टी. लोकसाहित्य तीन जणांना जोडण्याची भूमिका पार पाडते. आपले लौकिक जग, पारलौकिक जग आणि आपल्या मनात असलेले आपले स्वप्नांचे जग ही तीन जगं आहेत. किंबहुना दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की, लोकसाहित्याचा प्राणभूत घटक आहे मुक्तजीवन हा. कशापासून हवी असते मुक्ती? रोजच्या रटाळ जीवनापासून आपणाला मुक्ती हवी असते. दैवी अरिष्टापासून आपणाला मुक्ती हवी असते. दबलेल्या आपल्या भावनांना मुक्ती हवी असते. आपणाला भयापासून मुक्ती हवी असते. श्रमापासून मुक्ती हवी असते. बद्ध झालेल्या मनाला मुक्ती हवी असते आणि काळाच्या बंदिस्त चौकटीतूनही आपणाला मुक्ती हवी असते. निदान काही काळापुरती तरी मुक्ती हवी असते. यासाठी लोकसाहित्य निर्माण होते: लोकसाहित्य आपण निर्माण करीत असतो. वर वेगळ्या भाषेत नमूद केलेल्या बाबी प्रा. डॉ. शेळके यांनी या ग्रंथात व्यक्त केलेल्या आहेत.

या बरोबरच त्यांनी देवादिकांच्या आणि संतांच्या जीवनातील चमत्कार आणि लोकमानसात असणाऱ्या आख्यायिका याविषयी काही मते नोंदविली

आहेत. त्यांच्या मते, देवस्थानाची महती सांगण्यासाठी आख्यायिका निर्माण होते. भक्ताच्या मनावर त्या देवतेचा खोल ठसा उमटविण्यासाठी आणि त्याची श्रद्धा स्थिर करण्यासाठी अशा अतिशयोक्त स्वरूपाच्या आख्यायिका निर्माण केल्या जातात. याशिवाय या कथा आणि चमत्कार एक मूल्यविचार सांगण्यासाठी तसेच लोकमानसावर संस्कार करण्यासाठी निर्माण झालेल्या असतात, असे त्यांना वाटते. माणसाने निर्माण केलेला देव, माणसानेच तयार केलेली मूर्ती माणसापेक्षा वेगळी असली पाहिजे. त्याशिवाय त्यांचे देवपण बिंबणार नाही, या भावनेतून त्याच्या चरित्रात चमत्कार प्रविष्ट केले जातात. त्याला चार हात-सहा हात, तीन मुखे अशा गोष्टी बहाल केल्या जातात. यामधून लोकसाहित्य संस्कार रुजविते, असे त्यांना वाटते. म्हणून लेखक अशा चमत्कारांना 'शुगर कोटेड पिल्स' असे संबोधित असावा.

लोकसाहित्याच्या स्वरूपापेक्षाही प्रा. डॉ. शेळके यांनी लोकसाहित्याची महती आणि त्याची उपयुक्तता यांचे विवेचन बऱ्याच ठिकाणी केलेले आहे. आजच्या शरीरसुखाला महत्त्व देणाऱ्या चंगळवादी जीवनशैलीच्या संदर्भात आणि जीवन आदर्शांच्या संदर्भात त्यांनी कथन केलेले हे महत्त्व आवश्यक वाटते. दिशादर्शक वाटते. 'लोकसाहित्य' हे संस्कृतीचा एक महत्त्वाचा अपरिहार्य घटक आहे. लोकसाहित्य समाजजीवनावर खोल संस्कार करते. त्यातून शाश्वत मूल्यांचे दर्शन घडते. उपदेश आणि नीतिशिक्षणासाठी लोकसाहित्यातील लोककथा उपयुक्त ठरतात. धर्म आणि संस्कृतीला आधार देण्याचे, प्रवाहित करण्याचे कार्य लोकसाहित्य करते. सण, सोहळे, विवाह, खेळ, इ. च्या माध्यमातून लोकसाहित्य मानवाला निखळ आनंद देते. लोकसाहित्य माणसाला पदोपदी उपयोगी पडणारे शहाणपण सांगते. माणसाला माणसाशी जोडण्याचे काम लोकसाहित्यातून होते. ते समाजमनाला उन्नतावस्थेला नेत असते. सृष्टीमध्ये घडणाऱ्या घटनांचे स्पष्टीकरण लोकसाहित्य प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष स्वरूपात करते. लोकसाहित्य परंपरा आणि पाथेय जिवंत ठेवते. पुढच्या पिढीला ते देते. या प्रकारे प्रा. डॉ. भास्कर शेळके यांनी लोकसाहित्याची महत्ता आणि उपयुक्तता विशद केली आहे. खेड्यातल्या अडाणी आणि निरक्षर माणसांची ती निरर्थक बडबड नसते. शब्द आणि प्रसंग यांच्या माध्यमातून मनाला विसावा आणि काळजाला ओलावा देणारी ती उत्स्फूर्त अशी अभिव्यक्ती असते, हे आपण विसरता कामा नये.

या ग्रंथाचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, प्रा. डॉ. भास्कर शेळके यांनी लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांचा असलेला परस्पर अनुबंध येथे ठळकपणे अधोरेखित केलेला आहे. पुष्कळदा आपण लोकसाहित्याचा एक 'साहित्य' म्हणूनच विचार करतो. लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य यांचे असलेले नाते लक्षात घेत नाही. खरे तर लोकसाहित्य म्हणजे लोकसंस्कृतीला

मिळालेले शब्दरूप आहे. लोकसंस्कृतीचा शाब्दिक आविष्कार म्हणजे लोकसाहित्य. भूमी आणि वृक्ष, माता आणि बालक, वृक्ष आणि फळ, देह आणि आत्मा यांचे जे नाते असते; तेच लोकसंस्कृती आणि लोकसाहित्याचे असते. मातीचे गुणधर्म वृक्ष आणि फळात उतरावे; तसे लोकसंस्कृतीचे सार लोकसाहित्यात प्रकट होत असते. म्हणून लोकसाहित्य म्हणजे लोकसंस्कृतीचा सारांश म्हणायला हरकत नाही. लोकसंस्कृतीच लोकसाहित्याला जन्म देते, आधार देते, लोकसाहित्याला पुष्ट करते. म्हणून लोकसाहित्याचे सत्त्व, सामर्थ्य, सौंदर्य पूर्णपणे जाणून घेण्यासाठी लोकसंस्कृती पूर्णपणे जाणून घेणे आवश्यक असते. लोकसाहित्य आपणाला समूळ आणि परिपूर्ण समजण्यासाठी लोकसंस्कृतीचा आधार घ्यावा लागतो. आधार घेणे गरजेचे असते, यात शंका नाही.

काही उदाहरणे घेऊन बोलायचे झाले तर देवीची गाणी म्हणणारा भोपे किंवा आराधी आपल्या गळ्यात कवड्याची माळ का घालतो? मळवट का भरतो? हातात भरलेला पेटता पोत नाचता नाचता खांदा, मनगट आणि कपाळी का टेकवतो? यांची माहिती करून घेतल्याशिवाय देवीवरच्या गाण्याचे पूर्ण आकलन होणार नाही. त्याचा समग्रतेने आस्वाद घेता येणार नाही. यमाईदेवीचा जोगवा म्हणणारी जोगतीण देवीचा जग हिरव्या वस्त्राने का झाकते? आपल्या गळ्यात कवड्यांची माळ का परिधान करते? केसाच्या बटा का ठेवते? यांची माहिती पूर्णांशाने घेतल्याशिवाय त्यावरील गीते आणि त्यांचा आचारधर्म नीट समजणार नाही.

मरीआईचा गाडा माथ्यावर घेतलेला पोतराज चिंध्या चिंध्यांचा सैलभर झगा का परिधान करतो? आणि स्त्रियांप्रमाणे केस का वाढवितो? यासाठी आपणाला लोकसंस्कृतीकडेच वळावे लागते. विहिरीला लागलेले पहिले पाणी, गाईच्या दुधाचे पहिले लोणी, बाळाच्या डोक्याचे पहिले वहिले केस, दिवस भरत आलेली पहिलकरीण या संबंधीचे अनेक विधी आपल्या लोकसंस्कृतीत रूढ आहेत. ते जाणून घेणे, त्यामागचा शाश्वत अर्थ समजावून घेणे, त्यामागचे लोकमानस ओळखून घेतल्याशिवाय या विधीवरील गीते म्हणजेच लोकसाहित्य संपूर्णपणे आपणास समजणार नाही. महाराष्ट्रात आजही ललित, दंडतरा, पंचमी, भोंडला, कातबाईची गीते, ऐकीव यासारखी लोककलांची समृद्ध परंपरा आहे. मुखवटे धारण करून, रात्रभर गाण्यांसह वर्तन करण्यात आणि त्यांचा मनमुरादपणे आस्वाद घेण्यात लोकमानस कसूर करीत नाही. या साऱ्यामागचे सांस्कृतिक गणित आपण सोडविले तर त्या कलांचा सखोल मागोवा आपणाला घेता येईल. म्हणून मला स्वतःला असे नेहमी वाटते की, लोकसंस्कृती पचविल्याशिवाय लोकसाहित्य पचविता येणार नाही. लोकसाहित्य हे पंचेंद्रियांचे खाद्य आहे. ते

कोणी निर्माण केले, कसे निर्माण झाले हे जाणून घेतल्याशिवाय त्या खाद्याची चव समजली असे आपणाला म्हणता येणार नाही. लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य हे माणूस आणि त्याची सावली यासारखे असल्याने या दोहोंतील अनुबंध नजरेआड करून चालणार नाही. प्रा. डॉ. भास्कर शेळके यांनी हे पूर्णपणे जाणलेले आहे. म्हणून त्यांनी हा अनुबंध ठळकपणे अधोरेखित केलेला आहे, यात शंका नाही.

या अनुबंधाच्या संदर्भात त्यांनी लिहिलेल्या लेखांत काही मौलिक विचार नोंदविलेले आहेत. त्यांच्या मते धर्म आणि संस्कृती या हातात घालून जात असतात. धार्मिक विधी निमित्ताने आपण जी पदे, गाणी, चरित्रकथा गातो, ती लोकसंस्कृतीचा महत्त्वाचा घटक असतात. एखाद्याने धर्म नाकारला तरी त्याला संस्कृती नाकारता येत नाही. धर्माची शिकवणूक संस्कृतीतूनच होत असते. अनुभवांतून येणारे शहाणपण हे आपणाला लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीतून प्राप्त होत असते. प्राणी, पक्षी, झाडे आणि वस्तू यांच्याशी मानवाचे असणारे नाते लोकसाहित्याच्या आधारे आपली संस्कृती साधत असते. थोडक्यात असे म्हणता येईल की, संस्कृती लोकसाहित्य जिवंत राखते आणि लोकसाहित्य संस्कृतीला जिवंत ठेवते. असा हा परस्पर संबंध मनात ठेवूनच आपण लोकसाहित्याचा अभ्यास केला पाहिजे, अशी भूमिका या लेखकाने यात स्वीकारलेली आहे. ती महत्त्वाची आहे.

वेगवेगळ्या आयामांतून लोकसाहित्याचा अभ्यास करण्याची भूमिका या ग्रंथात पाहावयास मिळते. अशा प्रकारचा विचार या प्रस्तावनेच्या प्रारंभी व्यक्त केलेला आहे. त्याचे उदाहरण म्हणून 'लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य' या लेखाचे देता येईल. ग्रामीण जनजीवन आणि जनमानस हा समाज भाग असला तरी लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य एक नव्हे. या दोहोंमध्ये बरीच साम्ये आहेत आणि तितकेच भेदही आहेत. ग्रामीण साहित्याचा निर्माता आपणाला ज्ञात असतो, लोकसाहित्याचा अज्ञान असतो. लोकसाहित्य ग्रामदेवदेवतांच्या उपासनेला, विधीला महत्त्व देते. ग्रामीण साहित्यात फार तर अशा देवदेवतांच्या यात्राजत्रांचे वर्णन येऊ शकते. लोकसाहित्य ही सामूहिक मनाची निर्मिती असते. तर ग्रामीण साहित्य म्हणजे एका संवेदनशील व्यक्तिमनाला जाणवलेल्या अनुभवांची निर्मिती असते. त्यात प्रसंगी सामूहिक जीवनाची अभिव्यक्ती झालेली असली तरी त्या अभिव्यक्तीचा कर्ता एक लेखक असतो. लोककथा बहुतांशी बोधाकडे झुकलेली असते, तर ग्रामीण कथा थेट अनुभवांशी भिडून जीवनाचे दर्शन घडवित असते. लोकसाहित्य हे अनेकदा साधन स्वरूपी बनते. ग्रामीण साहित्याने आता याचा त्याग केला आहे. वर्तमान वास्तव, दैवी संकटे, महापूर, दुष्काळ, रोगराई, आर्थिक व धार्मिक विषमता, परंपराप्रेम, पुरुषप्रधान

संस्कृतीमुळे स्त्रियांचा होणारा छळ, कोंडमारा आणि तिची होणारी होरपळ यासारखे भेदक आणि भीषण अनुभवविश्व ग्रामीण साहित्यात प्रकट झालेले असते. लोकसाहित्य याला अपवाद आहे. धर्मविचार, रीतिविचार, मूल्यसंस्कार आणि विधिविधाने यावरच लोकसाहित्याचा भर असतो. म्हणून हे दोन्ही आविष्कार एक नव्हेत. एक स्वरूपी नव्हेत, असेच म्हटले पाहिजे.

तरीही या दोहोंचा असणारा अनुबंध प्रा. डॉ. भास्कर शेळके यांनी आपल्या लेखातून व्यक्त केला आहे. त्यांच्या मते, ग्रामीण साहित्याचा मूळ स्त्रोत हा लोकसाहित्यात आहे. ग्रामीण साहित्यामध्येही लोकसंस्कृती, रूढी, परंपरा व इतर लोकधर्म व्यक्त झालेले असतात. त्यासाठी त्यांनी मराठीतील काही कादंबऱ्यांचा सोदाहरण निर्देश केलेला आहे. आज ग्रामजीवनात बऱ्यापैकी आधुनिकता आलेली असली तरी जुन्या प्रथा, परंपरांचे जतन केले जाते. भटक्या जमातीमध्ये जातपंचायत अजूनही रूढ आहे. मराठीतल्या ग्रामीण लेखकांनी आपापला प्रदेश आणि त्यातील लोकसंस्कृती वास्तव स्वरूपात व्यक्त केलेली आहे. त्यामुळे आजच्या ग्रामीण साहित्यामध्येही लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य यांचे रंग झिरपत आहेत. पाझरत असलेले आपणाला दिसतात, असा त्यांनी निष्कर्ष काढलेला आहे.

कृषी साहित्य आणि ग्रामीण साहित्य यामध्ये असलेला सूक्ष्म भेद एका लेखामध्ये प्रा. डॉ. भास्कर शेळके यांनी बारकाईने नोंदविला आहे. त्यांच्या मते, कृषी साहित्य हे ग्रामीण जीवनाचाच आविष्कार करीत असले तरी या कृषी साहित्यात लेखकाच्या मते कृषीला अधिक महत्त्व असते. त्यात पेरणी, भांगलणी, काढणी, मळणी याच्या चित्रणाला महत्त्व असते, असावे लागते. त्याबरोबरच कृषीशी निगडित सण, सोहळे आणि उत्सव येणे क्रमप्राप्त असते. शिवारातील प्राणी, पक्षी, झाडे, कीडा-मुंगी यांनाही या कृषी साहित्यात स्थान असणे अनिवार्य असते. या साऱ्यांनाही जगण्याचा हक्क मानणे म्हणजे कृषिधर्म होय असे लेखनाने म्हटलेले आहे. एका ठिकाणी त्यांनी ''मानवमुक्तीची लढाई ही कृषी साहित्याची धारणा असते'' असे विधान केले आहे. श्रमप्रतिष्ठा, सामूहिक जीवन, व्यापक सहभाव आणि शोषणाला नकार हेही या साहित्याची लक्षणे म्हणून सांगितली आहेत. याशिवाय या साहित्याला लाभलेली मौखिक परंपरा आजही सबळ करून वापरता येईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

या भूमीवर नांदणारे तीन धर्म, चरित्र आणि आत्मचरित्र, संज्ञाप्रवाही कादंबरीचा परिचय, जुन्नर तालुक्यातील समृद्ध लोकसंस्कृती इ. लेखांमुळे या ग्रंथाला वैचारिक स्वरूपाचे अधिक व्यापक परिमाण प्राप्त झालेले आहे. एकट्या जुन्नर शहरात शंकराची बारा मंदिरे आहेत हा उल्लेख वाचून नवल वाटले. या बारा मंदिरांमागे असणाऱ्या सांस्कृतिक आणि व्यवहारी कारणांचा मागोवा घेतला

असता तर आपल्या धार्मिक श्रद्धेचा अधिक परिचय झाला असता. पोट भरण्यासाठी ही मंदिरे निर्माण झाली की धर्मश्रद्धेच्या स्थित्यंतरातून निर्माण झाली याचा उलगडा व्हायला हवा होता, असे जाताजाता मनात येते.

'शिमगा आणि वाण', 'खंडोबाची यात्रा' या लेखांमधून लेखकाची सण, उत्सव आणि लोकसंस्कृतीची असलेली भक्कम समज दिसून येते.

स्वतः लेखकाचा लोकजीवन, लोकसंस्कृती यांच्याशी अतूट संबंध असल्यामुळे, लोकसंस्कृतीच्या अमृतपानावर त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रगल्भ आणि समृद्ध झाल्यामुळे लोकसाहित्यावरील त्यांचे चिंतन हे स्वानुभव, निरीक्षण आणि व्यासंग या तिन्हींचे सुंदर संमेलन झालेले आहे. त्यामुळे लोकसाहित्याची आज होत असलेली उपेक्षा, तमाशासारख्या लोककलेला येत असलेले, नव्हे आलेले बाजारी स्वरूप, लोकसाहित्याच्या संशोधनाला आज पडलेल्या मर्यादा, लोकसाहित्याकडे पाहण्याची तुच्छतापूर्वक दृष्टी, केवळ मनोरंजन म्हणून लोकसाहित्याचा नेहमी होणारा अनादर यासारख्या अनेक अनिष्ट बाबी या लेखकाला अस्वस्थ करून जातात. त्यामुळेच आजच्या काळातही या साहित्याची शक्तीस्थळे आपण शोधली पाहिजेत आणि मराठी साहित्यासाठी त्यांचा वापर कलात्मकतेने केला पाहिजे, असे लेखकाला वाटते. माझी भूमिकाही प्रा. डॉ. भास्कर शेळके यांच्यासारखीच आहे. लोकसाहित्याचे सत्त्व, सामर्थ्य, सौंदर्य आणि प्राणभूत चैतन्य नेमकेपणाने हेरून मराठीसाठी वापरले तर आपली साहित्यनिर्मिती नक्कीच श्रीमंत होऊ शकेल, समृद्ध होऊ शकेल आणि अधिक सशक्त होऊ शकेल असा मला ठाम विश्वास वाटतो.

हा विश्वास ठाम वाटण्याचे बळ हा ग्रंथ आपणाला पुरवितो आहे यात शंका नाही.

डॉ. द. ता. भोसले

# अनुक्रमणिका


१. आधुनिकीकरण : तमाशाचे स्थान व भवितव्य..................१५-२०

२. लोकसाहित्य : सांस्कृतिक चित्रण..................................२१-२७

३. मराठी लोककथा : सांस्कृतिक सामाजिक दर्शन................२८-३२

४. लोकसाहित्य : संशोधनाच्या नव्या दिशा........................३३-३७

५. जुन्नर तालुक्यातील लोकसाहित्य संशोधन......................३८-४४

६. लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य..............................४५-४९

७. बौद्ध धर्म आणि इतर धर्म साम्यभेद.............................५०-५५

८. विश्वशांती आणि संतकार्य..........................................५६-५९

९. कृषी साहित्य संकल्पना आणि लोकसाहित्य.....................६०-६५

१०. चरित्र-आत्मचरित्रावरील लोकसाहित्याचा प्रभाव...............६६-७२

११. खंडोबाची यात्रा.......................................................७३-७६

१२. शिमगा आणि वाण....................................................७७-८३

परिशिष्ट : अल्पपरिचय..................................................८४-८९

# आधुनिकीकरण : तमाशाचे स्थान व भवितव्य

आधुनिकता, जागतिकीकरण, उदारमतवाद असे काही शब्द आज फार चर्चिले जातात. यांचा परस्परांशी संबंध आहे. मराठी साहित्याचा विचार करता इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर आधुनिकता हा शब्द भारतात आला. इंग्लंडमध्ये औद्यागिक क्रांती झाली आणि त्यानंतर आधुनिकता सुरू झाली. आधुनिकता म्हणजे अलीकडचा किंवा सांप्रतचा असा अर्थ व्युत्पत्ती कोशात दिलेला आहे. यावरून काळानुसार आधुनिकता बदलते असे म्हणता येईल. कालची आधुनिकता आज असेलच असे सांगता येत नाही. आधुनिकतेत सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक मूल्ये अंतर्भूत आहेत. संधीची समानता हे आधुनिक समाजरचनेतील एक मूलभूत तत्त्व आहे. म्हणजे मानवी समानता होय सुखसोयी साधने जगण्याच्या कल्पना व मूल्ये यातून जीवनाचे आधुनिकीकरण आकारलेले असते. बुद्धिनिष्ठा, विज्ञानाश्रय, व्यक्तिस्वातंत्र्य, समता या मूल्यांवर आधारलेले नवजीवन म्हणजे आधुनिकता होय. आधुनिकता म्हणजे केवळ भौतिक सुख, अमर्याद स्वातंत्र्य किंवा अतियंत्र प्रधान समाज असे नाही. कमी विकास झालेल्या समाजात, अधिक विकास झालेल्या समाजात सामाजिक बदल होतो. या प्रक्रियेला आधुनिकीकरण म्हटले जाते. यंत्र आणि तंत्राच्या प्रसारामुळे ही प्रक्रिया वाढू लागली. शहरीकरण, कुटुंबरचना, शिक्षण प्रचार साधने, इत्यादी विचारातील नवेपणा आणि वैशिष्ट्ये या व्याख्येत दिसतात.

आधुनिकता माणसाच्या सर्व क्षेत्रात जाऊन पोहोचली. साहित्य, कला, संस्कृती यांच्यावरही आधुनिकतेचा प्रभाव निर्माण झाला आहे. तो दोन्हीही अंगाने (आधुनिकतेच्या आधुनिकीकरणाने विकृती निर्माण होते) पाश्चात्त्य देशात उदयाला आलेली आधुनिकता भारतात आली आणि भारतीय लोकांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला. सुरुवातीला तो शहरी भागात त्यांचा प्रभाव हा ग्रामीण जीवनावर ही पडू लागला.

आधुनिकतेचा प्रभाव जसा इतर कलांवर पडला तसा तो तमाशावरही पडला. आधुनिकतेमुळे तमाशाला ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनात अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. ते प्रसार माध्यम व प्रबोधनाचे साधन

होते. गावात कोणताही कार्यक्रम असो तमाशा हे गावाचे भूषण होते. तमाशाने ग्रामीण माणसाचे मानसिक स्वास्थ्य टिकवण्याचे काम केले आहे. ज्ञान माहिती पुरविण्याचे ते साधन होते. परंतु आधुनिक काळात जशी जशी प्रसार माध्यमांची साधने विकसित होऊ लागली तसे तमाशाचे महत्त्व कमी होऊ लागले. त्याच्याकडे केवळ करमणुकीचे साधन म्हणून पाहू लागले. फक्त उत्सव, यात्रा या प्रसंगीच त्याचे सादरीकरण होऊ लागले. या तमाशाच्या आकृतिबंधात आधुनिक काळात कसे बदल होत गेले याचा विचार करता येईल.

मराठी सहित्याचा विचार करता १९४५ नंतर आधुनिकता आली असे म्हणता येईल. तमााशात आधुनिकता येण्यासाठी ३० ते ३५ वर्षे लागले. आधुनिकता म्हणजे नवीन किंवा नावीन्य. हे नवीन या कालखंडात निर्माण झाले आकृतिबंधातील घटकानुसार तमाशात कसे बदल होत गेले हे लक्षात येते.

**गण गौळण :**

पेशवाईच्या काळात तमाशा भरभराटीला आला होता असे म्हटले जाते. परंतु या काळातील प्रस्थापित समाजातील शाहिरांचा प्रामुख्याने विचार होतो. त्यांची रचना ही संस्कृत प्रचुर आणि भडक शृंगारिक होती. या, काळातील गणपतीचे गणातील वर्णन संस्कृत प्रचुर असे दिसते.

उदा : या काळातील लावणीच्या रचना अश्लील शृंगारिक दिसतात. ग्रामीण व बहुजनांचे जीवन त्यात फारसे नव्हते. नंतरचे जे शाहीर निर्माण झाले; त्यात पठ्ठेबापूराव भाऊ क्कड, अर्जुन वाघोलीकर, शिवा संभा कवलपूरकर, दगडबो साळी शिरोलीकर, गोपीनाथ दरेकर हे शाहीर येतात. या शाहिरांच्या कवनात नवीन आशय होता. कवनातील शब्द हे सर्व सामान्यांना समजतील अशा स्वरूपाचे होते.

"बाजार मोठा लवकर गाठा मथुरेच्या हाटा चला निघानिघा ग SSSS"

ही गौळण सर्वसामान्य माणसाच्या परिचयाची भाषा मांडते आणि आशय सुध्दा सोपा आहे. सहज समजेल अशा प्रकारची मांडणी आहे.

१९७५ नंतर तमाशात नवीन पिढी उदयाला आली. ह्या काळ तमाशाच्या दृष्टीने नावीन्याचा काळ होता. अक्षर ओळख झालेले शाहीर या काळात निर्माण झाले. भास्कर कुरणेकर, मोमीन कवठेकर, शाहीर राजवटीत इ. शाहिरांचा उल्लेख करावा लागेल. या काळातील गणगौळण ही आधुनिक काळात ज्या समस्या निर्माण झाल्या त्याचे वर्णन करते, हे या शाहिरांच्या कवनात दिसते.

उदा : "गावोशा जाघाहो इतकरी
नाश या महा गाईचा करी"

वरील गणात अधुनिक काळात महागाईने जे रूप धारण केले होते त्याचे वर्णन केले आहे. भ्रष्टाचार वाढला आहे, सामान्यांचे जगणे अवघड झालेले आहे, तू जर खरच देव असशील आणि अस्तित्वात असशील तर पृथ्वीतलावर ये आणि तुझ्या भक्तांना या आधुनिक काळातील संकटातून वाचव, असे मोमीन कावठेकर वरील गणातून मांडतात.

"मी गवळ्याघरची गौळण हाय, माझ्या दुधाला डिग्री लावायची नाय"

वरील काव्यात डिग्री हा शब्द आधुनिकीकरणाची जाणीव करून देतो.

आधुनिकीकरणातील बदल झपाट्याने होत असतात. आजची आधुनिकता उद्या राहत नाही. जसेजसे तंत्रज्ञान विकसित होते, त्याप्रमाणे आधुनिकता बदलते. विज्ञानवादी दृष्टिकोण निर्माण होतो. त्यामुळे मानवाचे जीवनमान बदलते. या तंत्रज्ञानामुळे ग्रामीण भागातील जीवनमान बदलले, शेतीत नवनवीन प्रयोग झाले आणि शेती बैलाच्या ऐवजी यंत्र आले, प्रयोग केलेली बियाणे आली. गाईला इंजेक्शन देऊन संकरित पैदास निर्माण झाली.

"टेस्ट ट्युब ने बेबी निर्माण झाली,
हायब्रीड ज्वारी, हायब्रिड बाजरी आली
अन्न पौष्टिक नाही राहीलं,
असली खर न राहीलं, सार हायब्रीड झालं.
गावरान गाई म्हैसी गेल्या, पंजाबी न जरशी आल्या.
दुध निरस पिऊन पाहिलं, सार हायब्रीड झालं.
खाऊन सुग्रास चाले चांगल्या कृत्रिम रेता गाभण राहिल्या,
बैल रेड्याला रिकामा केला, सार हायब्रीड झालं."

आधुनिककाळात विज्ञानाने जे शोध लावले तो वरील गीतात मांडले आहेत. जुने जाऊन नवीन आले, परंतु त्याचे परिणाम काय झाले याचे वर्णन वरील गीतात येते.

यंत्रयुगामुळे कोणते बदल झाले, हे जसे काव्यात आले. तसेच इंग्रजी, हिंदी शब्दही आलेले दिसतात. भाषिक नवी रूपेही या काळात आली.

शाहिरीमध्ये जसे आधुनिक काळानुसार बदल झाले, तसेच इतर गोष्टीतही आधुनिक काळात बदल होत गेले. बैल गाडीने फिरणारा तमाशा ट्रकमध्ये फिरू लागला. गावातील पारावर होणाऱ्या तमाशाचे स्वरूप बदलून त्याचे स्वतंत्र स्टेज (रंगमंच) आले. त्याच्यामध्ये आधुनिक यंत्राचा वापर होऊ लागला.

उदाः सुसज्ज लाईट, वेगवेगळ्या दृश्यांचे पडदे, फटाक्याची दारू, स्टेजवरील दृश्य दाखवताना प्रकाश योजना, ध्वनी योजना या गोष्टींचा वापर होऊ लागला. नवीन प्रयोग होऊ लागले. उदा. 'इन्कलाब जिंदाबाद' या वगनाट्यात स्टेजवर मोटार सायकालचा वापर, गणपत व्ही. माने यांनी तयार केलेले सुवर्ण मंदिर आणि फिरता रंगमंच हे बदल तमाशाच्या इतिहासात आधुनिकतेची नोंद घेणारे आहेत. बसून सर्वाच्यासमोर वैकुंठाला जातात यातील आधुनिकता अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. संगीतात बदल झाला. पारंपरिक वाद्याच्या जोडीला आधुनिक काळातील नवीन वाद्यांचा शिरकाव झाला. त्याचबरोबर चित्रपटातील गीतांचा शिरकाव झाला. यामुळे तमाशावर दुष्परिणाम होतील अशा प्रकारची जाणीव काही शाहीर व कलाकारांना होती. त्यामध्ये प्रामुख्याने दत्ता महाडिक पुणेकरांचे नाव घेता येईल. त्यांच्या गाण्यामध्ये आधुनिकता आहे, पण चित्रपटातील गीतांचे सादरीकरण केले तर तमाशाचे अस्तित्व धोक्यात येईल, तमाशावर दूरगामी परिणाम होतील असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी आपल्या तमाशात हे जाणीवपूर्वक टाळले. पण दतोबा तांबे आणि खेडकर पार्टी यांनी मात्र त्यांचे स्वागत केले आणि चित्रपटातील हिंदी मराठी गीते सादर केली आणि तमाशात ऑक्रेस्ट्राचा शिरकाव झाला. त्यामुळे दत्ता महाडिक पुणेकरांना आपल्या पार्टीतील कलाकारांच्या आग्रहाखातर इच्छा नसतानाही ऑकेस्ट्राची निर्मिती करावी लागली. त्याचे परिणाम तमाशातील निर्मितीवर झाले.

आधुनिक काळात सत्ता आणि पैसा हाच महत्त्वाचा झाल्यामुळे तमाशात विषम व्यवस्था निर्माण झाली. सर्व फडमालक, मॅनेजर हे प्रस्थापित समाजातील व कलाकार खालच्या समाजातील अशी विषम व्यवस्था निर्माण झाली. १९७५ ते १९९० पर्यंत फडमालक सधन होते, त्यांच्याकडे पैसा होता. तांबे, महाडिक, ढवळपुरीकर यांनी अनेक ठिकाणी जमिनी घेतल्या होत्या. दत्तोबा तांबे यांचा मुलगा विनायक तांबे पब्लिक स्कूल मध्ये शिक्षण घेत होता. पुढे पुण्यातील बी.एम.सी.सी. महाविद्यालयात त्याने प्रवेश घेतला होता. किरणलाही ढवळपुरीकरांनी चांगल्या शाळेत टाकले होते. परंतु नंतरच्या काळात मात्र हे सर्व वैभव संपले.

तमाशाच्या सध्याच्या परिस्थितीचे अवलोकन करता असे लक्षात येते, की तमाशाचे सामर्थ्य असलेले गण गौळण आज निर्माण होत नाही. जुनेच गण आणि गौळणी सादर केल्या जातात. तेही पूर्ण नाहीत. तीन ते चार तास चालणारी गण गौळण आज अर्धातास सुद्धा चालत नाही. लगेच ऑकेस्ट्रा सुरू होतो. यात लावणीला मागणी आहे. परंतु चित्रपटातील

लावणीच तमाशात सादर केली जाते. सध्या तर लावणीने स्वतंत्र अस्तित्व निर्माण केलेले आहे. परंतु त्या लावणीत किती तमाशातील कलाकार आहेत? त्या कार्यक्रमात सादर होतात त्यामुळे हे किती दिवस चालेल हा सुद्धा प्रश्नच आहे. लावणी आज जास्त चालते, त्यातून पैसा मिळतो. यासाठी त्याचे सादरीकरण व्यवसाय म्हणून केले जाते, कला टिकावी म्हणून नाही. त्यामुळे लावणीचे भवितव्यही उज्ज्वल आहे असे नाही.

तमाशातील कलाकार हे खालच्या तळागाळातील असल्यामुळे आधुनिक काळातील बदलत्या परिस्थितीशी सामना करू शकत नाही. शिवाय त्यांचे समाज व्यवस्थेतील स्थान, त्यांची पत यामुळे त्यांना अस्तित्व टिकविणे अवघड आहे. कारण पारंपरिक समाजव्यवस्थेत आहे. तमाशात ही विषमता आहे हे मान्य करावे लागेल. (या उलट तमाशाचा फॉर्म घेऊन निर्माण झालेले चित्रपट मात्र चांगले चालतात. उदा : पिंजरा, नटरंग, चंद्रमुखी इ.) तमाशात नवनिर्मिती होणे बंद झालेल्यामुळे तमाशाचे भवितव्य अंधारात आहे. कारण आज ग्रामीण भागातही यात्रेला तमाशातील ऑकेस्ट्रामुळे वगनाट्य तर बऱ्याच ठिकाणी होत नाही. ज्या वगनाट्यातून समाजाचे प्रबोधन होते, ते होत नाही. गाणी संपली की लोक उठून जातात. त्यात शासनाने घातलेले वेळेचे बंधन ते तमाशाला पाळावेच लागते.

तमाशाच्या सध्याच्या परिस्थितीचा विचार करता गणगौळणीची नवीन निर्मिती थांबलेली आहे. त्यामुळे जुन्याच रचना सादर केल्या जातात. रंगबाजीत चित्रपट गीते आणि रेकॉर्ड गीतेच सादर केली जातात. त्याचा संबंध कुठल्याच विधीशी नसल्यामुळे समाजात त्याचे स्थान अढळ नाही. जसे जागरण गोंधळाचे आहे तसे. (बदलत्या परिस्थितीत जागरण गोंधळ टिकून आहे पण त्याला खाद्य पुरविणारा तमाशाच आहे.) वगनाट्य तर सादर होत नाही. त्यामुळे एखादा छोटा फार्स दाखविला जातो. पुढे तोही बंद होईल असेच वाटते. शिवाय महाराष्ट्रातील समाजव्यवस्था, ज्या समाजव्यवस्थेत तमाशा कलाकाराला मानाचे स्थान नाही, एखाद्या वस्तूचा उपभोग संपल्यानंतर ती टाकून दिली जाते, तसे तमाशा कलावंताचे जीवन आहे. त्यामुळे बदलत्या परिस्थितीत तमाशा आज तरी तग धरून आहे, पण पुढील काळात त्याचे भवितव्य काय असेल ते काळच ठरवेल.

सारांश, लोकाश्रय मिळालेल्या तमाशा कलेने मनोरंजनाबरोबर उद्‌बोधन, प्रबोधनाचे कार्य केले. गण, गौळण, लावणी आणि वगनाट्य असे त्याचे पारंपरिक स्वरूप होते. आधुनिकीकरणाच्या काळात त्यामध्ये बदल झाला. कलावंत, फडमालक कर्जबाजारी झाले. काही परागंदा झाले, काहींनी

आत्महत्या केल्या. पण त्यांच्या कल्याणासाठी शासनाने कोणतेही पॅकेज दिले नाही. तमाशाला आज राजाश्रयाची देखील गरज आहे, तर या लोककलांचे संवर्धन, संगोपन होईल, कलावंतांची दुर्दशा संपेल. अन्यथा कलावंत आणि तमाशाच संपेल. कलावंतांच्या मुलांसाठी शिक्षणाची सोय केली पाहिजे. जसे ऊसतोडणी मजुरांच्या मुलांसाठी साखरशाळा आहेत, तशाच प्रकारे तमाशा कलावंतांच्या मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. तरच या उपेक्षित कलावंतांचा उद्धार होईल. कलावंतांसाठी पेन्शन योजना प्रभावीपणे राबविली पाहिजे. अन्यथा तमाशाचे भवितव्य चिंता करण्यासारखे, अंधकारमय दिसते.

❑❑❑

# लोकसाहित्य :सांस्कृतिक चित्रण

लोकसाहित्य अलिखित अक्षर वाङ्मय आहे. समूहमनाचा गजर, मौखिक परंपरा, स्वयंस्फूर्त अमर लोकवाणी, हृदयाचे उत्स्फूर्त बोल आहेत. लोकमानस, लोकस्मृतीद्वारे जतन, रक्षण, संवर्धन, भव्यकल्पना, सूक्ष्म निरीक्षण, हृदयस्पर्शी चित्रे, लोकसाहित्य मानवी जीवनाचा संस्कृतीमधील एक भाग आहे. लोकमानसावर सुसंस्कार करते. लोकसाहित्य मानवी जीवनाच्या चित्रणाबरोबर आविष्कार वैशिष्ट्यपूर्ण आहे. लोकसाहित्य नव्या दृष्टीने अवलोकनाची गरज आहे. लोकसाहित्य आणि मूल्यसंस्कार (सत्य, त्याग, निष्ठा, प्रामाणिकपणा, उदारता इ.)

माणसाचे वेगळेपण साधने निर्माण करणारा, भाषेचा वापर करणारा यात आहे. विविध कथांचे अन्वयार्थ लावणे महत्त्वाचे आहे. लोकसाहित्याची व्याख्या, वर्गीकरण/प्रकारांची चर्चा अपेक्षित नाही. लोकसाहित्य अनुभवाचं शहाणपण-कुतूहलातून जन्म होतो. जगउद्धार, सर्वधर्मसमभावाचा विचार, 'विश्वची माझे घर' विचार रुजविणे, लोकशिक्षण, मानसिक आधार / माणसांची अगतिकता व्यक्त होते. इतिहास, भूगोल, निसर्ग लोकमानस, लोकजीवन, विश्वास, रूढी, परंपरा, समजुती, विधिप्रथा, बोली-भाषा, देवतासंबंधीच्या कल्पना, सांस्कृतिक, धार्मिक संकल्पना, यांचे चित्रण लोकसाहित्य करते. लोकरंजन, बोध, उपदेश, नीतिशिक्षण, वैज्ञानिकदृष्टी. समाजातील सर्व स्तरांचे प्रतिनिधित्व करते. लोकसाहित्य लोकविश्वास, सांस्कृतिक ठेवा, इ. चे जतन व संस्कृतीचे वहन करते.

भारतीय संस्कृती अतिप्राचीन आहे. मुळात देशाची भाषावर प्रांतरचना झाली आहे. प्रत्येक भाषिकाची संस्कृती भिन्न असलीतरी भिन्नतेतही एकता आहे. उदा. शंकर, देवीची पूजा देशभर होते. राज्य / प्रांत यानुसार कुलदैवतांची कल्पना बदलत जाते. सर्वधर्म सत्य, अंहिसा, पूजा मोक्ष व सहिष्णुतेचा संदेश देतात. प्रत्येक धर्माचे स्वतंत्र धर्मग्रंथ आहेत, जसे गीता, बायबल, कुराण इ. तसेच संस्थापक आहेत, जसे भगवान गौतमबुद्ध, म. पैंगबर, गुरुनानक, येशू ख्रिस्त, भगवान महावीर इ. जगातील विविध धर्माचे

तत्त्वज्ञान, विचार कमी अधिक सारखे आहेत, एका धर्माच्या मर्यादामुळे दुसरा धर्म उदयाला येतो. धर्म आणि संस्कृती हातात हात घालून जात असतात.

**हिंदुधर्म** किंवा वैदिक संस्कृती समाजाला नीतिकल्पनांचे शिक्षण देते, परंतु देवदेवतांची पूजा, त्यातून आलेले कर्मकांड, ब्राह्मणाचे स्तोम यामुळे याला विरोध झालेला दिसतो, तरीही हिंदू संस्कृती सर्वात प्राचीन आहे, हे कुणीही नाकारले नाही, धर्म नाकारला गेला.

**जैनधर्म** - भगवान महावीरांनी स्थापन केला. अहिंसा सर्व श्रेष्ठ आहे. त्यांनी मोक्ष मार्ग सांगितला. वैराग्य, समाधी, सन्यास, प्रज्ञा, उपवास व तप यांना विशेष प्राधान्य दिले. कल्याणमार्गात शुद्ध आचरण, अभक्षनिषेध, पुण्यमार्ग, दया, त्याग यांना महत्त्व आहे.

**बौद्धधर्म** - भगवान गौतम बुद्ध या धर्माचे संस्थापक आहेत. मानवाप्रमाणे प्राण्यांवर प्रेम करा, संघर्ष टाळा, सत्यकर्म करा आणि शांतता प्रस्थापित करा. 'युद्ध नको बुद्ध हवा' हा संदेश दिला गेला. कर्मकांड, जातिभेद नकार सांगितला, समता प्रस्थापित करा. बुद्धिप्रामाण्यवाद स्वीकारा. कर्म मार्ग स्वीकारा, अज्ञान मुक्ती, अंधश्रद्धा, कर्मकांडास विरोध, बळी प्रथेस विरोध यामध्ये दिसतो.

**इस्लाम (मुस्लीम)** - म. पैंगबराचा धर्म आहे. नमाज (प्रार्थना) परमेश्वरापर्यंत जाण्याचा मार्ग आहे. आपल्या उत्पन्नातील २ टक्के रक्कम(जकात)समाजासाठी देणे, मक्कामदिनाची पवित्र यात्रा करणे, हे सूचविले.

**येशूचा ख्रिश्चन/ख्रिस्ती** मानवी करुणा शिकवितो. जगा आणि जगू द्या, मूर्तिपूजा निषेध, श्रमप्रतिष्ठा, अहिंसा, व्यभिचार निषेध सूचविला.

धर्मग्रंथाची शिकवण हीच लोकसंस्कृती असते. काळाच्या ओघात लोकजीवन संस्कृतीत परिवर्तन होत असते. काळाच्या ओघात स्वानुभवातून समूहमनाची गरज म्हणून मौखिक परंपरेने हे लोकसाहित्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढींपर्यंत संक्रमित होते. काळाच्या ओघात आवश्यक ते बदल होतात. अनुभवाचे शहाणपण यात दिसते.

उदा. सर्व म्हणी 'पाना मागून आली तिखट झाली', 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा', 'घरोघरी मातीच्या चुली' इ.

संस्कृती ही मानवाच्या जीवनात पावित्र्य, मांगल्य आणते, कल्याणाची पूजा करते. भारतीय संस्कृती ही एकतेत भरपूर विविधता असलेली आणि विविधतेत एकता असलेली आहे. डॉ. आनंद यादव यांनी 'ग्रामसंस्कृती' या ग्रंथात यासंबंधी केलेले विवेचन महत्त्वाचे वाटते.

संस्कृतात 'प्रकृती' असा शब्द आहे. प्रकृती म्हणजे व्यापकदृष्ट्या स्वाभाविक स्थिती, 'प्रकृती'त जेव्हा बिघाड होतो, तेव्हा त्याला 'विकृती' म्हणतात, प्रकृतीवर हात चालवून माणूस जेव्हा आपल्या स्वतःच्या सोयीसाठी, हितासाठी तिच्यात काही बदल/परिवर्तन करतो, तेव्हा 'संस्कृती' तयार होते. प्रकृतीवर स्वतःला अनुकूल असे संस्कार करण्याच्या मानवी प्रेरणेतून 'संस्कृती' सिद्ध होते. संस्कृतीची गती ही 'सम्यक' म्हणजे 'चांगल्या' कृतीची गती असते. ती ऊर्ध्वगती असते. मानवी हिताच्या दिशेने, जाणारी, मानवाला उच्चस्थानावर / स्थितीवर नेणारी ती गती आहे. सारांश प्रकृतींत बिघाड केला की, विकृती तयार होते आणि मानवाला उच्चस्थिती प्राप्त करून घेण्यासाठी प्रकृतीवर संस्कार केले की संस्कृती सिद्ध होते. संस्कृती निर्माण करणे हा मानवी स्वभाव धर्म आहे.

भारतीय संस्कृती ही अतिथी देवो भव, मातृदेवोभव, पितृदेवोभव, गुरुदेवोभव असे शिकविते. स्त्रीची लक्ष्मी म्हणून पूजा / सन्मान करायला सांगते. रक्षाबंधनातून बहिणीच्या रक्षणाचे शिक्षण देते. तसेच लोकनायकांच्या वर्तनातूनही हे स्पष्ट होते. उदा. वारणेचा वाघ संतु भोसले, जुन्नरचा कोंड्या नवले. अनेक बहिणी त्यांच्या ओव्या गातात. संस्कृती सण उत्सवांची विधींचीही आहे. विविध सण आनंदाने आणि आनंदासाठी साजरे केले जातात.

उदा. **पंचमी** हे लोकगीत सर्वसणावारांचा परिचय करून देते.

पंचमीचा गेला डोळा
पुढे सवस आला पोळा
पोळ्याची निसत होते डाळ
पुढे आली घटमाळ,
घटमाळीचं कांदवांग
पुढे ब्राह्मण तिळसंक्रांत सांग

**दिवाळी** – प्राणी पूजा करणारी भारतीय संस्कृती आहे.

१. दिन दिन दिवाळी गाया म्हशी ओवाळी
   गाया म्हशी गुणाच्या... लक्ष्मणाच्या ...
२. कवड्या साप डोंगरी गेला
   त्याच्या तोंडी चिमण चारा.....
३. आरी गाय मोरी गाय
   मोरीला झाला नंदी.....
४. अंगाई मंगाई तामोली तंगाई

त्यामोळी तंगाईचे सीमसीम गोंडे
आपण गोफु चवर गोंडे
चवर गोंड्याच्या मावल्या
तेल घेऊन धावल्या

**दसरा (भोंडला)**

१. किसबाई किस दोडका किस
दोडक्याची फोड, लागते गोड...

२. आयलोमा पयलोमा गणेश देवा
आमचा खेळ मांडू दे.....

३. आईबाईचा कोंबडा
पाटीखाली डालला
पाटी गेली उडून
कोंबडा आला पळून
कोंबड्याच्या गळ्याला साखळी
बहीण माझी धाकली
पान खाया शिकली
तांबोळी बाबा नकटा
शेंडी धरून आपटा
शेंडीला आल्या शेंगा
सायबाचा बंगला
चुन्यान रंगला

**सिमगा / होळी / धुलीवंदन** - वीर काढणे, वाण, शेरणी वाटणे, लाकडांची चोरी करणे, होळीत टाकणे, रात्रभर राखण करणे, शेजारच्या गावातील लोकांच्या नावाने बोंब मारणे.

बोंबला रे बोंबला
होळी रे होळी पुरणाची पोळी
बामण मेला संध्याकाळी
त्याचा दिवस मंगळवारी (उद्या सकाळी)

**सण- वारांप्रमाणे व्रत, वैकल्य, चातुक्रिया तसेच विधी केले** जातात.

**जागरण** - खंडोबा/भैरोबाच्या नावाने जागरण केले जाते. काही भागात याला दिवट्या बुधल्या असेही म्हणतात. देवांची आराधना करताना कामपूर्तीसाठी द्वैअर्थी गीतही सादर केली जातात.

१. एकाला घालीत होती (काजळ)

एकला लावीत होती (कुंकू)
एकाच्या मुखाकडे
पाहून ती हासत होती (आरसा)
२. एकाला पाडीत होती. (पाट्याला)
एकाला लोटीत होती, (वरवंट्याला)
एकावर पाळी ती घालीत होती. (मसाल्यावर)

**गोंधळ** – देवादिकावरील श्रद्धेमुळे सर्व देवांना गोंधळाला निमंत्रण दिले जाते.

**पाळणा** – बाळा रडू नको रे, तान्या रडू नकोरे, आई प्रेमाणे हलविते पाळणा.

**ओवी** – दळण कांडण करताना महिला ओव्या गातात. श्रमपरिहार हा ग्रामीण उद्देश असतो. देवाला सर्वांकडे लक्ष देणं अशक्य झालं तेव्हा अपत्याच्या संगोपनासाठी, लक्ष देण्यासाठी देवाने आईवर जबाबदारी टांकली असे ही संस्कृती मानते.

**लग्नविधी मधून संस्कृती दर्शन घडते.**

पती परमेश्वर, पत्नी लक्ष्मी, एकनिष्ठेचे संस्कार लग्नविधी करते. इतर प्राण्यापेक्षा माणूस वेगळा आहे. तो साधन निर्माण करणारा प्राणी आहे. आपल्या विकासासाठी त्याने अनेक गोष्टी निर्माण केल्या, स्वहित, स्वकल्याण, विकास साधला. उदा. हळद लावणे, हळद जंतू नाशक आहे. वधुवरांचे आयुष्य उजळून निघू दे, हा कल्याणाचा वैज्ञानिक दृष्टिकोण दिसतो. हळदीनंतर मंडोळी बांधतात, त्यावेळचे एक गीत

पहिली मंडोळी कशाची
पहिली मंडोळी जाईची
एवढी हौस पुरवा नवरदेवाच्या आईची
दुसरी मंडोळी कशाची
दुसरी मंडोळी गव्हाची
एवढी हौस पुरवा नवरदेवाच्या बापाची
तिसरी मंडोळी कशाची
तिसरी मंडोळी चाफ्याची
एवढी हौस पुरवा नवरदेवाच्या भावाची
चौथी मंडोळी कशाची
चौथी मंडोळी रूईची
एवढी हौस पुरवा नवरदेवाच्या फुईची

पाचवी मंडोळी कशाची
पाचवी मंडोळी मोत्याची
एवढी हौस पुरवा नवरदेवाच्या गोताची

हे गीत नवरीला मंडोळी बांधतांना म्हटले जाते.

लग्नात मुली गीत गात होत्या आज सी.डी./रेकॉर्ड वाजते, त्यामुळे हे बंद झालेले दिसते. तरीही अपवादाने हे शब्द कानावर पडतातच...

ताई रडू नको ग रडू नको मनामधी
तुला दिलं नाही गं, दिलं नाही वनामंधी
तुझी सासू ग, सासू ग आईवाणी
तुझी ननंद ग नंनद ग बहिणीवाणी
तुझे सासरे ग, सासरे गं बापावाणी
तुझे दीर ग, दीर गं भावावाणी
तुझा नवरा ग नवरा ग पोपटावाणी

सासरमध्ये नववधूचे स्वागत करताना ननंदा हे गीत म्हणतात

दह्या तुपाचं आळ
साखरानं झालं काळ
दादा लेक झाला मोठा
होऊ दे ग जेठे बाई
तुला देईल कळपातली गाई

ननंदा हे गीत म्हटल्यानंतर दार धरतात, नववधूला अडवितात आणि मुलीची (सून म्हणून) मागणी मागतात, तेव्हा भाऊ (नवर देव) नववधूला सांगतो, बाई (बहीण) लेक मागते, तेव्हा ती नववधू उत्तर देते, होईल आम्हाला देऊ तुम्हाला. त्यानंतरच नववधू माप ओलांडून, भांडे ठोकरत गृहप्रवेश करते. भांडी घरामध्ये ठोकरली जातात. भांड्याला भांडे लागले की, आवाज होतो, तो घरातच ठेवा. पती पत्नीमध्ये मतभेद झाले तरी घरातच ठेवा उंबऱ्याच्या बाहेर जाऊ देऊ नका. मर्यादा पाळण्याची ही संस्कृती आहे. याप्रमाणे थट्टामस्करी, म्हणून काही गम्मत जम्मतही केली जाते.

उदा. मांडवाच्या दारी
आपटली फुकणी
नवरदेवाची बहीण
एक नाही देखणी

किंवा

मांडवाच्या दारी पडलं कौट

व्याहीण बाई भलतीच खौंट

याचप्रमाणे उखाणे घालून नाव घेतली जातात

आदिवासी जातीजमातींची विविध प्रकारची संस्कृती असलेली दिसते. महादेव कोळी, ठाकर, कातोडी, कोरकू, वडार, बेरडाची संस्कृती भिन्न भिन्न आहे. तसेच विविध देवदेवतांवरील श्रद्धेपोटी 'वारी' केली जाते, पंढरपूर, शिर्डी, जेजुरीची 'वारी' करणारे भाविक आहेत. 'वार', उपवास करणारे अनेक भाविक आहे. 'वारी'प्रमाणे बारीत रमणारे तमाशा रसिकही आहे. गण,गवळण, लावणी आणि वगनाट्याचे वेडही आहेच.

सारांश - आपल्या राष्ट्रगीतात, पंजाब, सिंधू, गुजरात, मराठा असे आपण म्हणतो, पंजाबी, सिंधी, गुजराथी, मराठी या भाषा भगिणी आहेत, आर्यांच्या आक्रमणाने मूळचे लोक स्थलांतरित झाले. पण संस्कृतीसह, प्रत्येक प्रांतात नवे नवे रूप तिने धारण केले, म्हणूनच भारतीय संस्कृतीत विविधता आहे आणि या विविधतेत एकताही आहे.

❑❑❑

# मराठी लोककथा : सांस्कृतिक सामाजिक जीवनदर्शन

लोककथा कशा रूढ होतात? निर्माण होतात? स्थिरवतात?त्यांच्या प्रेरणा कोणत्या? सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनदर्शन त्यातून कसे घडते? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा हा प्रयत्न आहे. व्याख्या, वर्गीकरणाचा तपशील विस्तार भयास्तव टाळलेला आहे.

समूहमनाचा गजर असलेल्या लोकसाहित्यातील लोकसमजुती, लोकगीत, लोककथा, म्हणी, उखाणे, हे लोकांच्या व्यवहारी शहाणपणातून जन्मलेले असतात. लोकभावनाची ती सामूहिक अभिव्यक्ती असते. कर्ता अनामिक असला तरी मुळात एकाच व्यक्तीची समाजमान्य, समाजस्वीकृत अशी ती अनुभती असते. सार्वत्रिक सत्य म्हणून स्वीकार झाल्यामुळे स्थळ, काळाच्या मर्यादा त्याला पडत नाही. समाजाच्या अपरिहार्य गरजेतून मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या किंवा पुढच्या पिढीकडे हा सांस्कृतिक ठेवा येतो, काळाच्या ओघात बदलत्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनात त्यामध्ये अपरिहार्यपणे बदल होणे स्वाभाविक असते, परिवर्तन, बदल हे जिवंतपणाचे लक्षण असते. प्रवाहीपणामुळेच लोकसाहित्य चिरकाल स्मरणात राहते. जीवनांचे अविभाज्य अंग बनते.

लोकमानस हा लोकस्मृतीद्वारे जतन केला जातो. हा अमोल ठेवा संवर्धन करण्याचे कामही समाजच करीत असतो. व्यक्तीला समाजाशिवाय अस्तित्व नाही, मुळातच मानव समूहप्रिय आहे. समूहातच तो घडतो, वाढतो, त्याच्यावर संस्कार होतात. जीवनातील शाश्वत सत्य अनुभवातील शहाणपण असते. समाजमन संस्कारित करण्याचे काम लोकसाहित्य करते. कधी गरजेनुसार भीतीदेखील घातली जाते, कारण त्यामुळे समाज सावध होतो, सरळमार्गाने वाटचाल करतो. नीतितत्त्वांचे पालन करतो.

**लोककथा मानवी समाजजीवन संस्कृतीमधील एकभाग असते.**

उदा. १. खंडोबाची कथा - आडगाव ता. राहाता जि.अहमदनगर येथे हेमाडपंथी मंदिर आहे, एका छोट्याशा टेकडीवर, तरीही बऱ्यापैकी उंची आहे. या खंडोबा मंदिराला पूर्वी सोन्याचे दरवाजे होते. चार चोरांनी दरवाजांची चोरी केली. गडाच्या पायथ्याशी आल्यावर चोरांच्या शिळा होऊन पडले.

LIBRARY AKOLE 422601. DIST. AHMEDNAGAR

आपल्या ग्रामदैवताची चोरी केल्यामुळे जागृत देवाने चोरांच्या शिळा केल्या. आज या शिळा गडाच्या पायथ्याशी आहेत. जाता येता भक्त मंडळी या मोठ्या मोठ्या दगडांना लाथ मारतात. कारण चोरांनी आपल्या कुलदैवतांच्या मंदिराचे सोन्याचे दरवाजे चोरले,

अन्वयार्थ - अतिशय दुष्काळी प्रदेशातील एका खेडेगावातील मंदिराला सोन्याचे दरवाजे असतील का? असा प्रश्न पडत नाही, श्रद्धेचा भाग येथे अधिक दिसतो. जागृत देवस्थानांची महत्ती लोकमतावर बिंबविली जाते.

२. फौजदार निवड कथा - एका गावातील फौजदाराची थोरवी सांगताना सर्वत्र ही कथा सांगितली जाते. फौजदाराच्या नोकरीसाठी या पोरांने अर्ज केला. लेखी परीक्षा- तोंडी परीक्षेत अनेकांबरोबर तो पास झाला. शारीरिक तपासणीसाठी सर्वांना निमंत्रित केले गेले. तपासणी करणारा साहेब रांगेत उभे असणाऱ्या सर्वांच्या तोंडात खाडकन लावत होता. गरजू, लाचार उमेदवार खाली मान घालून उभे होते. आमच्या स्वाभिमानी गड्याची पाळी आली. साहेबांने खाडकन थोबाडात मारली, उलट आमच्या गड्यानेही साहेबाच्या थोबाडात मारली. त्याची निवड झाली. तो फौजदार झाला.

अन्वयार्थ - समाजाचे रक्षण करणाऱ्याने मार खायचा नसतो, द्यायचा असतो. - स्वाभिमान जपा.

३. बापाला गडी म्हणून मित्रांना सांगणे, ही कथाही सर्वत्र सांगितली जाते, कथा अशी, एका साहेबाचा बाप फाटक्या, तुटक्या कपड्यातला, दाढी वाढलेला, अवतार दिसत होता, शेतात पिकलेलं घेऊन लाडक्या लेकाला सायबाला भेटायला गेला. साहेबांचे सहकारी हसू लागले, आपला अपमान होईल या चिंतेत असलेला साहेब आपल्या बापाची ओळख गावाकडे शेतावर काम करणारा गडी म्हणून करून देतो. बाप या अपमानाने खचतो, गावाकडे आल्यावर प्राण सोडतो.

अन्वयार्थ - आपली संस्कृतीही मातृदेवभव, पितृदेवभव असा संस्कार करणारी आहे. आपल्या शिक्षणासाठी जीवाचे रान करणाऱ्या, कष्टाळू बापाला गडी म्हणणाऱ्यांची नाही. त्यांचा आदर करा. सन्मान करा, असा संदेश ही कथा देते. 'दावण' कथासंग्रहात मात्र आनंद पाटलांनी या उलट कथा सांगितली आहे, त्यामध्ये वडिलांचा सन्मानच केला आहे.

४. घोपडीची कथा - छत्रपती शिवाजी महाराजांची राजवट, बादशहाच्या सैन्याने कोंढाणा (सिंहगड) वेढा दिला असता, तान्हाजी मालुसरे यांनी घोरपडीच्या शेपटीला नाडा बांधला, ती गडावर गेली, मावळे नाड्याला धरून गडावर पोहचले, गड आला पण सिंह गेला इ.

अन्वयार्थ - घोरपडीचा चिवटपणा मराठ्यांमध्ये असल्यामुळेच मावळ्यांनी गड सर केला, याचा शोध मला मागील वर्षी लावता आला. शिवनेरी किल्ल्यावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. अशोकराव चव्हाण यांना संभाजी बिग्रेडचे कार्यकर्ते घेराव घालणार होते म्हणून पोलिसांनी सर्व बाजूंनी नाकेबंदी केली होती, परंतु १९ फेब्रुवारी रोजी रात्री संभाजी बिग्रेडचे तरूण कार्यकर्ते शिवनेरीच्या मागील बाजूने किल्ल्यावर चढले, गनिमी कावा, दुसरे काय? सकाळी मुख्यमंत्र्याचे हेलीकॅप्टर किल्ल्यावर उतरल्याबरोबर मुख्यमंत्र्याना घेराव घातला. पोलिसांची धावपळ उडाली. आश्चर्य म्हणजे महाराष्ट्रीय माणसांची चिकाटी, अस्मिता येथे दिसते.

लोकसाहित्य मनावर सुसंस्कार करते, मानवी जीवन संस्कारित करते. संताच्या जीवनातील चमत्कार कथा महत्त्वाच्या आहेत.

उदा. ज्ञानदेवांनी रेड्याच्या तोंडून वेद वदविले किंवा त्यांनी भिंत चालविली. निर्बुद्धाला शहाणे करता येते, सामान्य माणसांना ज्ञान / भक्तिमार्ग त्यांनी शिकविला. अज्ञान दूर केले. चांगदेवाने केवळ सजीवावर नियंत्रण मिळविले, पण ज्ञानदेवांनी भिंत चालवून निर्जीवावर नियंत्रण मिळविले. तात्पर्य गर्वाचे घर खाली हा संस्कार यातून केला गेला आहे.

तुकारामाची गाथा इंद्रायणी नदीच्या डोहात तरली, ही कथा सर्वमान्य असली तरी देखील सत्य वेगळे आहे, सामान्य भक्तांच्या मुखी तुकोबांचे अभंग होते, त्यामुळेच ते एकत्र करून गाथा सिद्ध झाली. लोकजीवन संस्कृतीवरील तुकारामांचा असलेला प्रभाव यातून दिसतो, त्याप्रमाणेच समाजमान्य तुकोबा जगद्‌गुरू ठरले.

पैठणच्या एकनाथांनी काशीचे पाणी गाढवाला पाजले, ही कथा सूचित करते की, गरजवंताला सहकार्य करा, मदत करा, केवळ माणसालाच नव्हे तर प्राणिमात्रावर दया करा.

मानवी जीवन चित्रणाबरोबर लोककथांचा आविष्कारही वैशिष्ट्यपूर्ण असतो. संत महात्म्ये, महंत, वीरपुरुष, लोकोत्तर स्त्रिया, लोकनेते, देव देवता, प्राचीन वास्तू, नगरी, मंदिर, बांधकाम, मूर्ती, किल्ला, नदी, पूजाविधी, प्राणी पक्षी झाडे याबद्दल माणसाला जिज्ञासा असते, कुतूहल असते. यामध्ये विषयाच्या विविधतेबरोबर चमत्कार, कल्पकता, अद्‌भुतता आणि सत्य यांचे मिश्रण झालेले असते. लोकसमूहास वाटणारा आदर व अभिमान अतिशयोक्त आणि अद्‌भुत स्वरूपात व्यक्त होतो. अनेक लोककथामधून जगउद्धार, सर्वधर्मसमभावाचा विचार रुजविण्याचा प्रयत्न दिसतो.

लोककथा नव्या दृष्टीने अवलोकन करण्याची गरज आहे. लोकधारणेतून देवादिकांना नवस केले जातात. त्यांच्या कथा सर्वत्रच आहे. देवाला नैवद्य, दान देणे, बळी देणे, धन, पुत्रप्राप्ती, संकट निवारण, नोकरी, लग्नविधी, असाध्य आजार बरे होतात, यामागे समाजमानसाचे दर्शन घडते. आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानांचे - विज्ञानाचे असले तरी, अस्थिरता, अनिश्चिता, अगतिकता, दहशतवाद, बॉम्बस्फोट, महागाईने ते जर्जर झाले आहे. लहानांचे तर सोडा बिग बी अभिताभ बच्चनही सिद्धविनायकाला अनवाणी चालत येतो, उंदराच्या कानात मनोकामना व्यक्त करतो. तात्पर्य हेच की, सुख, समाधान, शांतीसाठी लोकपरंपराचा आधार मानवाला महत्त्वाचा वाटतो. बाप्पाचा उंदीर मनोकामना पूर्ण करतो ही मानसिकता समाजमनात खोलवर प्रभाव गाजविताना दिसते. लोककथांमधून मूल्यसंस्कार करण्याची मानसिकता दिसते. इतर प्राण्यापेक्षा माणसाचे वेगळेपण सांगितले जाते, तो साधने निर्माण करणारा, भाषेचा वापर करणारा आहे. गरज ही शोधाची जननी असते, गरजेपोटी जशी त्याने साधने निर्माण केली, तशाच स्वानुभवातून कथाही सांगितल्या. समाजमन घडविण्याचे कार्य केले. अनुभवाच्या शहाणपणातून किंवा कुतूहलातून लोककथांचा जन्म होतो. जगउद्धार, सर्वधर्मसमभावाची शिकवण किंवा विश्वची माझे घर असे विचार रुजविण्याचे कार्य लोककथा करतात, लोकशिक्षण करतात, मानसिक आधार देतात. माणसाच्या अगतिकतेवरील उतारा त्यामध्ये दिसतो.

लोककथामधून जी शिकवण मिळते ती सामान्य माणसाच्या जीवनाला आधारभूत बनते. माणूस मानसिक आधार शोधतो. संताचे असामान्यपण येथे नजरेत भरते. चमत्काराला लोक नमस्कार करतात म्हणून शुगर कोटेडपील (शर्करावगुंठित औषध) प्रमाणे चमत्कार, कल्पकता यांनी गुंफलेले सत्य माणसांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवनदर्शन घडविते, या कथामधून त्या त्या परिसरातील घटना, इतिहास, भूगोल, निसर्ग, लोकमानस, लोकजीवन, विश्वास, रूढी, परंपरा, समजुती, विधिप्रथा, बोलीभाषा, दैवतासंबंधीच्या कल्पना, सांस्कृतिक, धार्मिक संकल्पना याचे चित्रण आढळते.

लोकरंजन, बोध, उपदेश, नीती शिक्षण, वैज्ञानिक दृष्टी वाढविणे हे लोककथांमुळे शक्य झाले आहे, उदा. छत्रपती शिवाजी महाराजांची तुळजापूरची भवानीमाता, किंवा शिवनेरीवरील शिवाईवर जिजाऊची असलेली श्रद्धा जशी सर्वपरिचित आहे. जिजाऊचा त्याग जसा महत्त्वाचा आहे, त्याचप्रमाणे शिवबाची पर स्त्रीविषयक पवित्र दृष्टी कल्याणच्या सुभेदाराच्या कथेतून सूचित केली आहे. कल्याणच्या सुभेदाराची सून पकडून आणली

असता, 'अशाच आमच्या मातोश्री असत्यातर....' म्हणत तिचा छत्रपतींनी मातेप्रमाणे सन्मान करून परत पाठविले. परस्त्रीचा आदर करा, हे मानवी जीवन संस्कृतीला वळण लावणारे सूत्रच छत्रपतींच्या कृती उक्तीतून अभिव्यक्त होते.

निसर्गातील शक्ती, वृक्ष, प्राणी, वस्तू इ. च्या शक्तीचा समाजजीवन संस्कृतीवर प्रभाव असतो. प्राणी पक्षी वृक्षांची पूजा केली जाते, त्याच्याही अनेक कथा आहेत. वडपिंपळ महावृक्ष आहे, त्यांच्या पासून सावधान, या वृक्षांवर चढाल तर पडाल जखमी होण्यापासून सावधानतेचा इशाराच या कथांतून मिळतो.

सालवृक्षाची कथा- कुकडेश्वर ता. जुन्नर जि. पुणे (राम दादा लक्ष्मण...) देवादिकांना मानवी पातळीवर आणण्याचा प्रयत्नही यामध्ये दिसतो.

लोककथांची वैशिष्ट्ये / घटक - अद्‌भुतरम्यता, कल्पनाबंध, भ्रमणशीलता, समाजचित्रण, लोकसमजुती, कथेची घटना महत्त्वपूर्ण, वातावरण निर्मिती, व्यक्ती व पात्रे, अलौकिक जीवन, उत्प्रेक्षा या अलंकारांची योजना केलेली असते. समाजातील सर्व स्तरांना प्रतिनिधित्व दिलेले दिसते.

लोककथा, ही ग्रामीण, अशिक्षित समूहाची निर्मिती असते, अर्थात साक्षरतेचा तिला विटाळ नाही. लोककथेतील पात्र व घटनांचे स्थान अनिश्चित असते, मनोरंजन ही प्रमुख प्रेरणा असते. सुखात्म शेवटाकडे कल असतो. जन सामान्यांच्या विश्वासाशी संबंध आहे. लोकजीवनातील आचार-विचार, व्यवहाराशी संबंध आहे. परंपरेचा अंश असतो. सृष्टीमध्ये घडणाऱ्या विविध घटनांचे स्पष्टीकरण करण्याची प्रेरणा लोककथांच्या मुळाशी असते, निसर्ग आणि संस्कृती यांचे स्वरूप स्पष्ट करणे, त्याच्या विकासावर भाष्य करणे ही लोककथांच्या उत्पती मागील प्रमुख पेरणा आहे. लोकरंजनाचे माध्यम म्हणून लोककथांची निर्मिती झाल्यामुळे कथा सांगण्याची प्रथा रूढ आहे.

आदिमकाळात मानवाने सभोवतीच्या निसर्गदृश्याचा अर्थ लावण्याच्या प्रयत्नातून आलेल्या कथा पुढे सृष्टिज्ञान, धर्मभावना, नीतिशिक्षण, मनोरंजन करू लागली तर अलीकडे लोककथा समाजजीवनाशी एकरूप होऊन तिच्यात सामाजिकता अधिक आली. समाजातील रूढ धारणा, गैरसमज दूर करता येईल. उदा. गुप्तधनासाठी मांडूळ / गांडूळ / घुबड यांची तस्करी होत असल्याचे दिसते. अंधश्रद्धा दूर करता येईल. साती आसरांचा डोह, कोल्ह्याला द्राक्ष आंबट यातून समाज मानस अभिव्यक्त होतो.

❑❑❑

# लोकसाहित्य संशोधनाच्या नव्या दिशा

भारतामध्ये नव्हे तर जगामध्ये उच्च शिक्षणात संशोधनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सर्व ज्ञान शाखांमध्ये संशोधन कसे व का करावे याचे शिक्षण दिले जाते. म्हणून अनेक विषयात संशोधन होत आहे. मूलभूत संशोधन व्हावे म्हणून स्वतंत्र संशोधन संस्था देखील स्थापन झाल्या आहेत. अलीकडच्या काळापर्यंत देशात जवळ जवळ १६० पेक्षा जास्त विद्यापीठे संशोधन क्षेत्रात कार्य करीत आहेत. संशोधनासाठी विद्यापीठ अनुदान आयोग आर्थिक साहाय्य देखील पुरवत आहे. म्हणूनच संशोधनाचे क्षेत्र आज विस्तारत आहे. पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्यांना चांगले संशोधन येईलच असे नव्हे म्हणून एम.फिल., पीएच्.डी., डी.लिट, डी.एस्सी., अशाही पदव्या आहेत. जेणेकरून बारकाव्यांनिशी संशोधन होईल. संशोधकांमध्ये चिकित्सकवृत्ती वाढीला लागेल. आपणाला येथे वाङ्मयीन संशोधनाचा विचार अभिप्रेत आहे.

वाङ्मयीन संशोधन हे पृथक्करण प्रधानतेवर आधारलेले संशोधन आहे. शास्त्रीय संशोधनात जी माहिती प्रयोगाच्याद्वारे मिळविली जाते ती माहिती वाङ्मयीन संशोधनात पुस्तकातून मिळविली जाते. वाङ्मयीन संशोधनात प्रथमतः माहितीचे संकलन केले जाते. नंतर त्या माहितीचे सूक्ष्म अवलोकन करून निष्कर्ष काढले जातात. जी पद्धत शास्त्रीय संशोधनात असते तीच पद्धत येथेही वापरली जाते. वाङ्मयीन संशोधनात जी सामग्री व ज्ञान मिळविले जाते ती प्रयोगरूपाने काढलेल्या माहितीप्रमाणे निर्विवाद किंवा निरपवाद असेलच असे नाही. कारण आपली साधनेच तशी आहेत. त्याचबरोबर संशोधन करताना संशोधकाचा संबंध सौंदर्यशास्त्र, नीतिशास्त्र अशा प्रकारच्या शास्त्रातील अमूर्त मूल्यांशी असतो. असेही नव्हे की, आपल्या जवळ जी माहिती असते ती अव्वल दर्जाची नाही. अव्वल दर्जाचे साहित्य हेच नेहमी आपण प्रमाणभूत मानत असतो. म्हणून अभ्यासक प्राचीन ग्रंथाच्या संहिता ठरविताना दिसतात.



DN 3072

लोकसाहित्य संशोधन अडचणी, त्याच्या दिशा किंवा त्यावरील उपाययोजना काय आहेत याचा येथे संशोधक प्रवृत्तीनेच विचार करावयाचा आहे. गेल्या ५० ते ६० वर्षात विविध विद्यापीठ कार्यक्षेत्रात मराठी विषयाचे पीएच.डी./ एम.फिल चे अनेक प्रबंध सादर झाले. लोकसाहित्यावरील प्रबंधाचे प्रमाण अत्यंत नगण्य असे आहे. याची कारणे नेमकी काय असावीत, अडचणी काय असाव्यात अभ्यासाची/संशोधनाची कोणती दिशा शोधावी लागेल/उपाय शोधावे लागतील याचा बाराकाव्यानिशी विचार येथे अभिप्रेत आहे.

**प्रमुख अडचणी.**

१) मूळ अडचण म्हणजे संशोधनाचे स्वरूप आणि संकल्पना पद्धतीची माहिती नाही.
२) लोकसाहित्यात काही ठरावीक वाङ्मयप्रकाराचे संशोधन झाले.
३) नियतकालिकांचा अभाव
४) तात्त्विक अधिष्ठान, वैचारिक बैठक-आवश्यक, ढिसाळपणा, प्रेरणा निश्चित नाही.
५) लोकसाहित्य संस्थांचा अभाव.
६) नेतृत्व अभाव.
७) देशी जाणिवांचा अभाव.
८) आंतरराजीय साहित्य व्यवहार होत नाही.
९) सर्वदूर शिक्षणाचा अभाव.
१०) ऐतिहासिकतेचे भान नाही.
११) आर्थिकता/जगण्याचे प्रश्न.
१२) स्वागतशीलता.
१३) लोकसाहित्याविषयी आदराची भावना नाही. - प्रस्थापित संशोधन व्यवस्थेकडून उपेक्षा.
१४) आवर्तात सापडलेले साहित्य.
१५) इंग्रजी ज्ञान - गुणवत्ता सिद्ध - अन्य भाषांबद्दल अज्ञान.
१६) शासनाची उदासीनता.
१७) खाऊजा धोरणाचा परिणाम.
१८) रूढी परंपराग्रस्त साहित्य असा गैरसमज
१९) लोकसाहित्याकडे अभ्यासक तुच्छतेने पाहतात- भाषाशास्त्र, सौंदर्यशास्त्र या साहित्याचा अभ्यासक तोच सर्वश्रेष्ठ.
२०) मनोरंजन म्हणूनच या साहित्याकडे पाहिले. (हास्यास्पद)

२१) संकोचितवृत्ती सोडली पाहिजे.

२२) मुखपत्रिका हवी - लोकसाहित्यिकांनीच समीक्षा केली पाहिजे. लोक साहित्य चळवळ वाढली पाहिजे.

२३) प्रकाशन संस्थांचा अभाव.

२४) वाचन संस्कृती रुजविण्याचे काम करणे.

२५) शिबिरे, संमेलने, होणे आवश्यक, तरच संशोधन होईल.

२६) समूह भावना - समष्टीचे चित्रण होत नाही.

२७) लोकसाहित्य अलिप्तवादी धोरण - चळवळ संघटना यांच्याशी संबंध ठेवणे आवश्यक, न्यूनगंडाची भावना दिसते.

२८) स्त्री सन्मानाचा अभाव.

२९) प्रस्थापितानांच पुरस्कार (नवीन प्रेरित होत नाहीत). कसदार अभ्यासकांपर्यंत पोहचत नाही. पर्यायाने संशोधन होत नाही.

३०) साधन - संदर्भग्रंथाची मर्यादा.

३१) लोकसाहित्य चळवळ : प्रभाव - अभिनिवेश, वस्तुनिष्ठ संशोधन होत नाही.

३२) तटस्थतेच्या अभाव, वस्तुनिष्ठतेचा अभाव.

३३) लोकसाहित्याची हानी चुकीच्या मार्गाने, संशोधन होत असल्यामुळे लोकसाहित्य संशोधनाला मर्यादा.

३४) भलावण - पाठराखण, गट-तट, चाहत्यांचा वर्ग, पाठ थोपटण्याची - खोटी स्तुती करण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते.

उपाय :-

१) नव्या संशोधक अभ्यासकांनी आज चिंतन करून पूर्वसुरीच्या अभ्यासकांच्या लेखन-संदर्भात यथायोग्य वापर करून, नव्याने लेखन करण्याची गरज आहे. उदा. लोकसाहित्य संशोधनाचा इतिहास लेखन केल्याने अनेक प्रश्न सुटतील, त्यासाठी प्रकल्प हाती घ्यावे लागतील. मुखपत्र सुरू केले पाहिजे.

२) चळवळीच्या निमित्ताने असलेला प्रभाव - अभिनिवेश दूर करून वस्तुनिष्ठ मांडणीची गरज आहे.

३) संशोधन शिस्त पाळून, वाङ्मय निकष, समीक्षा, संशोधन पद्धतीने करणे, शिवाय नव्याने स्पष्ट भूमिका घेणे आज गरजेचे आहे.

४) योग्य मार्गदर्शनाची गरज - मार्गदर्शक -संशोधक विद्यार्थी समन्वयाची गरज.

५) संशोधन क्षेत्रातील अनिष्ठ गोष्टींना थारा न देता, संशोधन हाच यावरील उपाय आहे. अन्य चळवळींनी नाकारलेले स्वंयघोषित विद्वान दूर ठेवले पाहिजे.

**संशोधनासाठी नवीन विषय :**

१. लोकसाहित्य आणि जागतिकीकरण.
२. लोकसाहित्य आणि कृषी साहित्य साम्यभेद.
३.लोकसाहित्य आणि साठोत्तरी वाङ्मय.
४. हिंदी-मराठी लोकसाहित्याचा तुलनात्मक अभ्यास.
५. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त हिंदी -मराठी कांदबरीतील लोकतत्त्व.
६. रंजनवादी लोकसाहित्य.
७. लोकसाहित्याची शैली.
८. लोकसाहित्यातून आविष्कृत होणारे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन
९. लोकसाहित्याचे बोलीविज्ञान.
१०. लोकसाहित्यातील प्रादेशिकता.
११. लोकसाहित्य आधुनिकतेचा परिणाम.
१२. लोकसाहित्यातील खेडे.
१३. लोकसाहित्य आणि राजकारण
१४. २१वे शतक आणि लोकसाहित्य.
१५. शेतकऱ्यांचे प्रश्न : लोकसाहित्य.
१६. लोकसाहित्यातून आविष्कृत होणारा निसर्ग.
१७. लोकसाहित्यातील स्त्री प्रतिमा.
१८. लोकसाहित्यातील स्त्रीचे स्थान.
१९. शेतीचे प्रश्न आणि लोकसाहित्य.
२०. लोकसाहित्यातून ध्वनित होणारे शैक्षणिक प्रश्न
२१. अप्रकाशित लोकसाहित्य - एक चिकित्सक अभ्यास.
२२. लोकसाहित्य निवेदन तंत्र - एक अभ्यास.
२३. लोकसाहित्यातील प्राणी जगत. एक चिकित्सक अभ्यास.
२४. लोकसाहित्यातील - गावकुसाबाहेरचे जीवन.

मुस्लीम बांधवाच्या प्रथा, परंपरा, सांस्कृतिक जीवन, लोकजीवन हे ख़ेड्यातील लोकजीवनाशी एकरूप झालेले दिसते, त्याचा स्वतंत्रपणे अभ्यास करता येईल, तसेच बौद्धधर्मीय, ख्रिश्चन धर्मियांची वैचारिक भिन्नता मान्य केली तरी भाषा माय मराठीच आहे, त्यांच्या सन उत्सवात मराठी भाषिक सहभागी होतातच, त्यामुळे त्यांच्या लोकजीवन संस्कृतीचा अभ्यास झालेला

नाही तो करता येईल. तौलनिक लोकसाहित्य अभ्यासाचे क्षेत्र त्यातून समृद्ध होईल.

बोली भाषा, प्रदेश, जात, धर्म यांच्या सीमारेषांचे प्रांत ओलांडून तौलनिक अभ्यास केल्यास लोकसाहित्याचे संशोधन परिपूर्ण होईल. भाषांतरित साहित्यातून येणारे लोकजीवन चित्रण उदा. गुजराथी, कानडी यांचेही संशोधन केल्यास व्यापक जीवन पटाचे वस्तुनिष्ठ दर्शन होईल. तरीही काही मर्यादा मान्य करूनही जे संशोधन झाले जे क्षेत्रीय संशोधन कार्य झाले त्याची मौलिकता नाकारता येत नाही.

❑❑❑

LIBRARY AKOLE

# जुन्नर तालुक्यातील लोकसाहित्य :संशोधनाच्या नव्या दिशा

छत्रपती शिवरायांची जन्मभूमी असलेल्या जुन्नर तालुक्यातील लोकवाङ्मय, सांस्कृतिक जडणघडण वैशिष्ट्यपूर्ण आहे. विविधतेने समृद्ध अशा या तालुक्याचे दोन भाग करता येतात. एक पूर्वेकडील शेतावर अवलंबून असणाऱ्यांचा आणि दुसरा पश्चिमेकडील आदिवासी विभाग होय. या दोन्ही भागांची भौगोलिक रचना वेगळी आहे, नद्यांचा उगम आणि पाच धरणे पश्चिम घाटात तर नद्या, कॅनॉलचे पाणी पूर्वेकडील भागातून जाते, त्यामुळे येथे समृद्धी आहे, त्यामुळे दोन्ही भागातील लोकजीवन संस्कृतीत भिन्नता आढळते, पूर्वेकडे नारायणगाव हे लोकनाट्याची पंढरी म्हणून सर्वश्रुत आहे, तर ओतूर हे बाबाजी चैतन्यांनी संत तुकारामांना रामकृष्णहरीचा मंत्र दिला म्हणून परिचित आहे. आणे येथे संत रंगनाथ स्वामींचा भाकरी आमटीचा महाप्रसाद आजही वाजत गाजत परंपरेप्रमाणे त्यांच्या पुण्यतिथीला होतो. आळे येथे रेड्याची समाधी आहे, त्यासंबंधीच्या आख्यायिका आहेत. उलट पश्चिमेकडील भागात महादेव कोळी, ठाकर, कातोडी समाज शेती, जंगल यावर उदरनिर्वाह करतो, त्यांचे लोकजीवन विलक्षण आहे, त्याचप्रमाणे सावकारी विरोधी आवाज उठविणारा, सामान्यांचा सखा असलेल्या कोंड्या नवलेच्या फकिरा, वारणेचा वाघ, सतू भोसले तंट्या भिल्ल यांच्या प्रमाणे लोककथाही आहेत. अनेक गड, किल्ले, मंदिरांचा हा भूभाग प्राचीन दंडकारण्य म्हणून प्रसिद्ध आहे, रामायणकाळातील अनेक लोक कथा येथील निरक्षरांकडे मौखिक परंपरेने आलेल्या आहेत, लोककथा, गीत, म्हणी, वाक्प्रचार, प्रथा या भूमीत रूढ आहेत, थोडक्यात जुन्नर परिसरात नर्तन आहे, कीर्तन आहे, बारी आहे, वारी आहे, देवदेवतांची मंदिरे आहेत, शिवकाळातील लोककथा, लोकगीते आहेत, सांस्कृतिकदृष्ट्या अतिशय समृद्ध अशी ही परंपरा आहे, विलक्षण लोकजीवन आहे, हा सर्व मौलिक ठेवा काळाच्या उदरात गडप होण्याच्या मार्गावर आहे, म्हणून त्याचे संकलन, वर्गीकरण, संशोधन करण्यासाठी संधी आहे. संकलनात असंख्य अडचणी आहेत, हे मान्य करूनही हे संचित जपता येईल,

जपले जावे असे वाटते म्हणूनच दिशादर्शक असा हा शोध लेख लेखनांचा प्रपंच आहे.

जुन्नर तालुक्यातील लोकसाहित्य :संशोधनाच्या नव्या दिशा या दृष्टीने शोध घेताना पुढील प्रमाणे वर्गीकरण करता येईल.

१. पूर्वेकडील लोकजीवन आणि संस्कृती

२. लोकनाट्याची पंढरी नारायणगाव

३. जुन्नर तालुक्यातील वारकरी परंपरा

४. शिवकालीन लोकजीवन परंपरा

५. जुन्नर तालुक्यातील देवदेवता

६. लोकनायक कोंड्या नवले : जीवन आणि कार्य.

७. आदिवासी हिंदू महादेव कोळी समाजजीवन-संस्कृती

८. ठाकर समाज लोकजीवन- परंपरा

९. दुर्लक्षित कातोडी : लोकरहाटी

१०. धरणग्रस्त विस्थापितांचे जीवन आणि लोकसाहित्य

११. जुन्नर तालुक्यातील अध्यापिका.

उपरोक्त विविध उपघटकांच्या आधारे जुन्नर तालुक्यातील लोकसाहित्याचे संशोधन करता येईल, त्याचप्रमाणे प्रत्यक्ष सूक्ष्मपणे अभ्यास करताना नवीन गोष्टी उपलब्ध होऊ शकतील. कृषी-जीवनातील बदल अभ्यासता येतील. जुन्नर तालुक्यातील सर्वात महत्त्वाची आज नोंद घेण्यासारखी गोष्ट म्हणजे सामुदायिक विवाह संकल्पना होय. अतिशय अल्पखर्चात वडज, लेण्याद्री, ओझर या धार्मिक ठिकाणी आणि गावोगावी असलेल्या मंडळाकडून सामुदायिक विवाहांचे आयोजन केले जातात. वेळेवर लग्न लावणे, थाटमाट, डामडौल टाळणे, त्यामधून सर्वधर्मसमभावाची शिकवण देणे हे सामुदायिक विवाहांचे योगदान आहे. तसेच अलीकडच्या काळात शासनाच्या आदिवासीसाठी असलेल्या शुभमंगल योजनेतून केवळ आदिवासींचे सामुदायिक विवाह संपन्न होतात, त्यामध्येही विविधता आहे, परंपरा सांभाळून कमी खर्चात प्रतिकूल परिस्थिती असणाऱ्यांचे विवाह संपन्न होतात, याचा नव्याने शोध घेता येईल. गरज आहे ती परिश्रमाची, प्रतिकूल परिस्थितीवर आणि एकूणच संकलन समस्यांवर मात करण्याची

**१.जुन्नर तालुक्यातील लोकदैवते**

**वडज व धामणखेल खंडोबा**

१. खंडोबा मंदिर हे डोंगरावर आहे. पुजाऱ्याला वार्धक्यामुळे डोंगरावर जाणे अशक्य झाल्यानंतर देव भक्तासाठी खाली आले आणि

बोरीच्या झाडात स्थिरावला. २. बेडी घालण्याची प्रथा, घरातील थोरल्या मुलांने बेडी घालण्याची म्हणजे चंपाषष्टीच्या काळात आठ-दहा दिवस मंदिरातच रहायचे, घरी यायचे नाही, घरचे लोक भाकरी पुरवितात. ३. कौल लावणे : देवाला कौल लावण्याची प्रथा वडज येथे आहे. कार्यारंभी किंवा आजाऱ्यासाठी गरजू मंदिरात कौल लावतो.

**आणे - आमटी भाकर प्रथा** : संत रंगनाथ स्वामी यांच्या पुण्यतिथीला दरवर्षी डिसेंबर महिन्यात आमटी भाकरीचा महाप्रसाद केला जातो, या वर्षी दोन-अडीच लाख रुपयांचा मसाला आमटीसाठी लागला. पुढील २० वर्षाचे भक्तांचे नंबर बाकी आहेत. लाखो लोक येथे दोन दिवसांच्या महाप्रसादासाठी येतात. महाप्रसाद घरीही दिला जातो.

**आळे - रेड्याचे मंदिर** - ज्ञानदेवांनी रेड्याच्या तोंडून वेद वदविले.

**ओतूर -कपर्दिकेश्वर - तांदळाच्या पिंडी**

श्रावणाच्या तिसऱ्या सोमवारी पुजारी कलाकुसर केलेल्या आकर्षक अशा तांदळाच्या पिंडी मंदिरात ठेवतो, देवदर्शन आणि पिंडी पाहण्यासाठी लाखो भक्त ओतूरला येतात.

**मुक्ताई देवी** - नारायणगाव येथे महाराष्ट्रातील सर्व तमाशा फड हजेरी लावतात, विठाबाई भाऊ मांग यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळाला, त्या या नारायणगावच्या होत्या, तमासगीरांच्या फडांना या ठिकाणांहून जत्रेच्या सुपाऱ्या मिळतात. महाराष्ट्रात यात्रांची सुरवात नारायणगावच्या मुक्ताई यात्रेपासूनच होते.

**कालिकामाता** (जुन्नर), वरसूबाई, अंबा अंबिका, अशी अनेक देवतांची मंदिरे जुन्नर तालुक्यात आहे. जुन्नर गावात शंकराची १२ मंदिरे आहेत ती ज्योतिर्लिंगाच्या नावाने ओळखली जातात. हटकेश्वर, हाडसर, चावंड, किल्ल्यांवर शंकराची मंदिरे आहेत.

**शिवाई देवी** चे मंदिर शिवनेरीवर आहे. या देवीच्या नावावरून जिजामातेने सुपुत्राचे नाव शिवाजी असे ठेवले. कुसूर ग्रामस्थ नवरात्रात मोठा उत्सव करतात. महाप्रसादाचे आयोजन केले जाते, तालुक्यातील आणि बाहेरचे सर्व भक्त भक्तिभावाने सहभागी होतात.

**लेण्याद्री-ओझर** - अष्टविनायकापैकी दोन तीर्थक्षेत्र येथे आहेत, लेण्याद्रीचा गिरीजात्मक डोंगरात आहे तर ओझरचा विघ्नहर सपाट भागात आहे, या देवतांसंबंधी अनेक कथा अभ्यासण्यासारख्या आहेत.

**तुळजाई** शिवाजी महाराजांची देवी असे लोक मानतात. ही देवी शिवनेरीच्या पश्चिमेला दोन किलोमीटर अंतरावर आहे. देवीच्या दर्शनासाठी नवरात्रात वाघ रात्री बाराला येतो असे पुजारी सांगतात.

**उंब्रज -महालक्ष्मी**- ही मळगंगा आहे, पारनेर तालुक्यातील (निघोज) मळगंगा भक्ताच्या आग्रहाखातर उंब्रजला आली अशी कथा सांगितली जाते.

**बेलसर** ता. जुन्नर वरसुबाई - घागर मंदिरात काहीही नाही अशी खात्री सर्व भाविक करून घेतात. काल्याच्या कीर्तनाच्या दिवशी (डिसेंबर महिन्यात) पुजारी स्नान करून मंदिरात जातो, त्यानंतर मोठा स्फोट होतो, कुंकवाने भरलेली घागर अंगावर ओतून घेत, घागरीसह पुजारी बाहेर येतो. मोठा उत्सव होतो, सर्व भक्त त्यात सहभागी होतात, ही प्रथा आजही चालू आहे. ३० डिसेंबर २०११ रोजी नुकताच हा उत्सव पार पडला.

**खाणगाव** - घागर - सर्प - खाणगाव मंदिराचा पुजारी तळ्यावर अंघोळीला जातो, कळशी भरून आणतो, त्यामध्ये पाण्याऐवजी गुलाल असतो, तो मंदिरात जातो त्याठिकाणी सर्प वास्तव्य करतो, सर्वजण पूर्वी तो बघत असे परंतु अलीकडे हे बंद झाले.

**२. नाट्यात्मकता** : वारणेचा वाघ, सतू भोसले किंवा खानदेशातील तंट्या भिल्ल याप्रमाणे ही लोकनायकाची कथा आहे. त्याचे वशंज आजही उस्थळला किंवा उच्छील येथे आहेत. कोंड्या नवले हिंदू मराठा होता, त्याचे वडील सामान्य शेतकरी होते. त्यांनी सावकाराकडून कर्ज घेतले, कर्ज वेळेत परतफेड करता आले नाही, सावकारने धमकी दिली, दमदाटी केली. सावकारीच्या या काळात कोंड्या तरूण होता. वडिलांवरील अन्याय त्याला सहन झाला नाही. त्याने सावकाराला मारहाण केली आणि जंगलात दाऱ्या घाटात फरार झाला. सावकारांबद्दल/सावकारीबद्दल तिरस्कार करू लागला. तरुणांच्या सहकार्याने सावकाराविरुद्ध बंड उभारले. सर्वत्र त्याची दहशत पसरली. गरिबाला/ कर्जबाजारी माणसाला तो मदत करू लागला. त्याचा ठाण्यापर्यंत दरारा होता. भिवंडीच्या सावकाराला त्याने आव्हान दिले होते. दिवसाढवळ्या तुझे नाक कापणार आहे. सावकाराला ते अशक्य वाटत होते, परंतु दिवसा लग्नाची वरात काढून तो सावकाराच्या दारावर गेला, त्याला पकडले, मांडीवर घेतले, सावकाराचे १२ वाजता नाक कापले व पसार झाला. अनेक बहिर्णींचा भाऊ, सावकारांचा कर्दनकाळ, जुन्नर तालुक्यातील धनाढ्यांना वठणीवर आणणारा, लोकांच्या फंदफितुरीमुळे मारला गेला. बायको बाळांत झाली म्हणून तिला भेटण्यासाठी तो आला असता पोलिसांनी घराला वेढा दिला. त्यावेळी त्याने साडी नेसली आईने दार उघडले, खराट्याने मारत घराबाहेर आणले. काम करत नाही असे म्हटले, शेवटी तो पोलिसांना आव्हान देऊन डोंगरावर पळाला. पोलिसांनी गोळ्या घातल्या.

**३.वानगी दाखल काही लोकगीते पुढीलप्रमाणे** -

विवाह लोकगीत

गाडी माग गाडी, गाडी चालली लईना
सवाशे वऱ्हाड सांगा, नवरीच्या फुईला
गाडी माग गाडी गाडी चालली कापाला
सवाशे वऱ्हाड सांगा नवरीच्या बापाला
यह्या माझ्या दादारे तुझ बोलण वंगाळ
मांडवाच्या दारी पाय धुयाला घंगाळ
यह्या माझ्या दादारे तुझ बोलणं घरात
मांडवाच्या दारी पाय धुयाला परात
मांडवाच्या दारी आहेराची ठेला ठेली
रूसून फुगुन यहीन दारात गं आली
मांडवाच्या दारी गं जावा जावांचा रुसवा
भावाचा आहेर, सोयऱ्यांचा आहे जावू बाईला नेसवा

सासरी जाताना :-

डोंगराच्या कडा कडान खालून वर चढते
खालून वर चढते, आठवण माहेराची येते
बापाशिवाय करमत नाही म्हणून मी रडते
म्हणून मी रडते आठवण माहेराची येते.
डोंगराच्या कडा कडानं खालून वर चढते.
आईशिवाय करमत नाही, म्हणून मी रडते.

वधूची ओटी भरताना :

काळया वावरी पेरीला मका
आला वारा दिला झोका
नारळाचे नारळ तोडा
ताईबाईची वटी भरा ....

**४. लोककथा -**

मूळच्या दंडकारण्यात राम, लक्ष्मण, सीता वास्तव्यात होते असे येथील लोक मानतात म्हणून एक कथा सांगितली जाते.

**सालवृक्षाची कथा**

सालवृक्षाचे फळ हे पूर्वी रसाळ आंब्यासारखे होते, आज ते चिपाडा सारखे आहे, कारण आकाशवाणी झाली. १४ वर्षे स्त्री पासून दूर असले आणि १४ वर्षे उपवास केला असेल तोच रावण सेनेचा पराभव करील, तेव्हा राम धनुष्यबाण खाली ठेवायला लागला, अशा वेळी लक्ष्मण म्हणाला,

''थांबा दादा धनुष्य खाली ठेऊ नका. मी १४ वर्षे स्त्री पासून दूर आहे, १४ वर्षे उपवास केला आहे.'' त्यावर रामाचे समाधान झाले नाही, तेव्हा राम म्हणाला ''लक्ष्मणा परवा मी तुला फळ दिले होते ते तू खाल्ले, मग कसला उपवास'', त्यावर लक्ष्मणाने सांगितले ''राम दादा तुम्ही फळ दिले, तेव्हा फळ ठेव म्हणाले, खा म्हटले नाही, म्हणून ते फळ मी दंड फाडून त्यामध्ये ठेवले.'' ते फळ लक्ष्मणाने दंडातून काढले तेव्हा ते पूर्ण पिकले होते, त्याचा रस गळत होता, तेव्हा पासून साल वृक्षाच्या फळाला शाप मिळाला ते रसहीन झाले चिपाडासारखे दिसू लागले. आज ते हाताच्या मुठीत घेतल्यावर त्याची प्रत्येक पाकळी बोटाच्या फटीतून वरती येते.

**५. जाती-जमातीमधील काही प्रथा :** परंपरा प्रमाणेच रीतिरिवाजही येथे सांगितले जातात, जसे ठाकरांच्या लग्नात शेवटी मेड हलविण्याची प्रथा आहे, मेड हलविणे म्हणजे अन्न संपले. ठाकर अतिशय बुजरा असल्यामुळे नवरदेव लग्नाला जाताना घोगडी पांघरून आडमार्गाने किंवा रानवाटेने जातो. मुलीला द्याज देण्याची पद्धत आहे. तरी कातोडी, कातकरी नदीकाठी राहतो, मासे पकडतो, जन्मलेले मूल वाळूत गळ्यांपर्यंत पुरतात. ठाकर आणि कातोडी निसर्गावलंबी आहेत, तर हिंदू महादेव कोळी मात्र शेती करणारा कुणबी आहे. पानकोळी पखाल कोळीही आहेत.

वऱ्हाडच्या डोंगराची कथा, माणमोडी डोंगराची कथा, येथे सांगितली जाते. पंचलिंग कथा, अंबा-अंबिका डोंगर, कुकडेश्वर मंदिर कथा, स्वयंभू गणपती कथा, बेलसरच्या घागरीची प्रथा किंवा खाणगावच्या नागाची प्रथा येथे सांगितली जाते. दाऱ्याघाट, नाण्याघाट, गोण्या आणि माळशेज असे चार घाट कोकणाला जोडले जातात. सह्याद्रीच्या कुशीतील या घाटाच्या देखील कथा आहेत, मराठा, कुणबी, माळी आणि अन्य समाजाबरोबर हिंदू महादेव कोळी, ठाकर आणि कातोडी यांचे लोकजीवन संस्कृतीचा शोध जसा घेता येईल. तसेच जुन्नर आणि परसिरात मुस्लिमांच्या अनेक मशिदी, दर्गे आहेत, त्याचेही लोकसाहित्य अभ्यासता येईल. जुन्नर हे मुस्लीम आमदानीत जुम्मानेर होते, त्याचे पुढे जुन्नर झाले, जु म्हणजे दोन, नेर म्हणजे शहर किंवा ठिकाण, दोन नद्यांच्या मध्ये (कुकडी आणि मीना) वसलेले शहर ते जुम्मानेर होय. नेहर म्हणजे नदी असे ही सांगितले जाते. जुन्नर शहराच्या जवळ बादशहा तलाव आहे, बादशहाच्या घोड्यांसाठी पाणी पाजण्याचा तलाव, असाच तलाव शिवनेरी किल्ल्यावर शिवजन्माजवळ आहे, बादशहा तलाव या ठिकाणी एक फकीर वास्तव्यास होता, बादशहाने त्याला भेटीस बोलाविले, धनदौलत देऊ केली, फकिराने त्यास नकार दिला, वाटल्यास बादशहानेच गरज असल्यास

भेटीस यावे असे सूचविले, म्हणून बादशहा फकिराच्या भेटीला आला अशी आख्यायिका येथे सांगितली जाते. औरंगजेब बादशहा येथे तीन दिवस मुक्कामाला होता. फकीर मोठी हस्ती होती, फकिराला भेटायला राजा आला.

शिवनेरीच्या पायथ्याला दर्गा आहे, मंगळवार, शुक्रवार हिंदू-मुस्लीम तेथे जातत. फकिराचे दफन येथे केले आहे, त्यांचे अस्तित्व येथे आहे. फकीर देवाच्या जवळचे, देवाचे दोस्त असतात. कबरीमध्ये जिवंत असतात, आत्मा जिवंत असतो, त्यांच्या वशिल्याने देवाकडे आपण मागणे मागू शकतो, अशी श्रध्दा आहे, ज्याप्रमाणे साई बाबा शिर्डीत जिवंत आहेत, ही श्रध्दा येथे आहे.

लेण्याद्री येथे बौध्द चैत्य व अनेक लेण्या आहेत. त्या बौध्दकालीन आहेत. जुन्नरमध्ये उत्खनन केल्यानंतर बरेच पुरावे सापडले आहेत. कल्याण जुन्नर मार्गावर नाणेघाटात टोल वसुलीसाठी रांजण आहे. त्यासंबंधीही लोककथा असू शकतील त्याचा शोध घेता येईल. तसेच ख्रिश्चन धर्मियांची लोकजीवन संस्कृतीचाही अभ्यास करता येईल. तसेच जुन्नर व पाडळी या ठिकाणी रीमांड होम व मिशनरी केंद्र आहे त्यासंबंधीही अभ्यास केला जाऊ शकतो.

सारांश - हिंदू मुस्लीम, नवबुध्द, खिस्ती, आदिवासी, तमासगीर, वारकरी, देवदेवता इ. संबंधी जुन्नर तालुक्यात अनेक लोकसमज आहेत, जुन्नर तालुका हा मंदिरे देवदेवताच्या प्रभावाचा तालुका आहे. लोकगीत, कथा, परंपरा त्यांच्या लोकजीवन संस्कृतीत एकवटलेले आहेत. जागतिकीकरणात, शिक्षणप्रसारात हे लोकसंचित नष्ट होण्याच्या मार्गावर आहे, त्याचे संकलन व्हावे, त्यावर संशोधन व्हावे ही अपेक्षा.

❑❑❑

# लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य

ग्रामीण साहित्याचे मूळस्त्रोत, उगमस्थान लोकसाहित्यात आहे. भेद एवढाच की, येथे लेखकनाम समोर येते. ग्रामीण साहित्यात देखील लोकमानस, लोकसंस्कृती, रूढीपरंपरा, प्रथा इत्यादींचे चित्रण होताना दिसते. उदा. अण्णाभाऊ साठे यांच्या 'फकिरा' कादंबरीतील जोगतिणीची प्रथा ही लोकविश्वासातून आली आहे. श्री.ना.पेंडसे 'हद्दपार' मधून शेरणं प्रकरण चित्रित करतात, ते लोकसमाजाचे द्योतक आहे. तर र.वा. दिघे 'सराई' मधून कातोडी समाजातील प्रथा चित्रित करतात. उदा. मुलाच्या पाचवीच्या लोबंराची (भाताचे कणीस) पूजा करतात; किंवा मृतास मूठमाती देताना गीत गाऊन पुन्हा कातोड्याच्या जन्माला येण्याची विनंती करतात. हे परंपरेने चालत आलेले दिसते. मधुकर वाकोडे 'झेलझपाट' मधून कोरकूंच्या जीवनशैलीचे दर्शन घडवितात. तर रणजित देसाई 'बारी' तून बेरडांच्या नष्ट होऊ घातलेल्या लोकजीवनाचे चित्रण करतात. ही उदाहरणे देण्याचा उद्देश एवढाच की लेखकांच्या संस्कारक्षम वयात त्याने आपल्या, घरात, ग्रामात, प्रदेशात काही परंपरा, रूढी, प्रथा, पाहिलेल्या, अनुभवलेल्या, जगलेल्या असतात. त्याचा खोल संस्कार त्याच्या मनावर स्वाभाविकपणे झालेला असतो. प्रत्यक्ष लेखन करताना या पारंपरिक जीवनापासून त्याला चित्रित करावयाचा अनुभव वेगळा काढताच येत नाही. म्हणून अनुभवाचे एक अविभाज्य अंग म्हणून लोकमानस, लोकसंस्कृती व परंपराचे चित्रण तो निर्माता स्वाभाविकपणे करतो, नव्हे ते त्याच्याकडून होत असते. 'साहित्य' आणि समाज यांचा 'तेन' ने मांडलेला वंश, परिस्थिती, युगप्रवृत्तीचा परस्पर संबंध असतो, हेही उपरोक्त विवेचनावरून स्पष्ट होईल.

शहरांच्या तुलनेत ग्रामजीवनात आजही अधिक सहजता, स्वाभाविकता, परंपराप्रियता दिसते. आधुनिकीकरणामुळे आलेली गतिमानता ग्रामात. आली असली तरी ग्रामीणांनी आपल्या संस्कृतीचे जतन करण्याचा प्रयत्न चालूच ठेवलेला दिसतो. अनेक जातींच्या आजही जातपंचायती भरतात, वाद-संघर्षाचा निवाडा तेथे होता. या दृष्टीने अण्णाभाऊ साठ्यांची 'माकडीचा माळ' ही कादंबरी विचारात घेता येईल. फरक फक्त मौखिक परंपरा व

दृश्यरूप लेखन या बाबतीत करता येईल. शेवटी साहित्य जीवनाचे अविभाज्य अंग आहे. हे मान्य केल्यावर लोकसाहित्य, ग्रामीण साहित्य या सीमारेषा अस्पष्ट होताना दिसतात.

लोकसाहित्य जनसमुदायाने निर्माण केलेले मौखिक साहित्य आहे. त्यात रूढी, परंपरा, आचार याचा समावेश होतो. त्यातून लोकनाट्य, लोकगीते, लोककथा असे प्रकारे निर्माण होतात. हे साहित्य लोकांसाठी व लोकांच्याच बोली भाषेत निर्माण केलेले असते. ग्रामीण साहित्य देखील एका लेखकाची निर्मिती असली तरी लेखन विशिष्ट भाषिक समाजाचा घटक असतो. त्या त्या समाजाची बोली भाषा त्याच्या निर्मितीचे माध्यम असते. थोडक्यात शब्द हे दोन्हीच्या अभिव्यक्तीचे माध्यम आहे. ग्रामीण 'लेखकविशिष्ट' भाषादेखील 'समाजविशिष्ट' असते म्हणूनच काही ग्रामीण लेखकांनी अन्य प्रदेशातील वाचकांसाठी ग्रामीण बोलीतील शब्दांचा अर्थ कलाकृतीच्या शेवटी स्पष्ट केलेला असतो. अनुभवाच्या अभिव्यक्तीमध्ये त्याने तो मूळ शब्द सहजपणे वापरलेला असतो, तेथे जाणीवपूर्वकतेपेक्षा सहजता, स्वाभाविकताच अधिक असते.

भाषा संदेशनाचे उत्तम माध्यम आहे. त्यामुळे सामाजिक व्यवहार सुलभ होतात. परंतु पारंपरिक जीवनपद्धतीत असणारे लोकसमूह भिन्न भाषा वातावरणात सुद्धा अपल्या बोलीचे वैशिष्ट्ये टिकवून ठेवतात. लोकसाहित्य सामान्य किंवा लौकिक भाषेत नसते, बोली भाषेचा बाज, त्यांच्या लेखणीद्वारे सहजपणे प्रकट होतो. उलट त्याच्या बोली ऐवजी त्याने संस्कारित केलेली भाषा कृत्रिम ठरण्याचा धोकाच अधिक असतो. लेखकाची नाममुद्रा नसलेले व नाममुद्रा असलेले एवढाच लोकसाहित्य व ग्रामीण साहित्यात भेद दिसतो. बाकी अनुभव व अभिव्यक्तीत साम्यच दिसते.

प. महाराष्ट्रातील लोकजीवनाचे चित्रण गो. नि. दांडेकर, र.वा.दिघे, ग.ल. ठोकळ, व्यंकटेश मांडगूळकर, अण्णाभाऊ साठे, रणजित देसाई, शंकर पाटील, दि.बा.मोकाशी, आनंद यादव, उत्तम बंडू तुपे, राजन गवस, आनंद पाटील, रामचंद्र पठारे, सुरेश शिंदे व विश्वास पाटील या ग्रामीण लेखकांच्या कलाकृतीतून येते. र.वा.दिघे 'पाणकळा' मध्ये खेडूतांचे तमाशाचे वेडं, गायन विकण्याची परंपरा, शुभ-अशुभाच्या कल्पना, कुलस्वामिनीची आण, शंकर देव भिलांचा घरजावई, त्यांची गिरजा भिल्लीण त्याला दिलेली आहे. जखणीच्या गुहेतून स्त्रीच्या रडण्याचा आवाज येतो, मारुतीच्या देवळाजवळील बळदातून लग्नकार्यास भांडी मिळत असल्याच्या लोकविश्वासाचे चित्रण येते.

ग.ल. ठोकळ 'गावगुंड' मधूनही विठ्ठल भक्तीचे वर्णन करतात. पायाळू माणसाने पाय लावला की चमक थांबते. कंबर दुखीवर रामबाण उपाय म्हणजे वाघाची चरबी होय. हे औधषोपचार, तर लग्नविधीतील बारीकसारीक तपशीलही ते नोंदवितात, त्याचबरोबर मुलीला अपत्य होईपर्यंत खानदानी घरातील लोक तिच्या घरी जेवत नाहीत. अशी परंपराही सांगतात, सण-उत्सव, यांत्रांचे वर्णनही येते. म.भा.भोसले यांनी 'उघड्या जगात' या कादंबरीतूनही देवीचा कोप, देवी अंगात येणे, तिला नैवद्य देणे, कौल लावणे, जनावर चुकणे, अशुभ समजणे, सर्पदंश मंत्राने उतरविणे, नवस, भूतावर विश्वास, पिराची पुण्याई इ. लोकसमजाचे दर्शन घडविले आहे. विभावरी शिरूरकर 'बळी' मधून मांगगारुडी लोकांचा मरीआई, जाखाई-जोखाईवरील विश्वास सहजपणे सांगून जातात. अंगारा-धुपारा, जारण-मारण, यातु क्रियांवरील त्यांचा विश्वास प्रसंगानुरूप येतो. 'बळी' वगळता उपरोक्त विवेचनात आलेल्या कलाकृती फडके यांच्या रंजनतंत्राच्या आहारी गेलेल्या असूनही त्यातून लोकमानस, लोकसंस्कृतीचे दर्शन अपरिहार्यपणे झाले आहे.

गो.नि.दांडेकरांना 'पवनाकाठचा धोंडी' मधून तुंगी गडाच्या महादेवावरील लोकांची श्रद्धा, धोंडीच्या शेतातील वीरावरची श्रद्धा, बैलपूजा, नवस-सायास, दूध विक्रीस विरोध, मीठमिरच्यांनी दृष्ट काढणे, परंपरेबद्दल अभिमान, इर्जिकची पद्धत, स्वप्नातील दृष्टांत इत्यादींचे यथार्थ दर्शन घडते. 'माचीवरला बुधा' मधून बहिरोबावरील श्रद्धा व टेमलाईच्या पठरावर एक मोठ्ठ जनावर असून त्यांच्या अंगावर केस आहेत, कपाळावरील मणी रात्रीचा झगमगतो, राण उजळत असते' असा लोक विश्वास; तसेच झाडपाल्याच्या औषधीचाही उल्लेख येतो. व्यंकटेश माडगूळकरांच्या 'बनगरवाडी' तर धनगरांच्या संस्कृतीचे जिवंत चित्रच आहे. अण्णाभाऊ साठे यांनी 'फकिरा', 'वैजयंता', 'माकडीचा माळ', 'चिखलातील कमळ' इ. कलाकृतीतून लोकविश्वास, लोककला, लोक कलावंताच्या जीवनसंस्कृतीचे दर्शन घडविलेले आहे. यात अनुक्रमे बलुतेदारी, जोगतिणीची यात्रा, तमशा कलावंताचे जीवन, आलुतेदार, फिरस्त्यांचे जीवन व मुरळी प्रथा आदींचा समावेश होतो. रणजित देसाईची 'बारी' बेरडच्या संस्कृतीऱ्हासाचे चित्र तर आहेतच पण फरशी इमान, मुलीला देज देणं, वीरपूजा, लग्न प्रथा इ. चे प्रसंगानुरूप वर्णन लेखकाने केले आहे. दि. बा. मोकाशी 'देव चालले' मधून गावकऱ्यांची नरहरी देवावरील श्रद्धा, कुळकायद्याच्या विपरीत परिणामाबरोबर येते. आनंद यादव आधुनिकीकरणाच्या प्रभावातून ग्रामसंस्कृतीला बसलेला धक्का सहजपणे 'गोतावळा' मधून व्यक्त करतात. नारबाचा विश्वास, म्हसोबाला कोंबडा

कापणे, गाई विकण्यास मालकास रामू सोनवणेचा विरोध, आदि मधून लोकमानसाचे दर्शन घडते. बा. ग. केसकरांच्या 'कुणाच्या खांद्यांवर' या ऊसतोडणी मजुरांच्या जीवनावरील कादंबरीतून लोकसंस्कृतीच्या दर्शनाबरोबर उखाणे, म्हणी तसेच लोकगीतंही प्रसंगानुरूप येतात. आनंद यादवांचे 'मायलेकरं' हे दीर्घकाव्य 'माय' हा शब्द देखील लोकबंधातीलच आहे.

राजन गवस यांनी 'चौंडक', 'भंडारभोग' या कादंबऱ्यातून जोगतीण व जोगत्याच्या उपेक्षित लोकजीवनावर प्रकाशझोत टाकला आहे, तर 'सर्जा' मधून शेतकऱ्यांच्या घरात होणारी प्राणिपूजा सुरेश शिंदे प्रकट करतात.

पश्चिम महाराष्ट्रापेक्षा भू-प्रदेश आणि निसर्गामुळे कोकणी लोकजीवन वेगळे आहे. दिघे, बोरकर, दळवी, पेंडसे, कर्णिक व दलवाई इत्यादिंनी कोकणी लोकसंस्कृतीचे दर्शन आपल्या प्रतिभा विलासाने घडविले आहे. विशेषत: भाविणीची प्रथा, शेरणं प्रकरण, महालक्ष्मीची मिरवणूक, गणपतीचा उत्सव, गावगाड्याच्या ऱ्हास, गावपंचायतीचा निर्णय, बहिष्कार टाकण्याची परंपरा, कातोडी जीवन, धर्म व कृषिजीवनाशी निगडित परंपरा विस्ताराने 'सराई' तून येतात. यापेक्षाही 'आई आहे शेतात' ही कादंबरी लोकजीवनातल्या म्हणी, उखाणे व ओव्यामुळे स्वाभाविक वाटते. वि.वा. हडपांची 'अन्नदाता उपाशी' ही कोकणी लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणारी कादंबरी, तर बा.भ. बोरकरांची 'भावीण' व लक्ष्मणराव सरदेसाईची 'मांडवी तू आटलीस' ह्या कादंबऱ्या गोव्यातील संस्कृतिदर्शन घडविणाऱ्या आहेत. 'पडघवली', 'हद्दपार', 'सारे प्रवासी घडीचे', 'भाकरी व फुल' या कादंबऱ्या ही कोकणी लोकजीवन, लोकसंस्कृतीच्या पार्श्वभूमीवरीलच आहेत.

बी. रघुनाथ 'आडगावचे चौधरी' मधून चौधरी घराण्याच्या दहा पिढ्यांचा इतिहास सांगतानाच मराठावाड्यातील श्रद्धासमजुतीच चित्रण करताना दिसतात. जसे नवस करणे, होराशास्त्र, ब्राह्मणभोजन, सत्यता पटविण्यासाठी मारोतीचा शेंदूर काढणे, मूल जगावे म्हणून मरी आईच्या नावाने रूप्याचे कडे घालणे, महादेवावरील श्रद्धा, कोल्हाटणींचा जलसा-नाच-तमाशा, गुप्त धनावर बसलेल्या नागाच्या अंगावर लांब केस असतात, पायाळू मांत्रिक-ज्योतिषी यांना गुप्त धनाची जागा दिसते. एखादी इच्छा अतृप्त राहिली तर मृत्युनंतर त्यांच्या पिंडाला कावळा शिवत नाही. आदी रा.रं.बोराडे यांच्या 'पाचोळा' या कादंबरीतून पार्वतीच्या तोंडच्या म्हणी, वाक्प्रचार यातून लोकमानसाचे दर्शन घडते. जसे 'कुनाला कस्याचं आनू बलुत्याला पस्यांचं', 'अवचिंद उठला न् कुडाला भेटला'. ना.धो. महानोरांच्या 'गांधारी' या कादंबरीतून मोठ्या प्रमाणात लोक भाषा आणि लोकजीवन दिसून येते. जसे;

तमाशाचं लोकाचं वेड, पुत्र प्राप्तीसाठी आमवश्येच्या दिवशी वेशीला टिळा लावणे, मीठ मोहऱ्यांनी दृष्ट काढणे, नाग-नागणीचं जुळं पाहणं शुभ समजणं, मारुती-भवानी मातेवरील श्रद्धा इत्यादी स्वरूपातील समजुतीचे व लोककलांच्या आस्वादाचे चित्रण येते. गणेश आवटे यांच्या 'गणगोत' मधून ओव्या, उखाणे प्रसंगानरूप येतात. उदाहरणार्थ 'झुल झुंबरांचं-फुल उंबरसाचं, कळी चाफ्याची, लेक माय बापाची, सून सासऱ्याची, वैनी देर-नणंदाची, उखाण्यांचं नाव घेते मी राणी साहेबरावाची.' अशा स्वरूपातील उखाणे व --

'सासू सासरे महे देव्हाऱ्याचे देव
पडते मी पाया नाही दुजाभाव....
लग्नाचा जोडा गळ्यातली गळपेटी
सोडले गणगोत एका जीवसाठी'

अशा प्रकारच्या ओव्या पाहावयास मिळतात.

विदर्भी जीवनातील आदिबंध गो.नी. दांडकरांच्या 'पूर्णामायची लेकर' मधूनही येतात. कंदूरी करण, मंत्रतंत्र, लिंबू मिरच्याचा उतारा, सादिलबुवावर विश्वास, 'ठोका पिटी' ची लोककथा इत्यादी; तर उद्धव शेळके यांची 'धग' ही याच वळणाची आहे. बाबाराव मुसळे 'हाल्याहाल्या दुधू दे' मधून आसरांची बारव, पंचमीचा सण, शिराळ शेठचा नवस, जात्यावरील ओव्या, पावसाबद्दलचे लोकसमज वर्णन करतात. तर पुरुषोत्तम बोरकरांच्या 'मेड इन इंडिया' मध्ये ओव्या प्रसंगानुरूप येतात. मधुकर वाकोडे 'झेलझपाट' मधून प्रेमकथेबरोबर कोरकूंच्या विविध प्रसंगानुरूप येतात. मधुकर वाकोडे 'झेलझपाट' मधून प्रेमकथेबरोबर कोरकूंच्या विविध चालीरीती, समजुतीचे वर्णन करतात. जसे लामजाण्याची प्रथा, सातबर्डीच्या महादेवावर श्रद्धा, होळी उत्सव, मुलीला हुंडा देणे इत्यादी.

एकूणच ग्रामीण साहित्य हे लोकसंस्कृतीवरच आधारलेले साहित्य आहे. लोकसाहित्याच्या मुशीतूच ग्रामीण साहित्याची कूस उजवलेली आहे. या दृष्टीने ग्रामीण साहित्याचा लोकतत्त्वीय अभ्यास केल्यास लोकसंस्कृती आणि ग्रामीण साहित्याचा अनुबंध आणखी स्पष्ट होऊ शकेल.

❑❑❑

# बौद्धधर्म तत्त्वज्ञान आणि इतर धर्म साम्यभेद

धर्म म्हणजे जीवन जगण्याची कला होय. प्रत्येकाने इतरांच्या भावभावनांचा आदर केला पाहिजे, दुसऱ्यांचे कल्याण, हित, सुखसमाधान, आनंद यांचा विचार केला पाहिजे. जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी सर्वांचे आचरण शुद्ध असले पाहिजे. उपद्रव टाळला, एकमेकांबद्दल अनुकंपा असली तर शांतता प्रस्थापित होईल. दहशतवाद, आतंकवाद, वर्चस्वाची भूक नाहीशी होईल. 'जगा आणि जगू द्या' हे एकूणच सर्वच धर्मांचे तत्त्वज्ञान आहे. पण सत्तांधता माणसांना पशूच्या पातळीवर घेऊन जाताना दिसते. माणसाचे जगणे अवघड झाले आहे. महागाई, भ्रष्टाचार, चंगळवादाने डोके वरती काढले असून माणसालाच प्रश्न विचारावा लागेल, तू माणूस कधी होशील? शेजारच्या माणसाशी जमत नसताना आम्ही प्रार्थना करतो, भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत अशी प्रतिज्ञा करतो. कृती आणि उक्ती यामध्ये अंतर निर्माण झाले आहे. आंतरराष्ट्रीय शांतता परिषदा घेण्याची वेळ सर्वच देशांना सुखावह वाटते. म्हणून जागतिकीकरणाच्या काळात शांतता प्रस्थापित करण्यासाठी काय केले पाहिजे? शांतता निर्माण होईल का? यासाठी मार्ग कोणते? मार्ग कसा असेल? जगाचा भविष्यकाळ शांततेचा की अशांततेचा? या प्रश्नांची उत्तरे शोधायची असतील तर धर्मग्रंथाचे तत्त्वज्ञान, त्यांचा परस्परावरील प्रभाव आणि धर्मग्रंथातील आदर्श विचार यांची मांडणी करण्याचा हा प्रयत्न आहे.

**जैनधर्म :**

'धर्म' कल्पनेचा उदय सर्वप्रथम झाला तो जैन धर्म कल्पनेतून असे म्हटले जाते. अहिंसेचा मार्ग जैन धर्मियांनी सांगितला. भगवान महावीर या धर्माचे संस्थापक असून त्यांनी बांधवांच्या कल्याणासाठी काही सूत्रे सांगितली आहेत. शुद्ध आचरण, अभक्षनिषेध, पुण्यमार्ग, दया, त्याग यांचा स्वीकार हा धर्म करतो.

'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथात तसेच 'विचारशिल्प' मधील लेखांमधून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी वस्तुनिष्ठ विवेचन केले आहे. बौद्ध व जैन यांचा वैदिक धर्मांशी निकट संबंध आहे. जैन व बौद्ध हे वैदिक

यज्ञसंस्था न मानणारे धर्म आहेत. बुद्ध आणि महावीराने संयम आणि अहिंसा यांना प्रमुख देणाऱ्या धर्माचा ईश्वरनिरपेक्ष आदेश दिला. मनुष्याच्या अंतिम कल्याणाचे सर्वस्व माणसांतच आहे, वैराग्य, समाधी, सन्यास व प्रज्ञा ही मोक्षाची साधने आहेत.

नैष्ठिक ब्रह्मचर्य किंवा संन्यास हे मोक्षाचे मुख्य साधन होय हा जैन आणि बौद्धांचा प्रधान सिद्धांत आहे. जैनांच्या धर्मसाधनेत तपाला मुख्य स्थान आहे. उपवासाने पापनाश होतो ही त्यांची धारणा आहे. विश्वाचे प्रश्न सुटल्याने मानवी जीवनाचे प्रश्न सुटेल.

''बुद्ध धर्माच्या पूर्वीचे धर्म विशिष्ट समाजापुरतेच किंवा राष्ट्रापुरतेच मर्यादित होते. सर्व मानवांना व्यापू व पुनीत करू, अशी प्रेरणा त्यांच्यात नव्हती. म्हणून अशा विशिष्ट अर्थाने विश्वव्यापी धर्म ही संज्ञा मुख्यत: जगातील तीनच ऐतिहासिक धर्मांना देता येते. ते म्हणजे बौद्ध धर्म, ख्रिश्चन धर्म व मुसलमान धर्म हे होत. जैन, शैव, वैष्णव हे धर्म सर्व मानवजातीच्या एकतेस मान्यता देतात व सर्व मानवांना पावन करू इच्छितात. (वैदिक संस्कृतीचा विकास, पृ. १९८) हे तर्कतीर्थांचे विचार समर्थनीय आहेत. जैन धर्माचरणातील अहिंसा, सत्य, तपमाहात्म्य यांचे स्पष्टीकरण करून जैन हे हिंदू संस्कृतीचेच असे तर्कतीर्थ म्हणतात, ते यथार्थ वाटते. ते पुढे लिहितात, ..... परंतु जैन धर्म हा हिंदू धर्मातील अनेक उपासना संप्रदायांपैकी एक संप्रदाय आहे. वेद प्रामाण्य न मानल्यामुळे हिंदुहून ते भिन्न आहेत, असे म्हणता येत नाही. परंतु सर्व हिंदूंचे व जैनांचे तत्त्वज्ञान व्यापक अर्थाने एकच आहे. कर्मसिद्धांत व मोक्षसिद्धांत हे सर्व हिंदुतत्त्ववेत्त्यांचे समान आहेत. आचार, व्यवहार, भाषा, कला, वाङ्मय, ध्येयवाद, अभिरुची इत्यादी सांस्कृतिक समानता इतर हिंदूंच्या प्रमाणेच जैनांत सापडते. म्हणून जैन समाज एका व्यापक हिंदू संस्कृतीच्या छत्राखालीच वावरत आहे, असे निश्चितपणे म्हणता येते. (वैदिक संस्कृतीचा विकास, पृ. २२१)

तर्कतीर्थांचे उपरोक्त विचार स्वीकारल्यानंतर जैनांनी यज्ञ नकार, कर्मकांड नकार दिला. बाकी समान सिद्धांत असलेले दिसतात. त्याचप्रमाणे यज्ञ, ईश्वर कल्पना नाकारणारा बुद्धाचा धम्म अवतरला. एकूण असे म्हणता येईल की, काही दोष, मर्यादा वजा करून नवा धर्म बुद्धाने स्थापन केला. पुढे लोकप्रियही झाला. तसेच त्यांच्याच अनुयायांनी त्यांचा काही प्रमाणात पराभवही केला. बुद्धालाच 'ईश्वर' रूप देण्याचा प्रयत्न केला.

**बौद्धधर्म :**

भगवान गौतमबुद्धांनी 'बौद्ध' धर्माची स्थापना केली. सर्वस्वाचा त्याग करून गौतमबुद्धानी इ. स. पू. सहाव्या शतकात वैदिक / हिंदू धर्मातील यज्ञ, कर्मकांडातील धार्मिक गोंधळात अडकलेल्या सामान्य माणसांना मोक्ष (निर्वाण) मार्ग दाखविण्यासाठी बौद्ध धर्माची स्थापना केली. मानवाप्रमाणे प्राण्यांवर प्रेम करा, संघर्ष टाळा, सत्कर्म करा आणि शांतता प्रस्थापित करा असा संदेश दिला. जातिभेद निषेध करून समता प्रस्थापित करा असा संदेश दिला. बुद्धिप्रामाण्यवाद सर्वप्रथम त्यांनी मानला. त्यांनी कर्ममार्ग सांगितला. जगातील दु:खाचे मूळ तृष्णा, इच्छा, महत्त्वाकांक्षा आणि अज्ञानात आहे. अज्ञानमुक्तीचा मार्ग म्हणजे बौद्ध धर्म होय. ईश्वरकल्पनेस नकार दिला. अंधश्रद्धा, कर्मकांडास विरोध केला. बळी प्रथेस विरोध केला. ब्राह्मण वर्गाच्या प्रभुत्वास विरोध केला. वैदिकधर्माची प्रतिक्रिया म्हणून बौद्ध धर्म अस्तित्वात आला. वेद प्रमाण मानणाऱ्यांचा अहंकार, कर्मकांड वाढीस लागले. सामान्यांची पिळवणूक, अतिशोषण थांबविण्यासाठीचा मार्ग म्हणजे बौद्ध आणि जैन धर्म जन्मलेले दिसतात.

दयाशील सिद्धार्थाला पिळवणूक मान्य नव्हती. मजुरांबद्दल कणव होती. मजूर-मालक भेद मान्य नव्हता. निरुपद्रवी प्राण्यांची शिकारही त्यांना मान्य नव्हती. सर्व सुखी व्हावे हीच त्यांची अपेक्षा होती. भगवान गौतमबुद्धांच्या धम्माची वैशिष्ट्ये संक्षेपाने पुढीलप्रमाणे आहेत. १) ईश्वर, आत्मा व कर्मकांड निषेध. २) माणसाने माणसांशी माणसाप्रमाणेच वागावे. ३) दु:ख नाहीसे करणे. ४) दु:ख नष्ट करण्याचा मार्ग दाखविणे. ५) माणसाने पावित्र्याचा मार्ग अनुसरावा. सदाचरण करावे. शील मार्गांचा अवलंब करावा. भगवान गौतम बुद्धांनी १) मनसंस्कार, २) चित्तशुद्धी, ३) पापकृत्ये वर्ज्य यांची शिकवण दिली. दु:ख, दु:खाचे कारण, दु:ख निरोध, दु:खापासून मुक्तीचा मार्ग अशी चार आर्य सत्य त्यांनी सांगितली. सदाचाराला महत्त्व दिले. संयमाची शिकवण दिली. श्रद्धा व भावनेने प्राप्त झालेले ओतप्रोत ज्ञान अत्यंत कल्याणकारक असते. सत्य दृष्टिकोण, उदात्त ध्येयांनी मोक्ष प्राप्ती होते असे त्यांनी सांगितले. विद्येपेक्षाही शील सर्वोत्तम आहे असे ते म्हणतात. बोलणे, वागणे, उपजीविका इ. बाबतींत त्यांनी मार्गदर्शन केले. चित्त एकाग्र असणे त्यांना महत्त्वाचे वाटते. अहिंसा, सत्य, चौर्य निषेध, मादकद्रव्य निषेध, व्यभिचार निषेध ही तत्त्वे त्यांना महत्त्वाची वाटतात. अहिंसेला महत्त्व, जातिसंस्थेस विरोध, समतेवर भर, सर्वधर्मसमभावाचे सूत्र त्यांनी स्वीकारले. कर्मकांडाला विरोध केला. आज मात्र बौद्ध धर्म अनुयायी या मार्गापासून दूर

गेलेले दिसतात. जातिभेद, द्वेष, मत्सर, तिरस्कार, हेवेदावे, मतभेद, मनभेदांचे वारूळ निर्माण झाले. बौद्ध धम्माचेच एक नवे कर्मकांड झाले. दुसऱ्यांचा अनादार हाच शिष्टाचार का झाला हा मात्र गूढ प्रश्न आहे. 'बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञान' या ग्रंथात अनिल कठारे यांनी सुसूत्र विवेचन केले आहे. तसेच या ग्रंथात मलपृष्ठावरील मजकूर महत्त्वाचा वाटतो. दु:खाचे कारण तृष्णा म्हणजे महत्त्वाकांक्षा. अविद्येचा नाश केल्यावर तृष्णा नष्ट होते. त्यामुळे दु:खाचाही शेवट होतो. ईश्वरनिषेध, सत्कर्म स्वीकार, जातिसंस्था निषेध, समतेचा पुरस्कार, शांतीचा संदेश, शुद्ध आचार विचार, कर्मानुसार फळ मिळते या त्यांच्या विचाराचा प्रभाव सर्वच धर्मावर जसा आहे, तसा वारकरी परंपरेतील सर्व संतांवरही असलेला दिसतो. त्यांनीही ज्ञान, कर्म आणि भक्तिमार्ग सांगितला. जनकल्याणाची, जातिभेदविरहित समाजनिर्मितीचे, समतेचे स्वप्न पाहिले. कर्मकांड निषेध मानला. सर्वधर्म समभावाची शिकवण दिली. सर्व जातीधर्माच्या संतांनी आपले कर्तव्य करता करता अभंग रचना करून समाज संस्कारित केला. आजच्या काळातील अस्थिरता, दहशतवाद, युद्धसदृश्य परिस्थितीत 'आता युद्ध नको बुद्ध हवा' असे म्हटले जाते. बौद्ध धर्मियांनी देखील बुद्धतत्त्वानुसार आचरण करावे, बेगडी वर्तनापेक्षा दया, सहानुभूती आणि समतेचा स्वीकार करावा. अन्यथा बुद्धांचा त्याग वाया गेला असे होईल हे टाळावे आणि जागतिकीकरणाच्या युगातील आदर्श समाज निर्माण करण्याचे पाईक झाले पाहिजे असे प्रामाणिकपणे वाटते. कडवटपणा टाळला तर हे शक्य आहे.

**ख्रिस्ती / ख्रिश्चन धर्म :**

येशू ख्रिस्तांचा हा धर्म असून मानवी करुणेने ओतप्रोत भरलेला आहे. सर्व मानवजात येशूची लेकरं आहेत, 'जगा आणि जगू द्या' अशा कमी शब्दांत या धर्माचे तत्त्वज्ञान सांगता येईल. सर्वच धर्मतत्त्वज्ञानाचे संक्षेपाने भारतीय विश्वकोशांमध्ये आलेले विवेचन आधारभूत आहेच. तसेच 'लॉर्ड बुद्ध वॉज दि फादर ऑफ येशू ख्रिस्त ॲन्ड म. पैगंबर' या गुरू गोपाळ चक्रनारायण यांच्या ग्रंथ आणि पॅमला फ्रीबॉर्न यांचा 'ख्रिस्ती सिद्धांताचा परिचय' हे उपयुक्त ग्रंथ आहेत. त्याआधारेच पुढील विवेचन केलेले आहे.

'बायबल' हा ख्रिस्ती धर्मग्रंथ आहे. मूर्तिपूजा निषेध, श्रमप्रतिष्ठा, अहिंसा, व्यभिचार निषेध, सत्यवचन, चोरी नको, लोभ टाळा इ. घटक महत्त्वाचे मानले आहेत. देव दयाळूपणे मानवाच्या भल्यासाठी व मानवाला आशीर्वाद देण्यासाठी आहे. करार मोडल्यास दैवी शिक्षा होते असा समज आहे. देवाची कृपा लोकांवर असते. पवित्रतेची अपेक्षा लोकांकडून देव करतो.

विविधतेत एकता, ईश्वरी प्रेरणा, इ. महत्त्वाची तत्त्वे आहेत. बायबल, आपणास प्रेरणा देते. सत्यवचन शिकविते. योग्य-अयोग्याची निवड करायला शिकविते. वळण लावते, योग्य ते करण्यास साहाय्य करते. प्रत्येकाचे हित करण्यासाठी आपल्याला सर्व दृष्टींनी पूर्णपणे सुसज्ज करण्याचा तो देवाचा मार्ग आहे. देव निर्माणकर्ता आहे, मनुष्य देवाची निर्मिती आहे, मानवाने सत्याची जाणीव ठेवावी. मनुष्याचे देवाविषयीचे ज्ञान मर्यादित आहे. परमेश्वर देव उच्च स्थळी व उच्च सिंहासनावर बसलेला आहे. तो मानवाशी नाते जोडतो. देवाची नैतिक गुण लक्षणे पुढीलप्रमाणे दिसून येतात. १) चांगुलपणा, २) प्रीती, ३) कृपा, ४) दया, ५) सहनशीलता, ६) पवित्रता, ७) नीतिमत्ता, ८) विश्वासुपणा, ९) दया. याप्रमाणेच देवाचे इतर काही गुणधर्मही सांगितले जातात. जसे सरळपणा, अविनाशीपणा, अमरत्व, त्याचप्रमाणे देवाची परिपूर्णता एकेश्वरामध्ये आहे तो देव. १) देव आत्मा आहे. २) देवाचे एकच रूप आहे. ३) देव सनातन आहे. ४) सर्व सत्तादी आहे. ५) अविकारी ६) समर्थ ७) सर्वज्ञानी ८) देव सर्वव्यापी आहे इ. क्लिष्ट गोष्टींमध्ये अडकण्यापेक्षा येशू सर्वव्यापी आहे, जनकल्याणासाठी तो अवतरला आणि आपण सदवर्तन केले पाहिजे अशी शिकवण हा धर्म देतो. पंडित महादेवशास्त्री जोशी यांच्या 'भारतीय संस्कृतिकोश' दहा खंडांमध्ये सर्वच धर्मांबद्दल वस्तुनिष्ठ विवेचन केले आहे, ते मुळातून अभ्यासण्यासारखे आहे.

**इस्लाम धर्म :**

म. पैगंबर हे इस्लाम धर्माचे संस्थापक असून 'कुराण' हा पवित्र धर्मग्रंथ आहे. एकेश्वराची / अल्लाची कल्पना, मूर्तिपूजानिषेध, अनिष्ट गोष्टी निषेध, सत्यवचन आणि नमाज (प्रार्थना), उपवास या गोष्टींना इस्लाम धर्मात विशेष महत्त्व आहे. चुकीबद्दल परमेश्वराकडे क्षमा मागणे हे उपवास / रोजांच्या निमित्ताने अपेक्षित आहे. मानवकल्याण, विश्वशांततेचा विचार या धर्मतत्त्वांमधून मिळतो. पंचतत्त्वामध्ये सहानुभूती आहे, माणूस महत्त्वाचा आहे, उपासनेचा क्रम त्यानंतर येतो, भूतदयेचा विचार या धर्मात आहेच.

बौद्धधर्माप्रमाणे प्रमुख पाच तत्त्वे आचरण करण्याचा संकेत इस्लाम धर्मातही आहे. १) नमाज - दिवसातून स्त्री-पुरुषांनी पाच वेळा नमाज अदा करणे म्हणजे प्रार्थना करणे. २) रोजा - दुसऱ्यांच्या भुका, गरिबी, त्याग इ. बद्दल जाणीव ठेवणे. शारीरिक चोचले वर्ज्य. ३) जकात - समाजातील गरिबांना आपल्या उत्पन्नातील २ % भाग दरवर्षी द्यावा. ४) हजयात्रा - आर्थिक सुबत्ता असलेल्या व्यक्तींनी स्वकष्टाच्या उत्पन्नामधून आयुष्यात एकदातरी हजयात्रा (मक्का-मदिना) करणे. ५) कुर्बानी - आवडत्या वस्तूची

कुर्बानी (त्याग) द्यावी. तसेच इतर धर्मांबद्दल टीका करू नये, आदर बाळगावा. इतर धर्मियांच्या संस्थांना अधिक मदत करावी. कुराणाचा चुकीचा अर्थ लावल्यामुळे, बंधनांमुळे शैक्षणिकदृष्ट्या हा समाज मागे राहिला. विश्वशांतीसाठी दुवा मागितली जाते तेव्हा संपूर्ण विश्वासाठी मागावी लागते, स्वार्थ नाही. दुवा दुसऱ्यासाठी मागायची, शेवटी स्वत:साठी मागणी केली जाते. इतरांच्या कल्याणानंतर आपले कल्याण होवो अशी दुवा मागितली जाते. कर्मकांडाला थारा नाही. स्त्री स्वातंत्र्य सर्वाधिक आहे. धर्माचे शिक्षण सक्तीचे आहे. ईश्वरसाधना करताना स्त्री-पुरुष ही घरातही करू शकतात. बुरखा वापरला जातो तो स्त्री चारित्र्याच्या कल्पनेतून. नजर खाली असली पाहिजे. नम्रतेचा विचार ह्यात आहे. आपले पूर्वज पवित्र होते, ते अमर आहेत, त्यांच्या वशिल्याने आपण अल्लापर्यंत पोहचू शकतो. वागणुकीवरून धर्म स्वीकार अपेक्षित आहे. सक्ती नाही.

**हिंदू धर्म :-**

वैदिक धर्म / हिंदू धर्म सर्वश्रेष्ठ धर्म असला तरी पुढे ब्राह्मणांच्या कर्मकांडामुळे, श्रेष्ठ-कनिष्ठाच्या कल्पनेमुळे, विषमता, जातिभेदामुळे गर्तेत सापडला असे वाटते. अर्थात मूळ सिद्धांत पाहता मानवी कल्याणाची शिकवण हा धर्म देतो. मूळ सिद्धांतापासून दूर गेल्यामुळे सामान्य माणसांचा गोंधळ झाला. एवढेच नव्हे तर पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. यामागे दलित उद्धाराची रास्त अपेक्षा त्यांनी ठेवली, हे सत्य नाकारता येत नाही.

**निष्कर्ष :-**

१. सर्वच धर्मांमध्ये काही साम्य तर काही भेद असलेले दिसतात.
२. हिंदू धर्माव्यतिरिक्त सर्व धर्मांनी एकेश्वराची कल्पना स्वीकारली. येशू, अल्ला, महावीर इ.
३. सर्व धर्मांना आधारभूत असे पवित्र ग्रंथ आहेत. उदा. बायबल, कुराण, रामायण, गीता इ.
४. धर्म विचारांचा प्रभाव एकूणच साहित्य व्यवहारावर असलेला दिसतो.
५. मानवी कल्याण - विश्वकल्याणाचा विचार सर्वच धर्मग्रंथाचा पाया आहे.
६. धर्म मानवी कल्याणसाठी असून काळाच्या ओघात त्यामध्ये काही बदल होतात. काही गैरगोष्टी येतात आणि प्रतिक्रिया म्हणून नवा धर्म जन्माला येतो.

❑❑❑

# विश्वशांती आणि संतकार्य

संत तुकडोजी आणि स्वामी रामानंदतीर्थ यांच्या पुण्यतिथी निमित्ताने हा लेखप्रपंच आहे. भगवान गौतमबुद्ध, जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकोबा आणि तुकडोजी हे वेगळे नाहीत, एकच आहेत. मानवसेवा, मानवकल्याण आणि विश्वशांतीचा संदेश या महामानवांनी आम आदमीसाठी दिला. निःस्वार्थीपणा, कणव, भूतदया आणि जनकल्याणाची तळमळ सर्वांमध्ये काठोकाठ भरलेली आहे. स्वामी रामानंदतीर्थ या योग्यांप्रमाणेच विश्वशांतीचा संदेश त्यांच्या जीवनकार्य रचनेत ओतप्रोत भरलेला आहे. व्यसन निषेध, आत्महत्या निषेध, भोंदुगिरी निषेध, ढोंगीपणा निषेध या गोष्टी या सर्वांच्या कार्याच्या केंद्रस्थानी असलेल्या दिसतात. शेतकऱ्याचे कल्याण तर विश्वाचे कल्याण ही भूमिका सर्वांच्या कार्यात दिसते. दुर्गुणांचा नाश, दुर्गुणांच्या होळीचा संदेश दसरा किंवा विजयादशमी निमित्ताने दिला जातो. रावणरूपी राक्षसीवृत्ती भस्मसात करा, म्हणजे व्यसनांपासून, बुवाबाजीपासून चार हात दूर जा. संत अध्यात्माच्या वाटेने जात असले तरी समकालीन परिस्थितीत 'धर्म' श्रेष्ठ मानला गेला. आज 'पैसा' श्रेष्ठ झाला. त्यातून अधर्म, भ्रष्टाचार, शोषण, अन्याय, अत्याचार, बलात्कार अशा एक ना अनेक गोष्टी शिरजोर झाल्या. मूल्ये पायदळी तुडविली गेली. शूद्र गोष्टी शिष्टसंमत झाल्या. यातून समाजघडी विस्कटली. ती परत व्यवस्थित बसवायची असेल तर संत तुकडोजी, गाडगेबाबा या दोन वैदर्भीय संतांचे योगदान समजून घेतले पाहिजे. जगद्गुरू संतसूर्य तुकोबा आत्मसात केला पाहिजे. भगवान गौतमबुद्धांचे विचार समाजापुढे ठेवले पाहिजे. कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह न बाळगता केवळ विश्वशांती, करुणा, मानवता यांचा विचार नजरेसमोर ठेवून आत्मपरीक्षण करण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

संत तुकडोजी, संत गाडगेबाबा आणि स्वामी रामानंदतीर्थ यांच्या लोकोत्तर कार्यामुळे त्यांची नावे अनुक्रमे नागपूर, अमरावती आणि नांदेड विद्यापीठांना दिली गेली. यामुळे त्यांच्या कार्याची दखल शिक्षणक्षेत्राने घेतली. त्यापेक्षा या नावांमुळे या विद्यापीठांना उंची प्राप्त झाली. छत्रपती शिवाजी महाराज, स्व. यशवंतराव चव्हाण, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर,

पंजाबराव देशमुख यांची नावे अनुक्रमे कोल्हापूर, मुक्त विद्यापीठ नाशिक, कृषी विद्यापीठ राहुरी, मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व कृषी विद्यापीठ अकोला यांना देऊन त्यांच्या कार्याची नोंद घेतली. त्या तुलनेत संत तुकडोजी, संत गाडगेबाबा आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याची प्रारंभी उपेक्षा झाली असली तरी आज त्यांच्या विचाराशिवाय शांतता प्रस्थापित होऊ शकणार नाही, विश्वकल्याणाची गंगोत्री सर्वदूर पोहोचणार नाही. या सर्वांनी जागतिकीकरण शब्द रूढ होण्याच्या अगोदर आपल्या विचारकार्यातून मानवमुक्तीचा, शांततेचा संदेश जगाला दिला. त्यांच्या विचारांवर कमी अधिक प्रमाणात भगवान गौतमबुद्धांच्या विचाराचा प्रभाव असल्याचे जाणवते. त्यातून नवी मांडणी करण्याचा हा प्रयत्न केला आहे.

मानवी तृष्णेसंबंधी धम्मप्रवर्तन दिनाचे स्मरण करताना ज्येष्ठ संशोधक-अभ्यासक यशवंत मनोहर यांनी दि. ०९/१०/२०११ रोजीच्या दै. सकाळ मध्ये विवेचन केले आहे. मानवाची तृष्णा आज इतकी मोठी झाली आहे की, हावरटपणा, चंगळवाद इतका बोकाळला की, नेमके सुख, समाधान, शांती, कल्याण, सत्य-शिव-सुंदर, नीतिमत्ता यांचाच विसर पडला. आदर्श समाजासमोर ठेवण्याऐवजी अधःपतन सर्वदूर पसरले आहे. 'जो जे वांच्छिल, तो ते लाहो' ऐवजी 'सर्व काही मला मिळू दे, बाकी सर्व भुकेकंगाल राहू दे' अशी आजची अधोगती दिसते. द्वेष, मत्सर, तिरस्कार, लोभ, माया हे शिरजोर झाले आहेत. काय होणार या समाजाचे? शासनाच्या कल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोहचत नाही. अस्मानी संकट टाळता येत नाही. पण सुलतानी संकटांनी प्राथमिक गरजांच्या पूर्तता करणे आम आदमीला अशक्य झाले आहे. म्हणून थोडक्यात भगवान गौतमबुद्ध, तुकोबा, तुकडोजी, स्वामी रामानंद तीर्थ आणि विज्ञाननिष्ठ गाडगेबाबा यांचे योगदान महत्त्वाचे आहे. कदाचित महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य प्रस्तुत लेखकाला महत्त्वाचे वाटत नाही का? अशी शंका विद्वान घेतीलही, परंतु या महात्म्यांनी गरिबाला पत, प्रतिष्ठा प्राप्त करून दिली, विचारप्रवृत्त केले, आत्मपरीक्षण करायला शिकविले, शिक्षणाचा मूलमंत्र दिला, जातिभेदाला तिलांजली द्यायला शिकविले. त्यांच्याबद्दलची कृतज्ञतेची जाणीव ठेवून केलेला हा प्रपंच आहे.

'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' म्हणत भजन करत श्रोत्यांशी गाडगेबाबांनी सुसंवाद साधला. एकतर्फी ज्ञानदान नाही, सर्वांना बाबा बरोबर घेऊन चालले. ग्रामस्वच्छतेचा मंत्र दिला, विज्ञानाची कास धरली. स्वार्थाचा लवलेशही कुठे जगण्यात नाही, शिळपाकं मिळालं ते खाल्लं, पण लाचारीला

जागा नाही. अखंड त्यागाची शिकवण म्हणजे गाडगेबाबा होय. बुवाबाजी, कर्मकांड, ढोंगीपणाचा त्यांनी निषेध केला. बळी देण्याची प्रथा मुळातून उखडून टाकली पाहिजे अशी शिकवण दिली. म्हणूनच आमचे गुरुजी डॉ. द. ता. भोसले गाडगेबाबांचा गौरव 'लोकोत्तर' असा करतात. कार्य सामान्य नाही, सर्वच असामान्य आणि म्हणूनच 'लोकोत्तर' होय.

तुका आकाशाएवढा का? असा प्रश्न विनाकारण नाही. देवाशी भांडणारा, वाईट झाल्यास समाधान मानणारा, देवपण नको, माणूसच देव म्हणणारा तुकोबा बुवाबाजी, ढोंगीपणाचा निषेध करतो, विश्वशांतीचा संदेश देतो. शब्दाशब्दात जनकल्याणाची तळमळ भरलेली आहे. लोक बोलीत लोकांशी त्यांनी अभंगातून संवाद साधला म्हणून निरक्षर माणसांना तुकोबांचे अभंग मुखोदगत आहेत. गाथा इंद्रायणीच्या डोहात तरली. याचाच अर्थ असा की, ती भक्तांच्या ह्रदयात घर करून आहे. लोकांच्या बोलीतील, शब्दातील हे जीवनमूल्यांचे संस्कार आहेत. साधासोपा भक्तिमार्ग तुकोबांनी सामान्य माणसाला शिकविला. ज्ञानमार्गाबरोबर कर्ममार्गाची जोड दिली. म्हणूनच तुका आकाशाएवढा म्हटले आहे. ते सार्थच आहे.

**स्वामी रामानंद तीर्थ** - 'शांती'चा संदेश जगाला देणारे, भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू स्वामी रामानंद तीर्थ यांचे खास अनुयायी. प्रसंगी नेहरूंना विरोधही करणारे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा मुक्ती लढा लढविणारे, शिक्षणप्रसाराचे अखंड कार्य करणारे एक महान कर्मयोगी होते. त्यांच्या असामान्य कर्तृत्वाची दखल घेऊन नांदेडच्या विद्यापीठास त्यांचे नाव देण्यात आले आहे. कामगारांसाठी त्यांनी कार्य केले. राजकारणातून सहजपणे बाहेर पडले. सत्तेचा मोह त्यांनी टाळला. तात्पर्य कर्ममार्ग, शांततेचा पुरस्कार, कर्मकांडास विरोध करून हे सहज स्पष्ट होतो.

संत तुकडोजींनी तर 'ग्रामगीता' हा ग्रंथ लिहिला. पाच-साडेपाच हजार ओव्या म्हणजे शेतकऱ्याला दिलेले मंत्र आहेत. आचार, विचार, कृती आणि श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व त्यात काठोकाठ / ओतप्रोत भरलेले आहे. आज शेतकरी कर्जबाजारी झाला आहे, बाजारपेठेत त्याला किंमत नाही, कवडीमोल किंमतीत शेतमाल विक्री करावी लागते, अस्मानी, सुलतानी संकटांस तो वैतागला आहे, दुःख-नैराश्याने त्याला ग्रासले, तो आत्महत्येचा पर्याय स्वीकारताना दिसतो अशा शेतकरी बांधवांना आशेचा किरण दाखविणारे एकमेव कर्मयोगी म्हणजे संत तुकडोजी होय. 'शेतकरी सुखी तर जग सुखी' ही कल्पना त्यांच्या अभंगातून येते. त्यातूनच ते विश्वशांतीचा संदेश देतात. जगद्गुरू तुकोबानंतर जर कुणाचे अभंग लोकांनी मुंखोद्गत केले असतील तर

ते संत तुकडोजींचे. तुकोबाप्रमाणे लोक बोलीचा आश्रय घेऊन त्यांनी निर्मिती केली आहे. आपल्या शब्दात आपल्या भावना अभिव्यक्त होत असल्याचे लोकांना वाटते. सारांश, जातिभेद विरोध, श्रमप्रतिष्ठा, संयम, शांती, नीती, सत्य, अहिंसेच्या मार्गाने विश्वशांतीचा जागर त्यांनी केला.

भगवान गौतमबुद्धांचे अनुयायी म्हणतात, 'युद्ध नको बुद्ध हवा'. अखंड करुणेची शिकवण त्यांनी दिली. कर्ममार्ग सर्वप्रथम बुद्धाने सांगितला. तोच पुढे गाडगेबाबा, तुकडोजी, स्वामी रामानंदतीर्थ यांच्या जीवनकार्यात दिसतो. सर्वप्रथम जैनधर्माचा उल्लेख मिळतो. त्यानंतर बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लीम (इस्लाम), हिंद धर्माचे संदर्भ मिळतात. जैनधर्माने अहिंसेचा मार्ग सांगितला. पुढे बुद्धाने दुःखाची कारणे शोधली. अविद्या, महत्त्वाकांक्षा हे दुःखाचे मूळ त्यांना वाटते. अल्ला व ईश्वराच्या सत्तेस महत्त्व नाही. निर्वाणप्राप्ती (मोक्ष) साठी सत्कर्मे केली पाहिजेत. जातिसंस्थेला विरोध करत समतेचा पुरस्कार केला. जगाला शांतीचा संदेश दिला. आचार, विचार शुद्धीवर त्यांनी भर दिला. एकूणच सर्वच धर्मांनी एकेश्वराची कल्पना स्वीकारली. मूर्तिपूजेस विरोधच केला. अपवाद हिंदू धर्म. पण कर्ममार्ग, आचारविचारांची शुद्धता, जातिभेदाला विरोध, समतेचा स्वीकार हे सर्वच समान सूत्र सर्व धर्मग्रंथांमध्ये दिसते. 'बौद्धधर्म आणि तत्त्वज्ञान' हे अनिल कठारे यांचे पुस्तक किंवा 'लॉर्ड बुद्ध वॉज दि फादर ऑफ येशू ख्रिस्त ॲन्ड म. पैगंबर' हे गुरू गोपाळ चक्रनारायण यांच्या पुस्तकाचे शीर्षक पाहिले तरी धर्मतत्त्वज्ञानाची स्पष्ट कल्पना येते.

सारांश भगवान गौतमबुद्धांनी सद्सद्विवेक बुद्धीचा वापर करणे, शिक्षणाचे महत्त्व, कर्मकांड निषेध, अहिंसा, विश्वशांतीचा पुरस्कार केला. तेच कार्य सर्व धर्म जसे करतात, तेच ज्ञानोबा, तुकोबा, तुकडोजी, गाडगेबाबा आणि स्वामी रामानंद तीर्थ यांनी पुढे नेण्याचे महत्त्वाचे कार्य केले. या महान विभूतींना अभिवादन.

❑❑❑

# कृषी साहित्य संकल्पना

"कृषी जीवनाचे चित्रण ज्या साहित्यातून पाहावयास मिळते ते कृषी साहित्य" असे म्हणता येईल. कृषी साहित्य संकल्पनेचा विचार करताना कृषी साहित्य व ग्रामीण साहित्य यातील समानता व एकीकरण यांचा विचार करावा लागेल. भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील ७० टक्के जनता खेड्यात राहते. ते ग्रामजीवन अनुभवतात भारतीय अर्थव्यवस्था ही शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे महात्मा गांधी स्वातंत्र्यापूर्वीच 'खेड्याकडे चला' हा संदेश दिला होता. अशा या कृषी जीवनाचे चित्रणास म. फुले यांच्यापासून सुरुवात झाली. आज अनेक अभ्यासक लेखकांनी या कृषी साहित्यावर प्रकाश टाकलेला पाहावयास मिळतो. हे कृषी चित्रण कथा, कादंबऱ्या, कविता या साहित्य प्रकारात पाहावयास मिळते. साधारणत: शहरी जीवनापासून दूर पसरलेल्या ग्रामजीवनातील शेतीशी संबंधित जे विचार, समाजजीवन लिहिले गेले त्या साहित्याचा विचार कृषी साहित्यात येतो. म्हणजे कृषी साहित्य हे ग्रामजीवनाचा एक भाग बनून राहते. ग्रामीण साहित्यात येणारे कृषी जीवन कृषी साहित्याचे एक अंग आहे. ग्रामीण भागात साजरे होणारे सण, उत्सव, सामाजिक रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, पद्धती, सरंजामशाही, सावकारकी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या यासंबंधीचे चित्रण कृषी साहित्यात पाहावयास मिळते. दसरा, गुढीपाडवा, दिवाळी, संक्रांत या सणाचे कृषी साहित्यातून दर्शन घडविण्याचे कार्य साहित्यिक करतो. शेतकरी जीवनात अनेक उत्सव साजरे होतात. सुगी पेरणी, नांगरणी, काढणी, मळणी, राखणी, सोंगणी हे शेतकरी जीवनातील उत्सव आहेत. या उत्सवांचे चित्रण साहित्यातून पाहावयास मिळते.

कृषी जीवनाचा विचार करताना शेती व शेतीशी संबंधित सर्व घटकांचा विचार करावा लागतो. कृषी साहित्य म्हणजे केवळ कृषी जीवनाचे वर्णन असे म्हणणे अयोग्य ठरेल. कृषी साहित्यातून शेतकरी, किडे, मुंग्या, जनावरे, आलुते, बलुते, फिरस्ते यांचे चित्रण येते. ग्रामीण साहित्य हे कृषी जनाचे साहित्य आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्यातून कृषी जीवनाचे चित्रण येताना दिसते. अशा या कृषी जीवनाचे चित्रण प्रथमत: ग्रामीण साहित्याचे प्रेरणास्थान म. फुले यांच्या साहित्यातून पाहावयास मिळते. आपली संस्कृती

ही कृषीजनांची संस्कृती आहे. त्या संस्कृतीचे चित्रण म. फुलेंनी प्रथमतः आपल्या लेखनातून मांडण्याचे कार्य केले.

**'कृषी' शब्दाचा अर्थ :**

मराठी विश्वकोश खंड ४ मध्ये 'कृषी' ह्या शब्दाचा अर्थ 'नांगरणे'[२] या धातूपासून हा शब्द तयार झाला आहे, असे म्हटले आहे. परंतु कृषी या संज्ञेचा अर्थ केवळ नांगरणे, नवीन पीक घेणे एवढ्यापुरता मर्यादित नाही. कृषी व्यवसायाचा व्याप फार मोठा आहे. कृषी जीवन जागणारा शेतकरी व त्याचे कार्य अन्न, वस्त्रादि गरजा भागविणारे पदार्थ तयार करणे, उत्पादित करणे. हे सर्व अन्नपदार्थ, वनस्पती, प्राणी यापासून मिळतात. शेती, अवजारे यांच्या साहाय्याने पीक घेणे हा कृषिधर्म होय.

'ग्रामीण साहित्य आणि शेतकरी जीवन' या वामन जाधव यांच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत भास्कर चंदनशीव म्हणतात, 'कृषी मूल ही जीवनम्'[३] असे म्हटले आहे. म्हणजे कृषी आणि कृषक यांचा संदर्भ हा एकूण मानवी जीवन व्यवस्थेच्या संदर्भात अतिशय मोलाचा मानला जातो. शेती व शेतीव्यवस्था हाच आमच्या जगण्याचे मूळ आहे. परंतु या साऱ्या कृषी व्यवस्थेची परवड इतिहास काळापासून आजच्या वर्तमानकाळापर्यंत कशी झालेली आहे हे वास्तव आपण उघड्या डोळ्यांनी पाहात आहोत.

शेती हा व्यवसाय, 'व्यवसाय' म्हणून मान्य करता येत नाही तर ती एक जीवनपद्धती असल्याचे म्हटले आह. 'एक जीवनशैली' म्हणून तिचा उल्लेख केला जातो. अशी ही शेतीची जीवनशैली ही तोट्यातील जीवनशैली मराठी साहित्यातून उपेक्षिलेली दिसते. शेतकऱ्यांची कुटुंब कथा, शेती, निसर्ग, पशुपक्षी, गुरंढोरं इ. गोष्टींचे चित्रण साहित्यात मर्यादित स्वरूपात आले. परंतु शेतकऱ्याचे कृषी जीवन किती कष्टप्रद व दारिद्र्याने पिचलेले आहे याची वर्णने साहित्यातून फारशी पाहावयास मिळत नाही. कृषी म्हणजे नांगरणे एवढा मर्यादित अर्थ न घेता 'कृषी' हा शब्द खऱ्या अर्थाने कृषी जीवन व्यवस्थेशी संबंधित आहे असे म्हणावे लागेल. 'कृषी' हा जीवन व्यवस्थेचा पाया आहे. आपल्या जीवनाचे मूळ आहे. कृषिप्रधानता ही आदिम स्वरूपाची संस्कृती आहे. अशा या संस्कृतीचा परामर्थ घेण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले[४] यांनी कृषिकेंद्रितता हाच ग्रामीण व्यवस्थेचा पाया यासंबंधी विवेचन केले आहे. शेतीच्या उत्पन्नावर बलुतेदार व फिरस्ते, म्हणजे कारू-नारू यांचा हक्क असतो, हे सांगून त्रि.नां. अत्रे यांच्या विवेचनाचा

आधार घेतला आहे. कृषी संस्कृती म्हणजे शेतीवर आधारित संस्कृती असे म्हटले आहे. ग्रामसंस्कृती निसर्गसन्मुख असते, असे म्हटले आहे.

## कृषी साहित्य संकल्पना

### कृषी साहित्य म्हणजे काय?

शेतीशी संबंधित असणाऱ्या, गावगाड्यात वाढलेल्या पण शोषणाला नकार देणाऱ्या, जाती-पातीच्या भिंती पाडण्यास अग्रक्रम देणाऱ्या शेतकरी, शेतमजूर, आलुते, बलुते, फिरस्ते, आदिवासी या सर्वांचे साहित्य म्हणजे कृषी साहित्य होय.

### कृषी साहित्याची भूमिका :-

खेडे हे सर्व बाजूंनी सोसल्या गेलेल्या लोकांचे वसतिस्थान खेड्यातील एकही घटक असा नाही की, ज्याचं शोषण होत नाही. शेतकरी हा सर्वांत जास्त शोषित. या ना त्या प्रकारे खेड्यातील सारीच जनता शोषणाला बळी पडलेली आहे. सा शोषणाचे अनेक प्रकार आहेत. जाती-पाती, अंधश्रद्धा, अज्ञान, दारिद्र्य, स्त्री शोषण, निसर्गाची अवकृपा, देवधर्म आणि यासारखे शोषणकर्ते घटक यातील बहुतेक नगरातल्या ज्ञानी लोकांनी लादलेले. शहराचा ऑक्टोपस खेड्याचे सर्वांगीण शोषण करणारा. शोषण हेच कृषिजनसंस्कृतीच्या जगण्याचे सार. या साऱ्या शोषणाला नकार हीच कृषिजनसंस्कृतीच्या साहित्याची भूमिका. या भूमिकेवर ही साहित्यधारा आपले अस्तित्त्व मांडते.

उपरोक्त भूमिकेस अनुसरून ती आपल्या पूर्वसुरींचा शोध घेते. हा शोध घेत असताना गौतमबुद्ध, संत तुकाराम, म. फुले, म. गांधी, छत्रपती शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, संत गाडगे महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी एक सलग वैचारिक परंपराच ह्या साहित्यास बैठक म्हणून भूमिका पुरविते. यातील प्रत्येक युगकर्त्याने शोषणाला नकार दिलेला आहे आणि कृषिजनव्यवस्थेला आपल्या आस्तेच्या परिघात आणलेले आहे. त्यामुळे कृषी साहित्य उपरोक्त पूर्वसुरींच्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार करून आपली भूमिका निश्चित करते. जातविरहित खेडे, शोषणविरहित समाज, माणूसपण हेच श्रेष्ठ मूल्य मानणारी कृषिजनव्यवस्था या व्यवस्थेत केंद्रभागी आहे. या विचार परंपरेतच ही कृषिजन संस्कृतीची साहित्य परंपरा आपले स्वत्व शोधते.

उपरोक्त विचारधारेच्या उजेडात ती आपल्या पूर्वपरंपरेच्या विचारांची मांडणी करते. कृषिजनसंस्कृतीच्या साहित्याला मौखिक साहित्याची बळकट

परंपरा आहे. या मौखिक साहित्यात लोकगीत, लोककथा ते भजन, कीर्तन, गोंधळ, तमाशा इ. साऱ्यांचा समावेश होतो. या सगळ्यात असणारी शक्तिस्थळे शोधून त्याचा उपभोग करून आजचे व्यक्त होण्याचे रूपबंध ती अधिक शक्तिशाली बनविण्याची आकांशा बाळगते. या परंपरेला तुकारामाइतकेच एकनाथही जवळचे आहेत. महानुभाव पंथातील रचना या परंपरेच्या भाग बनतात. सारी संत चळवळ आणि तत्कालीन नंतरची शाहिरी परंपरा ही या साहित्याची पूर्वपरंपरा ठरते. म. फुलेंनी आपले लेखन मौखिक परंपरेतील विविध अभिव्यक्ती प्रकार निवडून केले. मुक्त संवादापासून ते पोवाडा, अखंड रचून त्यांनी आपले असे व्यक्त होण्याचे मार्ग धुंडाळले. म. फुल्यांचे सारे साहित्य हे फक्त पूर्वपरंपरा नसून तो कृषी साहित्याचा मूलस्त्रोत ठरते. नंतरच्या कालावधीत बहिणाबाईंची कविता कृषिजन संस्कृतीच्या साहित्य परंपरेस मोलाची वाटते.

कृषिजनसंस्कृतीचे साहित्य कृषिजनपरंपरेच्या जगण्याची मूल्ये हीच साहित्याची मूल्ये म्हणून स्वीकारते. समूहभाव हा कृषिजनसंस्कृतीचा जीवन गाभा या साहित्यास महत्त्वाचा वाटतो. व्यापक सहानुभाव हा कृषी जगण्याचा आधार याच आधारावर हे साहित्य उभे राहते. सत्य आणि विश्वास ही जगण्यातील मूल्ये या साहित्याला साहित्यमूल्य वाटतात. प्राणी, पशु, कीटक, यासहित निसर्ग आणि निसर्गासोबत जगणे हेच खरे जगणे. ही या साहित्याची धारणा आहे. कृषी साहित्य शोषणाला नकार देते. तसेच नैसर्गिक गोष्टीच्या नासाडीला विरोध करते. माणूसपण हीच जगण्यातील उच्च गोष्ट आहे. हे कृषी साहित्य मानते. स्त्रीच्या माणूसपणाचा लढा हा मानवमुक्तीची लढाई आहे. ही या साहित्याची धारणा आहे.

## कृषी साहित्य संकल्पना :

महाराष्ट्र खेड्यांनी व्यापलेला आहे. एकूण लोकसंख्येच्या ७०% खेड्यात राहतात. प्रदेशानुसार निसर्गाचे स्वरूप बदलते, पिकांचे प्रकार बदलतात. मात्र शेतीशी संबंधित व्यवस्था सर्वत्रच अस्तित्वात असल्याचे दिसून येते. जगण्याचा आधार शेतीच गावगाडा शेतीने जगवलेला आहे. पांढरीवर वसलेले गाव काळी जगवते. शेतीत राबणारा शेतकरी केंद्रभागी असतो. त्यांच्यासह पाटील, कुलकर्णी, न्हावी, सुतार, लोहार, कुंभार, चांभार, ढोर, महार, परीट, साळी, माळी, कोष्टी, बेलदार, वडार, मुलानी इ. सह फिरस्ते हे सारेच गावाचे घटक प्रत्येकाने जगले पाहिजे. ही कृषी साहित्याची धारणा आहे. नव्याने कुणी गावात आला तर त्यालाही जगण्यासाठी जागा



DN 3072

उपलब्ध झाली पाहिजे. एखाद्याची गावात कमतरता असेल तर त्याला पंचक्रोशीतून आणायचे आणि गावात त्याची व्यवस्था लावून द्यायची. गावगाड्याचे जगणे फक्त शेतकरी, बलुतेदार, आलुतेदार, फिरस्ते यांच्यापुरते मर्यादित नव्हते. येथे प्राणी, पशु-पक्षी, कीटक या साऱ्यांनाही मोकळेपणाने जगता आले पाहिजे. निसर्गासहित जगणे प्रत्येकाला आपले मानून जगणे हा कृषिधर्म आहे. हे गावगाड्याचे धर्माचलन आहे.

श्रमनिष्ठा हे त्यांचे जगण्याचे महत्त्वाचे मूल्य आहे. श्रमाशिवाय जगणे कृषिपरंपरेला मान्य नाही. अधिक श्रम करणारे घर हे अधिक प्रतिष्ठित. मनगटावर विश्वास. शरीर ही संपत्ती श्रमाशिवाय जगणारा ऐदी! त्याचा काहीच उपयोग नाही. श्रम जगण्याच्या केंद्रभागी असल्यामुळे ढोंग, लाचारी, दाखवेगिरीला येथे जागा नाही.

समूहभान हे इथल्या जगण्याचे महत्त्वाचे सूत्र आहे. खेड्यातील माणूस स्वतःला एकटा, स्वतंत्र कधी काढूच शकत नाही. येथील व्यक्ती आपल्या गोतावळ्याला, समाजाला, गावाला, पंचक्रोशीला बांधलेली असते. एखाद्या व्यक्तीचे कर्तृत्व हे त्या गावाचे कर्तृत्व असते. उदा. एखाद्या पैलवानाने चांगली कुस्ती केली तर तो अमक्या गावाचा पैलवान, चोर सापडला तर तमक्या गावचा चोर. प्रत्येक गोष्ट समूहभावनेने व्यापलेली, भारलेली असते. त्यामुळे गावात खाजगी, स्वतःपुरते असे काही उरतच नाही. जगणेच पारदर्शी बनत असते. व्यापक सहानुभाव हे इथल्या जगण्याचे आधारमूल्य असते. निसर्गातील प्रत्येक सजीवाने जगले पाहिजे. कुणाचेच समूळ अस्तित्व नष्ट करणे कृषी जीवनाला मान्य नाही. माणसासोबत किडा, मुंगी, कीटक, पशु-पक्षी, प्राणी या सर्वांचे अस्तित्वच माणूसपण निर्माण करत असतो. निसर्गातील प्रत्येक गोष्ट आहे तशी टिकावी ही आकांक्षा त्यामुळे निसर्गाचा कमीतकमी विध्वंस कोणत्याच गोष्टीची नासाडी निषेधार्ह आहे. संपूर्ण विश्वाकडे सहानुभावाने पाहण्याची दृष्टी कृषी साहित्य शिकवते. उदारता ही कृषी परंपरेतील भिनलेली गोष्ट आहे. दिल्याने वाढते ही जगण्यातील साररूप शिकवण आहे. एखादी गोष्टी फक्त माझी, माझ्यासाठी, हे या कृषिजीवनाला मान्य नाही. जे असेल ते आपल्या सर्वांचे दिल्याने वाढते. त्यामुळेच गुऱ्हाळाजवळून जाणाऱ्या वाटसरूला हाक मारून बोलावले जाते. रस आणि गुळ देऊन पाठविले जाते. खळ्यातील रास भरताना जो जो आला असेल त्याला तृप्त करून पाठवायचे. त्यामुळे राशीत बरकत येते. दारात भिकारी आला तर त्याला मोकळ्या हाताने परतवायचे नाही. भिकाऱ्यात परमेश्वर पाहण्याची उदार दृष्टी. ही या कृषिजनजीवनदृष्टीचा भाग बनलेली आहे.

सत्यावर प्रचंड निष्ठा ही या कृषिजनांचे मूल्य आहे. त्यामुळे असत्याला थारा नाही. विश्वास ही कृषिजनांच्या जगण्याची धारणा आहे. त्यामुळे शब्दांच्या विश्वासावर येथील उलाढाली होतात. शब्द दिला की जीव गेला तरी बेहत्तर पण शब्दाला बट्टा नाही. एकमेकांच्या विश्वासावर इथल्या जगण्याची उभारणी यातूनच 'पाचामुखी परमेश्वर' ही येथील न्यायव्यवस्था आहे. यातूनच जगण्यात कमालीची पारदर्शक निर्मळता दिसते.

जगणे एक आणि बोलणे दुसरे हे कृषी व्यवस्थेला मान्य नाही. त्यामुळे कृती आणि उक्ती यात कमीत कमी अंतर. जबाबदारीचे प्रखर भान कृषिजनांत आहे. तेव्हा कृती ही नैतिकच असते. ही येथील मूल्यावस्था. जगण्यातून आकारलेली. या मूल्य व्यवस्थेतून कृषी परंपरेतील जगण्याचे सच्चेपण आपल्या समोर येते.

❑❑❑

# चरित्र-आत्मचरित्रावरील लोकसाहित्याचा प्रभाव

चरित्र विषय आणि चरित्रकार जेव्हा एकच असतो, तेव्हा ते आत्मचरित्र होते. स्वतःच स्वतःचे चरित्र लिहावयाचे म्हणजे एक प्रकारे आत्मनिवेदन, आत्मप्रकटीकरण, आत्मकथन होय. चरित्र वस्तुनिष्ठ असते, तर आत्मचरित्र आत्मनिष्ठ असते.

**आत्मचरित्राची वैशिष्ट्ये :**

व्यक्तीच्या जीवनाचा, व्यक्तिमत्त्वाचा आणि कर्तृत्वाचा त्याने स्वतःच लिहिलेला इतिहास. आत्मचरित्रकार स्वतःच इतिहासकार असतो. लेखक स्वतःचाच जीवनवृत्तांत देत असतो.

पुनर्मूल्यांकन, आत्मनिरीक्षण, सिंहावलोकन आणि विश्लेषण.

आत्मचरित्र स्वतःनेच स्वतःच्या गतकाळाचा लिहिलेला नुसता इतिहास नव्हे तर स्वतःच्या गतकाळाचे सिंहावलोकन, विश्लेषण आणि आत्मनिरीक्षण करून लिहिलेला अन्वर्थक इतिहास (सत्यकथन) होय.

**आत्मचरित्राचे गुण :**

१. आत्मचरित्रकाराजवळ प्रांजळपणा हा आवश्यक गुण पाहिजे व त्यामुळे असत्यकथन आणि विपर्यास टाळता येतो.
२. सभ्यपणाच्या, सौजन्याच्या, कलेच्या मर्यादा सांभाळून आत्मचरित्रकारास सत्यदर्शन घडवावे लागते.
३. आत्मचरित्रकाराने केलेले निवेदन-आत्मनिवेदन हे प्रांजळ, प्रामाणिक, साहजिक आणि सरळ हवे.
४. निवेदनात विनय हवा, धैर्य हवे.
५. (प्रांजळपणा, साहजिकता, रसाळपणा-स्मृतिचित्र) लक्ष्मीबाई तसा राम नगरकरांजवळही आहे.
६. निःपक्षपातीपणा - न्यायाधीशाप्रमाणे हवा.
७. आत्मचरित्रकाराला - अंतः सृष्टीचे सूक्ष्मनिरीक्षण करता आले पाहिजे आणि स्वतःच स्वतःचे मनोविश्लेषण करता आले पाहिजे.
८. कलात्मकता, सुसंगता आणि सुसूत्रता - आटोपशीर हवा.

आपण जे केले, जे अनुभवले ते इतरांनाही मार्गदर्शक व्हावे, उद्‌बोधक व्हावे अशी आत्मचरित्रकाराची इच्छा असते.

एका ज्योतीने दुसरी ज्योत पेटावी त्याप्रमाणे एकाच्या कर्तृत्वाच्या प्रेरणेने दुसऱ्याला कर्तृत्व प्रेरित करावे हे स्वाभाविक आहे. थोरामोठ्यांचे ज़ीवन हे दीप स्तंभासारखे असावे. 'आत्मचरित्र / चरित्र हे टॉनिक असते', कारण व्यक्तिमत्त्व विकासासाठी, वाचकासाठी ते पौष्टिक खुराख पुरविते.

लेखन : स्वानंद, गतकाळाचे अवलोकन, सिंहावलोकन आणि गतकाळातील अनुभवांचा तो एका अर्थी पुनःप्रत्यय घेत असतो आणि त्याला पुनःप्रत्ययाचा आनंद मिळत असतो. विरंगुळा, स्वान्तसुखाय लेखन, लोकशिक्षण कल, आत्मपूजा टाळणे, आत्मस्तुती टाळणे.

आनंद यादव : आत्मचरित्राचा स्वतंत्र वाङ्‌मयप्रकार म्हणून विचार व्हावा. १९७० आत्मचरित्रे पूर्वीच्या काळाच्या तुलनेने विपुल प्रमाणात लिहिली जाऊ लागली. प्रसिद्धी, लोकप्रियता मिळाली.

अ.म. जोशी म.वा.इ. खंड ५ भाग २ -

१८७५ ते १९२० - १९४५ आत्मचरित्रांची संख्या अत्यल्प, कारणे

१. बोधवादी भूमिका २. थोर व्यक्तींजवळ वेळेच्या मर्यादा ३. १९४२ कारावासात विश्रांतीमुळे अल्पप्रमाणात लेखन ४. स्वतःबद्दल सांगण्याचा संकोच

१९७० ते १९९५ - विपुल लेखन
१. सा.रा.सां. चळवळीचा भाग
२. शुद्ध वाङ्‌मयीन भूमिकेने लेखन

चरित्राच्या तुलनेत आत्मचरित्राची संख्या कमी का? मर्यादित.
१. आत्मचरित्र हा प्रकार समाजातील कोणत्याही व्यक्तीला एकदाच हाताळता येतो. एक व्यक्ती-एक आत्मचरित्र. एक व्यक्ती अनेक कादंबऱ्या लिहू शकते अशी अनेक आत्मचरित्र लिहू शकत नाही.
२. इच्छा असूनही दुसऱ्यांकडून आत्मचरित्र लिहून घेता येत नाही.
३. एका व्यक्तीची अनेक 'चरित्र' असू शकतात पण आत्मचरित्र एकच.
४. स्वतःविषयी लिहिण्यास अनुत्सुक.

५. आत्मचरित्र फसण्याची जोखीम, भीती, अपयश.
६. समीक्षकांकडून दुर्लक्ष होण्याचा धोका - उपेक्षा.
आत्मशोध म्हणजे - स्वतःचा शोध

**व्याख्या :**

''मी माणूस या नात्याने माझ्या जीवनात जी काही आजवर वाटचाल केली त्या वाटचालीतील माझी स्थितिगती म्हणजे सुख-दुःखे, आशा-आकांक्षा, विकास-विस्तार, भाव, सत्ये, कृती-कर्मे आणि या सर्वातील यशापयश, धडपड यांचा 'मी' केंद्रस्थानी धरून काढलेला आलेख / नकाशा - ऑटोबायोग्राफी 'स्वतःच स्वतःच्या जीवनाचा काढलेला आलेख' - आत्मचरित्र.''

ऑटोबायोग्राफी - आत्मचरित्र - मूलभूत फरक-

'आधुनिक युग' भारतात ब्रिटिश राजवटीत जरी उदयाला आले असले, वाङ्मयप्रकार समृद्ध झाले असले तरी दोन्हीत मूलभूत फरक आहे. पाश्चात्त्य आत्मचरित्रे व्यक्तीच्या मनाचा, तिच्या स्वभावाचा, तिच्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्यात विशेष रमतात. व्यक्तीस व्यक्ती म्हणून तिच्या वैशिष्ट्यांच्या अंगांनी समजून घेणे, शोधणे यातच आत्मचरित्राचे ध्येय आहे, असे पाश्यात्त्यांना वाटते.

पाश्चात्त्य समाजाचा मूलभूत घटक हा 'व्यक्ती' मानला जातो आणि भारतीय समाजाचा मूलभूत घटक 'कुटुंब' हा मानला जातो. त्यामुळे पाश्यात्त्य समाजव्यवस्थेत व्यक्ती स्वतःसाठी काय करते याला प्रतिष्ठा मिळते आणि भारतीय समाजव्यवस्थेत व्यक्ती कुटुंबासाठीं काय करते यावर तिची प्रतिष्ठा प्रथम जोखली जाते.

दोन संस्कृतीमधील हा भेद आहे. आत्मचरित्र हे अंतिमतः त्या समाजाच्या संस्कृतीचे प्रतिबिंब असते. (उदा. 'वाटेवरच्या सावल्या', 'मंतरलेले दिवस' ग.दि.मा.)

**रा.ग. जाधव - व्याख्या -**

''आपल्या जीवनविषयक अनुभवाचें व तद्अनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचे स्वतः लेखकाने लेखनरूपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र'' (मराठी विश्वकोश, खंड २)
दादोबा पांडुरंग - 'आत्मचरित्र' (१९७२)
बाबा पद्मनजी - 'आत्मचरित्र' 'अरूणोदय'

**प्रेरणा :**

१. सा. सां. कार्याचे इतिवृत्त सांगण्यावर भर होता.
२. चुकीची माहिती - बातम्यांबद्दल खुलासा करणे.
३. आत्मचरित्र म्हणजे व्यक्तिगत इतिहासाचे सूत्रबद्ध लेखन.
४. जगण्याचा अन्वयार्थ.
५. हरवलेले जीवन अनुभवयाची प्रेरणा.
६. 'स्व'/'मी' म्हणजे आत्मप्रतिमेची जाणीव.
७. 'कन्फेशन्स' - पापनिवेदन - क्षमायाचना.
८. आत्मप्रेम, आत्मविशदीकरण, स्पष्टीकरण.
९. आत्मशोध, आत्मपरीक्षण.
१०. आत्मविकाराची प्रेरणा.

आत्मचरित्रकार :

१. सार्वजनिक क्षेत्रात कार्य करणारे उद्योजक, अधिकारी, व्यापारी, कारखानदार, कार्यकर्ते यांची आत्मचरित्रे - बी. जी. शिर्के - 'उद्योगपर्व', 'कृष्णाकाठ' - यशवंतराव चव्हाण.
२. खाजगीरित्या, वैयक्तिक जीवन जगणाऱ्या प्रापंचिक व्यक्तींची आत्मचरित्रे - धोंडो केशव कर्वे - 'आत्मवृत्त'
३. तत्त्वज्ञानात्मक - कन्फेशन्स
४. इतिहासात्मक - स्वतःचा इतिहास स्वतःच सांगणे
५. साहित्यरूपात्मक - 'मी'चा मुक्त अवतार

**कादंबरी - आत्मचरित्र फरक :**

कादंबरीचा स्थायिभाव काल्पनिक आणि प्रतिमा असतो आणि आत्मचरित्राचा गाभा 'मी' च्या जीवनातील घटित (प्रत्यक्ष घडलेल्या घटना व अनुभव) आणि जन्मापासून ते आजपर्यंतचा प्रदीर्घ सलग जीवनपट असा असतो.

आत्मचरित्रातील मानवी जीवन हे 'मी' चे मानवी जीवन असते. 'मी' च्या मानवी जीवनाचे स्वरूप शोधणे. माणूस निसर्ग-शास्त्र-सत्य-माणूस समाज-समाजकल्याण-माणूस-माणसातील मी- अंतरंगाचा शोध - Crisis of Life.

**आत्मचरित्र लेखनाची पूर्वतयारी :**

'मी'कडे तटस्थ - अलिप्तपणे पाहणे.

'स्व' जीवनाचा सर्वांगीण जाणीवपूर्वक अभ्यास.

प्रतिभाशक्तीला मदत करणारी स्मरणशक्ती, प्रतिभाशक्तीचे घटक मानलेल्या संवेदन शक्ती कल्पकता, उत्कटता, कल्पनाशक्ती यांचाही उपयोग आत्मचरित्राच्या निर्मितीत करावा लागतो.

उत्तम आत्मचरित्रांचे अभ्यासपूर्वक आणि सजग वाचन.

तारतम्य.

**आत्मचरित्राची सहा अंगे :**

१. आत्मचरित्र - नायकाचा जन्म व त्याचे बालपण - नगर जिल्ह्यातील दुष्काळी भागात जन्म, बालपण

२. कौटुंबिक पार्श्वभूमी - सामान्य न्हाव्याचे कुटुंब

३. 'मी' चे तारुण्य, महत्त्वाकांक्षा - नट होण्याची इच्छा

४. संस्कार - राष्ट्रसेवा दलाचे संस्कार

५. प्रौढपणाचा काळ - नोकरी, व्यवसाय, कार्य - पोस्टात नोकरी व कलापथकात काम

६. वार्धक्याचा काळ - शेवटचा टप्पा - जीवनाविषयी काय वाटते?

**आत्मचरित्र लेखनातील संभाव्य दोष -**

१. स्मरणशक्तीचा दोष - बालपणातील आठवणीचे विस्मरण (निवड)

२. सेन्सॉरशिपची भूमिका - जाणीवपूर्वक काही अप्रिय गोष्टी वगळणे, अविश्वसनीयता.

३. घटनांची शैली बदलणे - खोटेपणा येतो.

४. लज्जास्पद, लाजिरवाणी घटना टाळणे

५. अतिशयोक्ती, आत्मगौरवाचा धोका

६. स्वतःच्या मित्रांना/घरच्या लोकांना सांभाळून घेण्याची प्रवृत्ती.

**आत्मचरित्र व कादंबरी - साम्यभेद :**

१. या दोन्ही प्रकारांत व्यक्तीच्या जीवनाचा मोठा पट घेतलेला असतो. तो घेऊन व्यक्तिजीवनाचा, मानवी जीवनाचा अन्वयार्थ लावण्याचा दोहोंमध्ये प्रयत्न असतो. जीवनपट मोठा असल्यामुळे दोहोंतही एक दीर्घ कथानक असते.

२. असे दीर्घ कथानक मानवी जीवनतील संघर्ष, नाट्य, काव्य, विनोद, भावना चित्ताकर्षक घटना, प्रसंग, त्यांची अर्थपूर्णता दोहोतही आलेली असते.

३. दोहोतही जीवनपट मोठा असल्यामुळे व्यक्तींची, पानांची संख्या एकमेकांसारखी, एकमेकांएवढी येऊ शकते, त्या सर्वांनी मिळून जो जीवनपट विणलेला असतो.

४. प्रथम पुरुषी निवेदन आत्मचरित्राप्रमाणे कादंबरीत येते.

५. 'मी'चा नायक व्यक्तीच्या समकालीन समाजवास्तवाचे प्रतिबिंब.

**वेगळेपण :**

आत्मचरित्र ही समाजात अस्तित्वात असलेल्या, होऊन गेलेल्या व्यक्तीचे घटित वास्तव असते - अधिक विश्वसनीय.

**आत्मचरित्र कादंबरी :**

कादंबरीकार आपल्या जीवनातील घटना, प्रसंग, अनुभव किंवा आपल्या जीवनपटाचा काही भाग घेऊन कादंबरी लिहू शकतो. अशी कादंबरी बहुधा वास्तववादी असते. बहुधा तिचा नायक 'मी' हा असतो आणि तोच निवेदकही असतो.

**आत्मचरित्र कादंबरी - दोन अर्थ :**

१. आत्मचरित्रातील (लेखकाच्या स्वतःच्या जीवनातील) घटना, प्रसंग, अनुभव, पात्रे, जीवनपटाचा काही भाग इत्यादी घेऊन लिहिलेली कादंबरी - रूढ, सर्वमान्य अर्थ.

२. आत्मचरित्र जिचा आत्मा आहे, अशी कादंबरी.

आत्मचरित्र आणि कांदबरी दोन्ही भिन्न प्रकार - आत्मचरित्राचे व्यवच्छेदक लक्षण 'मी' चे घटित जीवन हे आहे, तर कादंबरीचे व्यवच्छेदक लक्षण 'प्रतिमा व कल्पनाधिष्ठित' जीवन हे आहे.

**आत्मचरित्रकाराचे लेखकीय गुणधर्म :**

१. 'स्व' जीवनातील घटना, घडामोडी, अनुभव संकलन

२. आयुष्यातील गाभ्याचे निवडून सांगणे

३. तटस्थता

४. भडकपणा, अतिशयोक्ती, आत्मगौरव समर्थन, आत्ममग्नता टाळावी.

५. विश्वासार्हता सांभाळावी, प्रामाणिकपणा.

६. कुणाच्या आग्रहापोटी आत्मचरित्र लिहू नये.

७. आत्मचरित्र लेखनाची खंबीर जिद्द हवी.

**आत्मचरित्राचे वाचन का होते?**

१. माणसाला माणूस म्हणून जाणून घेण्याची स्वाभाविक जिज्ञासा.

२. आत्मचरित्र धीर, आधार देते - आत्मबळ

३. मानवी जगण्याचे, जीवनाचे नवेनवे, अधिक यशस्वी आकार किंवा रूपे वाचकाला आत्मचरित्रे पुरवीत असतात.

४. स्वतःच्या जगण्याचा उत्साह वाढवतात.

५. स्वतःलाच समजून घेणे

६. माणूस आणि समाज यांचे द्वंद्वात्मक नावे समजून घेणे

७. मानवी मनाची स्पंदने आत्मचरित्रात सापडतात. मानवी इतिहासाचे 'जिवंत रेकॉर्ड' असते.

८. जीवनातील साधेसुधे अनुभवही सुंदर भावतात, आनंद वाटतो.

९. आत्मचरित्र जगण्याचे मार्गदर्शक दीपासारखे असते.

१०. समाजवास्तवाचे भान.

११. आत्मचरित्रात कादंबरीची वेधकता असते, पण काल्पनिक विश्व नसते.

आत्मचरित्र एक जीवघेणा साहित्यप्रकार आहे. शेवटी चरित्र काय किंवा आत्मचरित्र काय? व्यक्तीच्या भावभावनांचा आरसा असतो. माणूस येथे चरित्र किंवा आत्मचरित्र नायक समाजजीवन परिस्थितीचे अपत्य असते. तत्कालीन लोकजीवन, रूढी, परंपरा यांचे संस्कार त्याच्यावर झालेले असतात. त्याचा शोध घेणे सहज शक्य झाले आहे.

❑❑❑

# खंडोबाची यात्रा

आडगाव बु. ।। ता. राहाता जि. अहमदनगर या लहानशा गावात खंडोबाचे हेमाडपंथी मंदिर आहे. छोटमाथा टेकडीवर असंख्य मंदिरातील खंडोबावर गाव आणि परिसरातील लोकांची आजही श्रद्धा आहे. अनेक लोककथा या दैवतासंबंधी आहेत. चैत्री पौर्णिमेस साधारणपणे एप्रिल महिन्यात हनुमान जयंतीच्या दिवशी खंडोबाची यात्रा भरते. तशी ही यात्रा महाराष्ट्रभर होते, परंतु गावागावातील यात्रेचे स्वरूप भिन्न असल्याचे दिसते. आमच्या खंडोबाचे हे ठाण मूळचे जेजुरीचे असे सांगितले जाते, जवळच म्हणजे ३०-४० किलोमीटर अंतरावर वाकडी येथे देखील खंडोबाचे ठाण आहे.

खंडोबाच्या यात्रेच्या दिवशी गावकऱ्यांनी अन्य ठिकाणी यात्रेस जायचे नाही, पूर्वी बैलगाडीने लोक यात्रेला जायचे. गावची जत्रा करण्याऐवजी लोक दुसऱ्या गावाच्या यात्रेस निघाले, तर त्यांच्या बैलगाडीची चाके जळाली, ते जत्रेस जाऊ शकले नाही. वेगवेगळ्या लोकांकडून अशा कथा सांगितल्या जातात, काळाच्या ओघात या आख्यायिकांमध्ये बदलही होत गेला. परंतु आजही लोक केवळ गावातल्याच यात्रेसाठी थांबतात किंवा बाहेरगावी वास्तव्य असलेले लोक जाणीवपूर्वक यात्रेस न चुकता येतात. मी एक गावकरी म्हणून न चुकता यात्रेस जातो, पै-पाहुणे प्रत्येकाच्या घरी आलेले असतात. पुरणपोळीचा नैवेद्य होतो, स्नेहभोजन होते. सासुरवासीण माहेरला येतात. जुन्या मित्रमैत्रिणींना-भावंडांना भेटतात, सुखदुःख हलके करतात आणि आपल्या वाटेने संसाराचा गाडा ओढण्यासाठी निघून जातात. पुढच्या वर्षी नक्की भेटू या खातरीने खंडोबावरील श्रद्ध त्यांना पुढच्या वर्षी परत घेऊन येते. अलीकडे बैलगाडीऐवजी ट्रॅक्टर, कार, मोटारसायकलवर यात्रेकरी येतात, दर्शन घेतात, एकमेकांना भेटतात आणि माघारी फिरतात. परंतु श्रद्धेत मात्र फरक नाही. देवाची महती यातून सांगितली जाते.

पहाटे ३-४ वाजता गावातील-मळ्यातील सर्व बायका उठतात, स्नान करून गावाकडे निघतात. सर्व बायका ४ पासून हनुमान मंदिरापासून ते खंडोबा मंदिरापर्यंत दंडवत घालतात. गावापासून एक किलोमीटर अंतरावर मंदिर, सर्व बायकांचा हा दंडवत घालण्याचा कार्यक्रम असतो, दिवसभरात

स्वयंपाकपाण्याचा रगाड्यात भेटता बोलता येत नाही, म्हणून दंडवत घालता घालता सर्वजणी जीवाभावाच्या मैत्रिणींना भेटतात, देवाची गाणी गातात. जसे दंडवत तसेच लोटांगणही घातले जाते. लोटांगण म्हणजे नवस केलेल्या स्त्री किंवा पुरुषांना गावातून हनुमान मंदिरापासून ते खंडोबा मंदिरापर्यंत लोळण घेत जाणे. बरोबरच कुटुंबीय अशा स्त्री-पुरुषांना मदत करतात. आजही आस्थेने दंडवत किंवा लोटांगण घातले जाते. सहा-सात वाजता बायका घरी परत येतात. घरातल्यांचा चहापाणी करतात, स्वयंपाकाच्या तयारीला लागतात. यात्रेच्या अगोदरच्या दिवशी गावातील तरुण कोपगाव येथे जातात. गोदावरीचे पाणी कावडीने अनवाणी पायाने पौर्णिमेच्या दिवशी सकाळी गावाच्या शिवेपर्यंत घेऊन येतात. तेव्हा गावकरी वाजत गाजत त्यांचे स्वागत करतात, मिरवणुकीने पाणी गावात येते. खंडोबाला स्नान घातले जाते, पूजाविधी केला जातो. यात्रेला प्रारंभ होतो.

सातनंतर गावातील सर्व पुरुष मंडळी गावात जमा होतात. हनुमान मंदिरात ठेवलेली पालखी बाहेर काढतात. पालखीमध्ये खंडोबाच्या चांदीचा मुखवटा ठेवतात. वाघ्यामुरळी देवाची आराधना करतात. साडेआठ-नऊ वाजता पालखी गडाकडे जायला निघते. पालखीला खांदा देण्यासाठी सर्वांची धडपड चाललेली असते. प्रथम पालखीला पुढच्या बाजूने खांदा द्यायचा, नंतर मागील बाजून खांदा द्यायचा. आपल्याकडे टोपी नसतेच अलीकडे, पण दुसऱ्याची टोपी घ्यायची, त्यानंतरच पालखीला खांदा द्यायचा, अनवाणी पायाने चारपाच पावलं चालायचं, परंतु पायताण मात्र काढायचे. मुखवट्याला भंडारा लावायचा, भक्तिभावाने दर्शन घ्यायचे, वाजत-गाजत पालखी मोठ्या श्रद्धेने गडाकडे निघते. पालखीपुढे मानाच्या सजवलेल्या काठ्या, तीन-तीन दोर प्रत्येक काठीला, काठी पडू नये, तिरपी होऊ नये, सर्व तंत्र सांभाळले जाते. काठी दोन्ही हातांच्या तळव्यावरून घेऊन नाचवत-वाजवत-गाजवत पुढे निघते. सर्व धर्माचे लोक गुण्यागोविंदाने काठीला मुजरा करतात. वाघ्या-मुरळीने ठेका धरलेला असतो. अलीकडे मात्र भंडारा उधळत तरुण भक्तही नाचतात. बेंजोची भर पडलेली आहे. ज्येष्ठ मंडळींकडून घाई केली जाते. ११ वाजण्याच्या सुमारास पालखी देवळात येते. दमलेले-भागलेले भक्त शांत होतात. देवदाशांच्या अंगात वारे येते. गावकरी किंवा वाघ्या त्यांना पाऊसपाण्याबद्दल विचारणा करतो. मूळच्या दुष्काळी गावात दरवर्षी पाऊसपाणी चांगला होईल, पीक येईल, देवाच्या मनात असेल तर चांगलेच होईल, गावाला बरकत येईल. याच मंदिरात सोन्याचे दरवाजे होते म्हणतात. पालखीची पूजा झाल्यानंतर चांदीचा मुखवटा मंदिरातील दगडी मूर्तीला

बसविला जातो. सर्व भक्त दाटीवाटीने देवदर्शन घेतात आणि गाव-वस्तीकडे माघारी फिरतात.

दुपारच्या वेळेत अनेक हलवाई, खेळणीवाले दुकानांची मांडामांड करतात. घरी पोहोचलेल्या बायकांनी स्वयंपाक केलेलाच असतो. पाहुणेराऊळे जमा होतात, स्नेहभोजन होते, गप्पाटप्पा विश्रांती होते. ४ वाजता सर्वजण आपापल्या सोयीनुसार जत्रेस निघतात, भेटतात, बोलतात, रागावतात, आशीर्वाद देतात, नवस फेडतात, संकल्प करतात. सात वाजेपर्यंत सर्व परिसर गडावर गर्दी करतो, ऐच्छिक असलेली वर्गणी गावकरी स्वतः जमा करतात, सक्ती नाही, आग्रह नाही, मुळात फार खर्चही नाही, पण सर्वच जण देवदर्शनाच्या अगोदर वर्गणी जमा करतात. पालखी खर्च, बेंजो, तमाशा, कुस्त्यांचा सर्व खर्च केला जातो. उर्वरित रक्कम पुढच्या वर्षासाठी शिल्लक ठेवली जाते. आजपर्यंत कधी कोणी अफरातफर, भ्रष्टाचार केल्याचे ऐकिवात नाही. 'सदानंदाचा येळकोट' करत खोबरे उधळत लोक घराकडे निघतात. बायकामुलांची खरेदीची, कारभारी मंडळीची खाऊ-शेव-रेवड्या घेण्याची गडबड संपत नाही. दमले भागलेले सर्वजण घराकडे वळतात.

उधळलेल्या खोबऱ्यातून देवाचा प्रसाद म्हणून शिल्लक ठेवलेले खोबरे तळीसाठी असते. पाच पुरुष, मुले, काकडा देव ताम्हणात घेऊन, मांडी घालून बसतात. खंडोबाला भंडारा लावतात. सर्वजण ताट उचलतात, म्हणतात

सदानंदाचा येळकोट<br>
हरहर महादेव<br>
चिंतामण मोऱ्या<br>
देव चालले जेजुरी<br>
कमरी करगोटा, बेंबी हिरा<br>
खोबऱ्याचा तुकटा<br>
भंडाऱ्याचा पुरका - सदानंदाचा येळकोट

दोन वेळा अशी तळी भरली जाते आणि देवाकडे मार्गावरूनच म्हणजे घरापासूनच देवाचे स्मरण केले जाते. सदानंदाचा तीन वेळा येळकोट केला जातो. त्यानंतर रात्रीचे जेवण करून सर्व पुरुष खंडोबाच्या गडावर जमतात. सकाळी आणलेली पालखी वाजत-गाजत-मिरवत हनुमान मंदिरापर्यंत जाते. सन्मानाने स्थानापन्न होते. हा झाला धार्मिक कार्यक्रम आणि त्यानंतर थोड्याच वेळात सुरू होतो, तमाशा, ऐपतीप्रमाणे दिलेली सुपारी, ठरावीक कलावंत, रात्रभर गण, गौळण, वगनाट्य आणि सकाळी हजेऱ्या होतात.

या सर्वामध्ये लोकजीवन-संस्कृती-परंपरांचे दर्शन घडते. देवावरील श्रद्धा, भक्तिभाव जसा दिसतो, तसेच तमाशाप्रेम दिसते. थकल्याभागल्या जीवांना मनोरंजनाची गरजही असते, म्हणून तमाशा, दुसऱ्या दिवशी कुस्त्यांचा फड असतोच. हिशोब असतो. थोडी भांडणेही आलीच, पण भ्रष्टाचार नाही. कारण देवाची भीती मनामध्ये असते. श्रद्धा आणि भीतीचा सुंदर संगम म्हणजे गावाची जत्रा. त्याला मनोरंजनाची जोड आणि भेटीगाठीसाठी या जत्रा हव्यात असेच वाटत राहते.

दुष्काळी परिस्थितीमुळे व्यापाराच्या निमित्ताने वंजारी समाज नाशिक, धुळे, मालेगाव आणि अन्य ठिकाणी गेला असून चैत्र पौर्णिमेस गावी परत येतो. वर्गणी जमा करून भंडारा करतो, सर्वजण एकत्रच जेवतात. अतिशय आनंदाचा असा हा भोजन महाप्रसाद भंडारा असतो.

जशी यात्रा तशीच रविवारची वारी असते. ज्यांना मंदिरापर्यंत येता येत नाही, ते मार्गावरूनच दर्शन घेतात. गावातले सर्वजण रविवारी देवदर्शनास जातात. भंडारा भाळी लावतात. श्रीफळ वाढवितात. एकमेकांना भेटतात. अलीकडे निवडणुकांचे नारळ इथेच फुटतात. जयपराजयानंतरही देवदर्शनाला येतात. गुण्यागोविंदाने नांदणारे गाव असेच राहील का? हे सदानंदा हे गाव असेच आनंदात ठेव, आधुनिकतेच्या वाऱ्याने उद्ध्वस्त करून नको, माणसातलं माणूसपण असेच असू दे. संशोधक-अभ्यासकांनी याकडे वैज्ञानिक दृष्टीने पाहावे, अभ्यासावे म्हणून हे संकलन केले आहे. उणे ते माझे.

❑❑❑

# शिमगा आणि वाण

भारतीय परंपरेत मानवी जीवनात रूढी, परंपरा, सण, उत्सव, लोककला यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. परंतु परिवर्तन काळात परंपरांना, लोककलांना धक्का लागला. त्यात 'वाण' विस्मरणात जात आहेत. 'वाण' म्हणजे एक प्रकारे ग्रामीण जीवनातील 'फिशपाँड' असे म्हणता येतील. 'वाण' हे पौराणिक, ऐतिहासिक आणि सामाजिकही आहेत. आडगाव बु.।।, ता. राहाता येथे १०-१५ वर्षांपूर्वी शिमग्याला 'वाण' म्हटले जात होते. आज काळाच्या ओघात म्हटले जात नाही. श्री. रखमा कोंडाजी, मुरलीधर विनायक, दादा रावजी, सारंगधर त्रिंबक ही मंडळी 'वाण' म्हणत. मोठ्या आनंदाने शिमग्याचा सण साजरा करीत असत.

**वाण - १ अहात्र भाई**

चैत्र मास उन्हाळा ।भले। उन लगे चटचटा ।।भले।।
श्रावण बाहाची ।। माय पिते बोलती झाले ।।भले।।
अरे नारे श्रावण बाळा - चाल घेऊन काशीला
श्रावण बाळाने मनी तो विचार केला
चंदन बेलाची लाकडे तोडून, त्याचीच कावड करून
मायपित्याला त्याच्यात बसून निघाला असे काशी यात्रेस
पहिल्या बनात जाऊन दुसऱ्या बन वलांडून
मायपित्याची आई बोलती झाली
अरे नारे बाळा, अनशील या घटकाला पाणी
तरच वाचतो आमचा प्राण
दगडांच्या तिमनी रचून, गवताच्या बुचड्या बांधून
चंदनबेलाच्या झाडावर, घाव घालून, कावड दिली अशी टांगून
झारी तो घेऊन निघाला असे दुधनाच्या तळ्यावर
झारीला तो दोर लावून, झारी ती पाण्याने घेऊन
आंघोळ - स्नान करून, झारीचा तो आवाज, बुडबुडा घेऊन
दशरथ राजाच्या कानी आवाज जाऊन
दशरथ राजे दचकून जागे होऊन

कोण वैरी लढाईला - येऊन, धनुष्यबाण दिला सोडून
धनुष्यबाण सो सो करीत, जाऊन बसला श्रावणबाळाच्या छातीत
दशरथ राजा जाऊन, छातीला गुडघा लावून
अरेनारे श्रावणबाळा उपटू कारे तुझा बाण
नको नको उपटू माझा बाण
माझे मायपिते पाण्यावाचून आहे जंगलात
दशरथ राजाने झारी ती घेऊन
निघाला असे शोध करीत
झारी तीं मायपित्याच्या तोंडाला लावून
अरे नारे बाळा बोलल्या वाचून आम्ही
नाही पाणी पिणार
अरे नारे देवा मी तुमचा नाही श्रावणबाळ
मी हातांनी भासा मारला श्रावणबाळ
अरे नारे देवा! चंदन बेलाचे लाकडे तोडून
तिघांना अग्निकाष्ठ देऊन - नवव्या दहाव्या दिवशी
दिसपिंड पाडून एक पिंड नेला घारीनं
दोन पिंड नेले कावळ्याने
घारीच्या पायातून निसटला
अंजनी तप करीत होती ढग्या डोंगरात
घारीच्या पायातून निसटला, अंजनीच्या ओटीत पडला
अंजनी मातेने माग न पुढे पाहता गटकन गिळून घेतला
त्याचाच गर्भ राहिला, नऊ महिने नऊ दिवसाने
चैत्र पौर्णिमेच्या दिवशी, जन्मले वीर मारुती
जन्मल्या जन्मल्या गेला सूर्याला पकडायला
गिळू कारे तुला, नको गिळू मला
मी जगाचा पालनवाला ।।भले।।

श्रावणबाळाच्या आईवडिलांची काशी यात्रा ह्या कथेबरोबच वीर मारुतीच्या जन्मापर्यंतची कथा या 'वाणा'मध्ये येते.

**वाण २ - मढी पैठण (राजकीय)**

कपुली मणुली दोघी जावा
रस्ता पुरण बंगला नवा

DADASAHEB RUPWATE SCIENCE COLLEGE LIBRARY AKOLE 422601

निमगावमध्ये हवा खावा
ज्याला नाही कोन्ही त्याला आहे लेकी
लेकीला आहे मावसभावाची जोडी
यांना नव्हती मिळवंडे धरणाची गोडी
म्हस्केनी काढली दुधाची डेरी
या डेरीचे काय काय गुण गाऊ
निर्मळ पिंपरीमध्ये भजन गाऊ
अस्तगावमध्ये तंटा नवा
राहात्याला बोरावके माडी
पुढे आहे नाथ पाटलाची वाडी
नाथपाटलाच्या वाडीवरून दिसते चांगदेवाचे राऊळ
रावळाच्या वरूनी आहे मामाभाचाचे देऊळ
मामाभाचांच्या देवळाजवळ आहे एक घाट
त्या घाटावर ढवळी घोडी आहे नीट
त्या घोडीवर बसून जाधवराव
घेते भैरोबाचा माण
त्याच्याच वरून आहे चापटवाला बाबाचे ठाण
इनई उतरणाराला येतो गुण
या गुणाची ऐका ख्याती
पुढं मढी पैठण जत्रा येती
या मढीमध्ये आहे कैकाड्याला मान ।।भले भाऊ भले।।

उत्तर अहमदनगर जिल्ह्यातील राजकारण, पाणीप्रश्न, परिसरातील लोकजीवनाचे चित्रण या 'वाणा'मध्ये येते.

**वाण – ३ स्थानिक शेलापागोटे – वाण**

विष्णुबाबांनी घेतल्या म्हशी
या म्हशींचा मुत तोळातोळा ।।भले।।
काशीनाथ शेळका लेजीम खेळा
या लेजमाचं काय काय होऊ
पाराजी शेळकां पानं खाऊ ।।भले।।
या पानाला नाही कात ना चुना
ऐका म्हसू शेळक्याच्या खुणा

या खुणाला नाही सांद ना वांद ।।भले।।
शिरपत शेळक्यांना पाडले कान
त्याला येईना ऐकू ना बायकू ।।भले।।
त्याच्या संसाराची झाली राळ
मारुती शेळक्यानं घातली माळ
या माळीचा मणी भलाभला
तुळशीराम शेळका मुंबईला गेला ।।भले।।
मुंबईच्या कुटतो खेपा आणि
पारावर बसून ऐका यादव पायजच्या गप्पा ।।भले।।
झाला शिमगा चला घरोघरी ।।

आडगाव बु.।। ता. राहाता येथील वेगवेगळ्या वृत्तीप्रवृत्तीच्या माणसांवरील भाष्य म्हणजे हा 'वाण' आहे.

**वाण - ४ अहात्र भाई**

राम लक्ष्मणाची जोडी
मारुती शिवराम करीतो हेडी
रघु शिवरामाने बांधीली माडी
पका मास्तरी वाढवली दाढी
किसन तात्या वान जोडी
एकनाथ चांभार दाखवी आरी
सोपान सूर्यभानी लावल्या बोरी
झाला शिमगा चला घरोघरी

गावातील स्नेहसंबंध, किस्से या वाणामधून येतात.

**वाण - ५ श्री स्वामी समर्थ**

हे हातरे भाई, हे हातरे भाई
शिवर भिवर, हे हातरे भाई
शिवेवर कापला बोकड्या
हे हातरे भाई ।।
बोकडेची आई दुबळी, शेर शेर घाटा अुवाळी
हे हातरे भाई

अुकळ अुकळ वाठ्या, ढवळ्या बौलावर गोण्या
हे हातरे भाई
गोण्या त्या हारो हारी, कोकण पिकले भारी
हे हातरे भाई
कोकण्याचा भोपळा, उडून बसरे पिपळा
हे हातरे भाई
पिपळाची छाया, झाला शिमगा
पडा महादेवाच्या पाया
हु बू बू

अतिशयोक्त असा हा वाण आहे.

**वाण - ६ हे हातरे भाई**

खंडू पांडू दूध ताक पिऊन झाले हुस्सी
पाटालाना घेतल्या म्हसी, हे हातरे भाई
त्या म्हसीचा मुत मुत तोळा, हे हातरे भाई
दादा लेझीम खेळला, हे हातरे भाई
त्या लेझीमच काय काय होऊ हे हातरे भाई
हे हातरे भाई

भाऊ पानं खाऊ हे हातरे भाई
त्या पानाना कात ना चुना, हे हातरे भाई
ऐका मामाच्या खुणा हे हातरे भाई
या खुणांना सान ना वाण, हे हातरे भाई
दाजीना पाडले कान, त्याना येईना ऐकू हे हातरे भाई
सराना नाही बायकू ...... हे हातरे भाई
त्यांच्या संसाराची झाली राळ, हे हातरे भाई
शिपायांनी घाती माळ, हे हातरे भाई
त्या माळीचा मणी भल्ला भल्ला, हे हातरे भाई
हे सर ....... मुंबईला गेला, हे हातरे भाई
त्या मुंबईच्या खेपा, हे हातरे भाई
ऑफिसमध्ये बसून ऐका हेडसराच्या गप्पा
हु बू बू

स्थानिक माणसांवरील शेलापागोटे असे या 'वाणा'चे स्वरूप आहे. निखळ मनोरंजनाच्या उद्देशाने हे 'वाण' म्हटले जात होते.

**वाण ७ अहात्र भाई**

ऐक ऐकरे भल्या मानसा। नाही देहाचा भरवसा
काळ करीतसे वसवसा। हाती घेऊन मृत्यूचा फासा ।।
मनी धरीरे भरवसा। तुझ्या हिताचा हा किस्सा
याच जन्मी आहे शिमगा। म्हणुनी आता मारी बाबा ।।
तुझा बाप गेला वंजा । तिथेच गेला तुझा पंजा
आजोबांचा पत्ता नाही। तिथेच गेली तुझी आई ।।
कोन घडी येईल कैसी । तू ही जाशील एके दिवसी
नामा विना कोन तारी । हृदयी धरीरे श्रीहरी ।।

**वाण ८ - अहात्र भाई**

सन होळीचा भारी । हाती घेऊन गोवरी
जाय देवळांचे दारी । दोन्ही हातांनी बोंब मारी ।।
नव जवानीच्या नादे । भलतेच करीसी धंदे
यमराज सवे नांदे। एके दिवसी होईल वांदे ।।
करूनी चौऱ्यांशीचा फेरा । तेव्हाच जन्म मिळाला नरा
आता तरी सांभाळ जरा । हरी भजनाचा देई नारा
भले भले पडले फसी । तेथे थोर आहे विवसी
अहंकारा पाई भुलशी । एके दिवसी पडशील फशी
विचार करीरे बाळा जरा । लाविते होळीचा अंगारा
संसार सुरवात सदा तोटा । शास्त्री पुराणी बोभाटा
नकोस लागू त्याच्या नादा। सुख नाही रे सर्वदा
पाळण्यात घातले बाळ । माता करी कळकळ
बाळ अलार्क ऐकतो कानी । मदालसेची धर्म शिकवणी

मानवी प्रबोधनाची कल्पना या 'वाणा'मध्ये दिसते.

वाण ९

उच्च यातीचा ब्राह्मण असुनी
जानव्या सोहळ्याची घातली घडी, अन्
पवळा महारीन घेतली संगे
लाज लावली देशोघडी ।।

सारांश,

असे अनेक 'वाण' उपलब्ध होऊ शकतील. गावाचे ऐक्य, मिश्किलपणा, खेळकरपणा तर यात आहेच. शिवाय निखळ मनोरंजनाची प्रेरणा यामागे आहे. काळाच्या ओघात सर्वच नष्ट होत आहे. त्याला शब्दरूप देण्याचा हा प्रयत्न आहे. कुणाच्या भावना दुखाविण्याचा उद्देश नाही. कुणाच्या भावनांना ठेच लागल्यास क्षमस्व.

❑❑❑

## अल्पपरिचय

१. शिक्षकाचे नाव :- डॉ. भास्कर त्रिंबक शेळके
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर, जि. पुणे

२. जन्मदिनांक :- १ जुन १९६१

३. शैक्षणिक अर्हता :- एम.ए., एम.फिल., पीएच.डी.

४. सेवा कालावधी :- १९८४ पासून महाविद्यालयीन शिक्षक म्हणून मान्यता - पुणे विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षक आणि एम.फिल., पीएच.डी. मार्गदर्शक

५. प्रशासकीय अनुभव :- श्री शिवछत्रपती महाविद्यालयात दि. १४/५/२००३ ते १३/३/२००५ पर्यंत प्राचार्यपदी नियुक्ती - प्राचार्य पदावर असताना कॉलेजला नॅक मूल्यांकनाचा बी + दर्जा

६. पुणे विद्यापीठ, पुणे :- प्राध्यापक निवड समितीवर कामकाज

७. चर्चासत्र आयोजन सहभाग व निबंध वाचन :-

| अ.क्र. | स्तर | आयोजन | सहभाग | निबंध वाचन |
|---|---|---|---|---|
| १ | विद्यापीठस्तरीय | ५ | २५ | ११ |
| २ | राज्यस्तरीय | ५ | २० | १२ |
| ३ | राष्ट्रीय | ३ | २२ | १० |
| ४ | आंतरराष्ट्रीय | -- | १ | १ |
| ५ | नवलेखक शिबिर (महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई) | १ | -- | -- |

८. पुणे विद्यापीठ मेजर / मायनर रिसर्च :- मायनर रिसर्च पूर्ण वर्ष २००९-२०११
विषय : 'ग्रामीण साहित्याचा इतिहास'

९. यु.जी.सी. मेजर / मायनर रिसर्च :-
अ. मायनर - 'स्वातंत्र्योत्तर प्रादेशिक कादंबरी' - पूर्ण
ब. मेजर - १. 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि चिकित्सा' - पूर्ण
२. 'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त पुस्तकांचा अभ्यास' - पूर्ण वर्ष २००९ ते २०११

१०. पुरस्कार :- १. आदर्श प्राध्यापक पुरस्कार, पुणे विद्यापीठ, २००८
२. मा. शिवाजीराव काळे गुणवंत व आदर्श प्राध्यापक पुरस्कार, श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर, २००८
३. पदम्श्री विखेपाटील राज्य ग्रंथ पुरस्कार, १९९८.
४. के.बी. रोहमारे ग्रंथ राज्य पुरस्कार, १९९८.
५. वाङ्मय सेवा पुरस्कार, २००९.
६. नक्षत्रांचे देणे काव्य मंच पुरस्कार, पुणे २०१०.

## ११. मार्गदर्शक म्हणून केलेले कार्य व एम.फिल., पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थ्यांची सूची

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | विषय | शेरा |
|---|---|---|---|
| पुणे विद्यापीठ, पुणे | | | |
| १ | डॉ. विलास थोरात, मनमाड | शरणकुमार लिंबाळे : व्यक्ती आणि वाङ्मय | पीएच.डी. पूर्ण |
| २ | डॉ. दत्तात्रय डुंबरे, ओतूर | जुन्नर तालुक्यातील वारकरी परंपरा | पीएच.डी. पूर्ण |
| ३ | डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर, घोडेगाव | आदिवासींचे जीवन चित्रण करणारे मराठी साहित्य : एक चिकित्सक अभ्यास | पीएच.डी. पूर्ण |
| ४ | डॉ. वंदना डोंगरे (नढे), नारायणगाव | देवदासींचे जीवन चित्रण | पीएच.डी. पूर्ण |
| ५ | डॉ. सीताराम निघुट, अहमदनगर | वि.शं. पारगावकर : व्यक्ती आणि वाङ्मय | पीएच.डी. पूर्ण |
| ६ | डॉ. अनिल उगले, आळे | मराठी संज्ञाप्रवाही कादंबरी | पीएच.डी. पूर्ण |
| ७ | डॉ. शशिकांत साळवे, घोडेगाव | मराठी लेखिकांच्या कादंबरीतील आधुनिकता | पीएच.डी. पूर्ण |
| ८ | डॉ. ज्ञानेश्वर थोरात | संत ज्ञानदेव, संत एकनाथकृत हरिपाठावरील उपलब्ध साहित्याचा अभ्यास | पीएच.डी. पूर्ण |
| ९ | डॉ. बाळासाहेब सोनवणे, पुणे | दलित कादंबरी : स्वरूप आणि चिकित्सा | पीएच.डी. पूर्ण |
| १० | डॉ. अनिल गर्जे, कडा आष्टी | लमाणांचे लोकसाहित्य | पीएच.डी. पूर्ण |
| ११ | प्रा. डॉ. दिलीप कसबे, चाकण | शाहीर मोमीन कवठेकर : व्यक्ती आणि वाङ्मय | पीएच.डी. पूर्ण |
| १२ | डॉ. श्रीप्रकाश वाघमारे | गौतम बुद्धांच्या विचारांचा मराठी साहित्यावरील प्रभाव | पीएच.डी. पूर्ण |
| १३ | प्रा. डॉ. धनंजय वाघमारे | यशवंत मनोहरांची समीक्षा | पीएच.डी. पूर्ण |
| १४ | प्रा. सचिन काकड | ग्रामीण साहित्याची समीक्षा | संशोधन कार्यरत |
| १५ | प्रा. राजेश्वर दुडुकनाळे | अण्णाभाऊ साठेंच्या साहित्यातील क्रांतिकारक विचार | संशोधन कार्यरत |
| १६ | प्रा. गणपत हराळे | सा.अ.पु.प्रा. कादंबऱ्यांचे मूल्यमापन | संशोधन कार्यरत |
| १७ | प्रा. सुवर्णा खोडदे, पुणे | सदानंद देशमुखांचे कथाविश्व | एम.फिल. पूर्ण |
| १८ | प्रा. प्रल्हाद शिंदे, राजेवाडी | इडा पिडा टळो | संशोधन कार्यरत |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | श्री. नितीन भालेराव, गंगापूर बु.।। | लोकोत्तर गाडगेबाबा : जीवन आणि आणि कार्य एक अभ्यास | एम.फिल. पूर्ण |
| २० | सौ. सुनिता पारे (पावडे) | अप्पासाहेब खोतांची सावलीची सोबत | संशोधन पूर्ण |
| **य.च.म.मु.वि. नाशिक** | | | |
| २१ | प्रा. संदीप घोडे, प्रवरानगर | अरुण साधूंच्या कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा | प्रबंध सादर |
| २२ | प्रा. वाव्हळ, अहमदनगर | कृषी साहित्य आणि राजन गवस | एम.फिल. पूर्ण |
| २३ | प्रा. रामदास धोंडीबा टेकाळे | तुका आकाशा एवढा | एम.फिल. पूर्ण |
| २४ | प्रा. जाधव, अहमदनगर | राहुरी तालुक्यातील लोकदैवत कथा गीते | संशोधन कार्यरत |

**टिप्पणी :** मार्गदर्शक ग्रामीण साहित्याचे अभ्यासक असूनही विषय बंधन विद्यार्थ्यांवर लादले नाही. शिवाय वेगवेगळे विषय हाताळून सर्वांगीण ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न केला आहे.

**१२. ग्रंथसंपदा :-**

१. मराठी कादंबरीतील प्रादेशिकता, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, दु.आ., २००५.
२. समीक्षा : संकल्पना आणि स्वरूप, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१०.
३. ग्रामीण साहित्य, स्वरूप आणि चिकित्सा, कर्मवीर प्रकाशन, २०१०.

**संपादन :**

१. चळवळ आणि साहित्य, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१०.
२. कथा गौरव, डॉ. भास्कर शेळके व डॉ. बाळासाहेब गुंजाळ, २००९.
३. काव्यकस्तुरी, डॉ. भास्कर शेळके व डॉ. बाळासाहेब गुंजाळ, २००९.
४. अधिष्ठान अभ्यासक्रम, डॉ. भास्कर शेळके व टिळक.
५. वाङ्मय प्रकार कविता, डॉ. भास्कर शेळके व मेदककर.
६. विज्ञान वेध, डॉ. देवरे व डॉ. भास्कर शेळके, स्नेहवर्धन प्रकाशन.
७. प्रसार माध्यमे आणि मराठी भाषा, डॉ. भास्कर शेळके, कर्मवीर प्रकाशन.

**१३. विविध पुस्तके, नियतकालिके व नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या संशोधनात्मक लेखांची सूची**

अ. पुस्तके :

| अ.क्र. | पुस्तक | संपादक | प्रकाशन | लेखाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | हल्या हल्या दुधू दे आणि तृतीय रत्न | डॉ. तुषार चांदवडकर | बजाज पब्लिकेशन, अमरावती, २०१० | हल्या हल्या पुस्तक दुधू दे - एक प्रादेशिक कादंबरी पृ.क्र. २९ ते ३५ |

LIBRARY

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | पाटलांची लंडनवारी काही दृष्टिक्षेप | डॉ. शैलेश त्रिभुवन | सुविद्या प्रकाशन जाने. २००४ | पाटलांची लंडनवारीमधील प्रतिमा, पृ.क्र. ३०. |
| ३ | १९९१ नंतरचे ग्रामीण साहित्य | डॉ. जयद्रथ जाधव | प्राचार्य शिवाजी कॉलेज रेणापूर | नव्वदोत्तर काळातील ग्रामीण कादंबरी पृ.क्र.९ |
| ४ | तहान : स्वरूप आणि समीक्षा | डॉ. कैलास सार्वेकर | प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २००३ | तहान कादंबरीतील वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा, पृ.क्र. १२० |
| ५ | लोकसाहित्य दर्शन | डॉ. रमेश देवरे | कर्मवीर प्रकाशन, पुणे | लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य साम्यभेद, पृ. १९९ |
| ६ | विठ्ठल वाघ गौरवग्रंथ | | अकोला | नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी |
| ७ | डॉ. द. ता. भोसले | भास्कर चंदनशीव | स्नेहवर्धन, पुणे | रंजनवादी मराठी साहित्य |

ब. नियतकालिके

| नाव | प्रकाशन महिना व वर्ष | विषय |
|---|---|---|
| लोकविद्या पत्रिका | ऑक्टो/नोव्हें/डिसेंबर १९९९ | लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य, पृ. १४ ते १८. |
| आनंदोत्सव | | १९८० नंतरची कविता |
| अक्षर वैदर्भी | सप्टें. २००९ | आधुनिक मराठी ग्रामीण साहित्याची भूमिका, पृ. ४१ |
| अक्षर वैदर्भी | जाने. २०१० | बदलती राजकीय, आर्थिक स्थिती आणि साहित्य, पृ. ५५. |
| मराठा मार्ग | सप्टें. २०१० | ग्रामीण कादंबरीतील स्त्रीचे चित्रण, पृ. २० ते २३ |
| मराठा मार्ग | डिसेंबर २०१० | या शतकाचा सातबारा होईल कोरा, पृ. १९ ते २१ |
| सर्वधारा | मार्च २०११ | मराठी साहित्य आणि मानसशास्त्र : परस्परसंबंध, पृ. २५ ते ३५ |
| अक्षरगाथा | २०१० | कथा संपादन दृष्टिकोण पृ. २९ ते ३१ |

क. अनियतकालिके

| नाव | प्रकाशन महिना व वर्ष | विषय |
|---|---|---|
| राजश्री शाहू महाविद्यालय, लातूर राष्ट्रीय चर्चासत्र, मराठी संशोधन पद्धती | १९, २० डिसेंबर २००८ | साहित्याचे मानसशास्त्रीय संशोधन, पृ. २७. |
| डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, राष्ट्रीय चर्चासत्र, समकालीन मराठी साहित्य स्वरूप आणि समीक्षा (१९७५-२०००) | ३,४,५ फेब्रुवारी २०१० | ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या, पृ.क्र. ८ |
| आत्मप्रत्यय डॉ. सावंत (लोहा) शंकरलाल खंडेलवाल आर्टस, सायन्स आणि कॉमर्स महाविद्यालय, अकोला Interrelationship of Literature & Social Sciences | संपादक मंडळ सदस्य २०, २१ फेब्रुवारी २०००९ | मानवशास्त्र आणि साहित्य परस्परसंबंध, पृ. ५ |

सन्मान : साहित्य अकादमी पुरस्कार समिती तज्ज्ञ परीक्षक, २०११

सदस्य : श्री शिवछत्रपती महाविद्यालयीन सेवक वर्ग पतसंस्था, जुन्नर सन २०११ ते २०१६

**१४. विविध संस्था, मंडळे, शासकीय समितींवर नियुक्ती :-**

अ. पुणे विद्यापीठ (२०१६ पर्यंत) : १. मराठी अभ्यास मंडळ सदस्य
२. ३२.५ सदस्य
३. अभ्यासक्रम उपसमिती चेअरमन

ब. महाराष्ट्र शासन : पुस्तक शिफारस समिती
(तज्ज्ञ, परीक्षक म्हणून कार्यरत)

क. शिवाजी मराठा शिक्षण संस्था (जुन्नर) : सल्लागारपदी ५ वर्षांसाठी निवड

१५. महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांमध्ये एम.फिल., पीएच.डी. चे परीक्षक म्हणून कामाचा प्रदीर्घ अनुभव

**१६. विस्तार / सामाजिक कार्य** :- कन्या कै. शब्दश्री भास्कर शेळके यांचे स्मरणार्थ
१. श्री शिवछत्रपती महाविद्यालयास देणगी रु. १,२५,०००/-

DADASAHEB RUPWATE SCIENCE, COMMERCE & ARTS COLLEGE LIBRARY AKOLE 422601 DIST. AHMEDNAGAR

२. महाविद्यालयातील आदर्श शिक्षक / कर्मचारी पुरस्कारासाठी रक्कम रु. ११,०००-/ कायम ठेव ठेवून त्यातून प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह

३. रोख रकमेचा पुरस्कार ठेवला. विविध विद्यालयात रोख स्वरूपाची बक्षिस ठेव योजना रु. ३,०००/-

४. प्रवरा विद्यालय, आडगाव बु.।। ता. राहाता रु. ५०००/- देणगी

- विविध शाळा, महाविद्यालये, गणपती उत्सव आदी ठिकाणी व्याख्याने दिली.
- माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या विविध उपक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे, मार्गदर्शक म्हणून सहभाग.
- जीवन विमा निगम, शाखा नारायणगाव ५३ वा वर्धापनदिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन

१८. कॉलेज कामकाज :- स्मरणिका, माहितीपत्रक, विविध प्रस्ताव, नॅक, संस्था अहवाल, स्नेहसंमेलन अहवाल इत्यादी कामामध्ये सक्रिय सहभाग प्रसार माध्यमे आणि मराठी भाषा राष्ट्रीय चर्चासत्र २७,२८ मार्च २०१० रोजी स्मरणिका संपादन करून प्राध्यापक व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली.

❑❑❑